





स्थानिक भाषेतून शिक्षण देण्यास प्राधान्य हवे

▸▸ पान ९ वर

वर्ष : १४६

Registered No. PCW/002/2024-2026-S.P.College Post-RNI No. 1755/1957

केसरी

राष्ट्रीय ठेवा

• अंक १४४ • पृष्ठे : १२+'नव्या दिशा' पुरवणी • सात रुपये • बुधवार २७ मे २०२६, पुणे C (पुणे/अहिल्यानगर/सोलापूर आवृत्ती) Issue-144 • Pages 16 • Seven Rupees • 27 May 2026 • Pune

## मोटेगावकरच्या सीबीआय कोठडीत वाढ

**नवी दिल्ली :** 'नीट' पेपरफुटी प्रकरणात अटकेत असलेला रेणुकाई केमिस्ट्री क्लासेस (आरसीसी)चा संचालक शिवराज मोटेगावकर याच्या सीबीआय कोठडीत दिल्ली न्यायालयाने मंगळवारी एक दिवसाची वाढ केली. याआधी, मोटेगावकरला नऊ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावण्यात आली होती. त्याची मुदत काल संपणार होती. त्यामुळे मोटेगावकरला विशेष न्यायाधीश अजय गुप्ता यांच्यापुढे हजर करण्यात आले. त्यावेळी न्यायालयाने सीबीआय कोठडीत वाढ केली. मोटेगावकरला १७ मे रोजी सीबीआयने लातूरमधून अटक केली होती. मोटेगावरने इतर आरोपींसोबत संगनमत करून 'नीट' परीक्षेआधी २३ एप्रिल रोजी रसायनशास्त्राचे प्रश्न आणि उत्तरे मिळवली होती.

# इंधन साठेबाजांवर होणार कठोर कारवाई

## कांदा प्रश्नासाठी आज केंद्र सरकारसोबत बैठक

**मुंबई, (प्रतिनिधी) :** पेट्रोलची मागणी सरासरीपेक्षा २३ टक्क्यांनी तर डिझेलची मागणी ५२ टक्क्यांनी वाढली आहे. अकोल्यात तर १५४ टक्क्यांपेक्षा जास्त पुरवठा होत आहे. तरीही टंचाईसदृश स्थिती होत आहे. त्यामुळे इंधन साठेबाजी होत असल्याचा दाट संशय असून, इंधन साठेबाजांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश पुरवठा विभाग तसेच गृहविभागाला दिले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. तसेच, केंद्र सरकारने कांद्याचा भाव साडेतीन रुपयांनी वाढवून १५ रुपये केला आहे. मोठ्या प्रमाणात खरेदीही सुरू केली आहे. आज (बुधवारी) कांदा प्रश्नी महत्त्वाची बैठक घेत आहे. कांदा शेतकऱ्यांबाबत राज्य सरकार संवेदनशील आहे. कांदा कापल्यानंतर ज्यांच्या डोळ्यात अश्रू येत नाहीत अशी मंडळी आता अश्रू ढाळण्याचा प्रयत्न करत आहेत. हे केवळ छायाचित्रासाठी चालले असल्याचा टोला फडणवीस यांनी विरोधकांना लगावला.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री प्रसारमाध्यमांशी बोलत होते. सरासरीपेक्षा पेट्रोल डिझेलची मागणी प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढली असली तरी त्याची पूर्तता आपण करत आहोत. पण साठेबाजी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याबाबत पुरवठा विभाग, गृहविभाग संयुक्त कारवाई करतील, असा इशारा मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.



### नाशिकमध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन

(सविस्तर वृत्त पान ३)

### महायुतीचे सरकार संवेदनशील

केंद्र सरकारने कांदे खरेदीचा भाव साडेतीन रुपयांनी वाढवून १५ रुपयांवर नेला आहे. मोठ्या प्रमाणात कांदा खरेदी सुरू केली आहे. केंद्राला आपण बैठकीची विनंती केली असून आज सायंकाळी केंद्र सरकार बैठक घेत आहेत. कांद्याबाबत राज्य आणि केंद्र हस्तक्षेप करत आहे. १५ रुपयाने खरेदी सुरू केली आहे. शेतकऱ्यांबाबत राज्य सरकार संवेदनशील आहे. काही जण विनाकारण यात राजकारण करत आहेत. त्यांना आपले इतकेच सांगणे आहे की, राज्य-केंद्राने १५ रुपयांचा निर्णय घेतला आहे. तुमच्या काळात कधी हा निर्णय केला होतात का? आम्ही घेतला. कारण आम्ही संवेदनशील आहोत. आजच्या केंद्रासोबतच्या बैठकीत दीर्घकालीन उपाययोजना करण्यात येतील. विरोधकांचे राजकीय आंदोलन आहे. कांदा कापल्यानंतरही ज्यांच्या डोळ्यात अश्रू येणार नाहीत, अशी मंडळी आता अश्रू ढाळण्याचा प्रयत्न करत आहेत. पण, महायुतीचे सरकार कांद्याबाबत संवेदनशीलतेने काम करत आहे, असेही फडणवीस म्हणाले.

## इंधन दरवाढीमुळे महागाई दर पाच टक्क्यांवर पोहोचणार

**नवी दिल्ली :** इंधन दरवाढ आणि सोन्या-चांदीवरील वाढीव आयात शुल्कामुळे किरकोळ महागाई दर जून महिन्यात पाच टक्क्यांवर पोहोचण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच, रिझर्व बँक तूर्तास व्याज दराबाबत कोणताही निर्णय घेणार नाही, असे अर्थतज्ज्ञांनी सांगितले.

१५ मे पासून इंधनाच्या दरात चार टप्प्यांत वाढ करण्यात आली. त्यामुळे पेट्रोलच्या दरात ७.३८ रुपये प्रति लीटर आणि डिझेलच्या दरात ७.४८ रुपये प्रति लीटरने वाढ झाली आहे. त्यामुळे आगामी काळात महागाईचा भडका उडण्याची दाट शक्यता आहे.



पश्चिम आशियातील संघर्षामुळे उद्भवलेल्या संकटावर मात करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बचतीचे आणि काटकसरीचे आवाहन केले आहे. यासोबतच, सोने आणि चांदीवरील आयात शुल्क ६ टक्क्यांवरून १५ टक्के केले आहे.

पेट्रोल-डिझेलच्या दरात साडेसात रुपयांची झालेली वाढ पाहता ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दरात ०.७५ टक्क्यांची वाढ अपेक्षित धरली जात आहे. मे महिन्यात महागाई वाढीचा दर ४ ते ४.५ टक्के आणि जूनमध्ये ४.५ ते ५ टक्क्यांदरम्यान राहू शकतो, असे इवाय इंडियाचे मुख्य धोरण सल्लागार डी. के. श्रीवास्तव यांनी सांगितले.

एप्रिल महिन्यात किरकोळ महागाई दर ३.४८ टक्क्यांवर पोहोचला. मार्चमध्ये हा दर ३.४० तर फेब्रुवारीत ३.२१ टक्के होता. एप्रिल महिन्यात ग्रामीण महागाई दर ३.७४ टक्के तर, शहरी भागात हा दर ३.१६ नोंदविला गेला. मार्च महिन्यात हाच दर ग्रामीण भागात ३.६३ टक्के आणि शहरी भागात ३.११ टक्के नोंदवला गेला. मार्च महिन्यात रिझर्व बँकेने २०२६-२७ या वर्षासाठी महागाई दर ४.६ टक्के राहील, असा अंदाज वर्तवला होता.

## सीएनजीच्या दरात दोन रुपयांची वाढ

**नवी दिल्ली :** पेट्रोल आणि डिझेलप्रमाणे सीएनजीच्या दरात किलोमागे दोन रुपयांची वाढ करण्यात आली आहे. अवघ्या पंधरा दिवसांत सीएनजीच्या दरात तिसऱ्यांदा वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे राजधानी दिल्लीतील सीएनजीचा दर ८१.०९ रुपयांवरून ८३.०९ रुपये झाला आहे.

१५ दिवसांपासून इंधनाच्या दरात वाढ सुरू आहे. मागील १२ दिवसांत सीएनजी ५ रुपयांनी महागला आहे. त्याचप्रमाणे पेट्रोल आणि डिझेलच्या दरातही चौथ्यांदा वाढ झाली असून, या कालावधीत पेट्रोल आणि डिझेल जवळपास साडेसात रुपयांनी महाग झाले आहे. अमेरिका आणि इस्रायलने २८ फेब्रुवारी रोजी इराणवर संयुक्त हल्ला केला. त्यानंतर, इराणदेखील जोरदार प्रत्युत्तर दिले. तसेच, होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली. त्यामुळे खनिज तेल आणि नैसर्गिक



वायूचा जागतिक पुरवठा विस्कळीत झाला आहे.

इंधनाच्या दरात अखेरची वाढ २०२२ मध्ये झाली होती. लोकसभा निवडणुकीपूर्वी २०२४ मध्ये इंधनाच्या दरात २ रुपयांची कपात करण्यात आली होती. मागील दोन आठवड्यांपासून दरवाढीचा आलेख वाढत असल्याने महागाईचा भडका उडण्याची दाट शक्यता आहे.

• इंद्रप्रस्थ गॅस लिमिटेडकडून दिल्लीसह अन्य शहरांना सीएनजी तसेच घरांना आणि उद्योगांना पीएनजीचा पुरवठा होतो. सीएनजीच्या दरात वाढ झाली असली तरी पीएनजीच्या दरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. १५ मे पासून सीएनजी ५ रुपयांनी महागला आहे. १५ मे रोजी सीएनजी २ रुपयांनी महागला होता. २३ मे रोजी यात १ रुपयांची वाढ करण्यात आली होती. आता आणखी दोन रुपयांची वाढ करण्यात आली. प्रत्येक राज्यात पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीचे दर उपकरामुळे वेगवेगळे आहेत. मुंबईत सीएनजी ८४ रुपये दराने मिळत आहे. नोएडा आणि गाझियाबादमध्ये सीएनजीचा दर आता ९१.७० रुपये आणि गुरुग्राममध्ये ८८.१२ रुपये प्रति किलो आहे.



# दोन दिवसांत मान्सूनची आगेकूच

**पुणे :** नैऋत्य मोसमी पावसाची सीमा मंगळवारी कायम होती. पुढील दोन ते तीन दिवसांत नैऋत्य मोसमी पाऊस नैऋत्य व अग्नेय अरबी समुद्राचा काही भाग, पूर्व मध्य बंगालच्या उपसागरावरील काही भाग, अंदमान समुद्राच्या उर्वरित भागात दाखल होण्यास परिस्थिती अनुकूल आहे. त्यामुळे दोन दिवसांत मान्सूनची आगेकूच सुरू होईल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

केरळात पावसासाठी पोषक स्थिती आहे. केरळ लगतचा समुद्र व केरळ किनारपट्टीवर ढगांची दाटी झाली आहे. त्यामुळे केरळात पावसाला पोषक स्थिती आहे. तसेच तमिळनाडू, आंध्रा प्रदेश आणि कर्नाटकात पाऊस सुरू आहे. त्यामुळे केरळात लवकरच मान्सून दाखल होणार असल्याची स्थिती आहे. २६ मे रोजी मान्सून केरळात दाखल होईल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला होता. तसेच हा अंदाज चार दिवस मागे पुढे होऊ शकतो, असेही हवामान विभागाने स्पष्ट केले होते.

आज (बुधवारी) कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज आहे. विदर्भात मात्र उष्णतेची लाट कायम आहे. राज्यातील कमाल व किमान तपमानात पुढील दोन ते तीन दिवस फारसा बदल होणार नाही. त्यानंतर विदर्भातील तपमानात ३ ते ४ अंशाने घट होणार आहे. अमरावती, वर्धा, चंद्रपूर बऱ्याच ठिकाणी उष्णतेची तीव्र लाट येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. रात्री उकाडा असणार आहे. त्यामुळे वरील सर्व जिल्ह्यांना रेड अलर्ट देण्यात आला आहे.

नागपूर, गडचिरोली जिल्ह्यांना उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. उत्तर कोकणात दोन दिवस उष्ण व दमट वातावरण असणार आहे. पुढील ४८ तासात दक्षिण कोकण, मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जना व वीजांचा गडगडाटात पाऊस पडणार आहे. यावेळी ताशी ४० ते ५० कि.मी. वेगाने वारे वाहणार आहेत. या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे.

### पुण्यात ढगाळ वातावरण

पुणे शहर आणि परिसरात आज (बुधवार) पासून पुढील तीन दिवस दुपारपर्यंत ऊन असणार आहे. सायंकाळी आकाश ढगाळ होणार आहे. तसेच मेघगर्जना व वीजांच्या कडकडाटात हलक्या स्वरूपाचा पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

शहरात काल ३७ अंश कमाल, तर २४.३ अंश किमान तपमानाची नोंद झाली. शहरातील तपमानात घट झाली असली, तरी ऊकाडा कायम आहे. त्यामुळे ऊन आणि उकाड्याच्या सामना नागरिकांना करावा लागत आहे

# रस्ते झाडण कामाची ठेकेदारांची मक्तेदारी मोडीत निघणार

### महापालिका प्रशासनाचा निर्णय

**पुणे :** महापालिकेच्या हद्दीतील रस्ते झाडण कामामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेली विशिष्ट ठेकेदारांची मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी महापालिका प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यापुढे कोणत्याही एका ठेकेदाराला झाडण कामाची जास्तीत जास्त दोनच कंत्राटे देण्यात येणार असून, त्यामुळे निविदा प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्याबरोबरच सर्व कंत्राटदारांना समान संधी उपलब्ध होणार आहे. अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी याबाबत माहिती दिली.

महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांमार्फत रस्ते झाडण कामासाठी मनुष्यबळ पुरविण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविली जाते. मात्र, क्षेत्रीय कार्यालय स्तरावर होणाऱ्या या प्रक्रियेमध्ये एकाच ठेकेदाराला अनेक प्रभागांतील कामे मिळत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले होते. त्यामुळे काही मोजक्या ठेकेदारांची मक्तेदारी निर्माण झाली होती. तसेच निविदा प्रक्रियेमध्ये संशयास्पद 'चिठ्ठी पद्धत' वापरली जात असल्याच्या तक्रारी सातत्याने होत होत्या.

प्रशासनाच्या माहितीनुसार, एकाच ठेकेदाराकडे क्षमतेपेक्षा अधिक कामे गेल्यामुळे संबंधित कंत्राटदारांना मनुष्यबळाचे योग्य नियोजन करणे आणि कामाच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवणे कठीण जात होते. याचा थेट परिणाम शहराच्या स्वच्छतेवर होत असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. अनेक भागांत रस्त्यांवर कचरा पडून राहणे, नियमित साफसफाई न होणे आणि स्वच्छतेच्या तक्रारी वाढणे, अशा समस्या निर्माण होत होत्या.

या पार्श्वभूमीवर घनकचरा व्यवस्थापन विभागाने नव्या धोरणाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार झाडण कामासाठी मनुष्यबळ पुरविण्याच्या कोणत्याही ठेकेदाराला दोनपेक्षा अधिक कंत्राटे देता येणार नाहीत. त्यामुळे कामांचे योग्य नियोजन, मनुष्यबळाचे प्रभावी व्यवस्थापन आणि कामाच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवणे शक्य होणार असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

महापालिकेच्या या निर्णयामुळे निविदा प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येणार असून, नव्याने या क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या लहान आणि मध्यम ठेकेदारांनाही समान संधी उपलब्ध होणार आहे.

## तडीपार सराईतास कोयत्यासह अटक

**पिंपरी :** जिल्ह्यातून तडीपार करण्यात आलेल्या एका तडीपार सराईतास कोयत्यासह अटक करण्यात आली. ही कारवाई हिंदुस्थान अँटीबायोटिक कंपनीच्या मैदानात सोमवारी करण्यात आली. दिनेश गोरख माने (वय-३१, रा. विटकर चाळ, नेहरुनगर, पिंपरी) असे अटक करण्यात आलेल्या तडीपार सराईताचे नाव आहे. पोलिस शिपाई भागवत गायकवाड यांनी संत तुकारामनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. आरोपीला जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले होते. तरीही त्याने कोणतीही परवानगी न घेता शहरात प्रवेश केला. सध्या शहरात घातक शस्त्र बाळगण्यास बंदी असतानाही आरोपीकडे लोखंडी कोयता आढळला.

## कोठे काय ?

### सकाळी

- **१० :** मेळघाट सपोर्ट ग्रुपच्यावतीने सुस्थितीतील कपडे, भांडी आणि वापरण्यायोग्य सायकली संकलन मोहिम, स्थळ : विमलाबाई गरवारे प्रशाला, कर्वे रस्ता.
- **१० :** शेखर वैद्य यांचे ॲक्रेलिक आणि जलरंगाचे प्रदर्शन, स्थळ : राजा रवि वर्मा आर्ट गॅलरी, घोले रस्ता.
- **११ :** श्रीधर कुलकर्णी यांची छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यावर आधारित पिंपळाच्या पानांवर चितारलेली चित्रमालिका प्रदर्शन, स्थळ : पी. एन. गाडगीळ ॲंड सन्स, कर्वे रस्ता.
- **११ :** अक्षरधारा बुक गॅलरीतर्फे बाल कुमार शब्दोत्सव, स्थळ : अक्षरधारा बुक गॅलरी, बाजीराव रस्ता.

### सायंकाळी

- **५ :** साहित्य परिषदेच्या वर्धापनदिनानिमित्त पदाधिकारी व आजिव सभासदांचा स्नेहमेळावा, स्थळ : साहित्य परिषद.
- **५ :** संगीता माळवदकर आणि अरुण ठाकूर यांचा 'स्माईरत्न' पुरस्काराने गौरव, हस्ते : डॉ. श्रीपाल सबनीस, अध्यक्ष : प्रमोद आडकर, उपस्थिती : सचिन ईटकर, परशुराम वाडेकर, स्थळ : महामाता रमामाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, वाडीया महाविद्यालयासमोर.
- **५.३० :** पुणे मॅनेजमेंट असोसिएशनचा वर्धापनदिन सोहळा, उपस्थिती : आदित्य पिट्टी, अविनाश धर्माधिकारी, विरेंद्र सूद, गणेश निबे, स्थळ : सीपीआर सभागृह, पाषाण रस्ता.
- **६.३० :** व्याख्यान, विषय : सायबर गुन्हेगारी आणि स्वसंरक्षण, वक्ते : शिरीष देशपांडे, स्थळ : एसएनडीटी महाविद्यालय, कर्वे रस्ता.
- **६.३० :** व्याख्यान, विषय : इराण-इस्त्राईल युध्द-भारतावर परिणाम आणि भूमिका, वक्ते : दीपक करंजीकर, स्थळ : मुक्तांगण बालरंजन केंद्र, सहकारनगर.
- **७ :** अधिक मासानिमित अखंड हरिनाम सप्ताह व किर्तन, स्थळ : श्री विठ्ठल मंदिर, नवी पेठ.
- **७ :** 'लोकलेचा जागर-फोक प्रबोधन' सांस्कृतिक कार्यक्रम, स्थळ : गणेश कला क्रिडा मंच, स्वारगेट.

# संगीताची संवेदना असल्यास लेखन लयदार : पं. सत्यशील देशपांडे

### मसापतर्फे पुरस्काराचे वितरण



महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे ज्येष्ठ लेखिका प्रतिभा रानडे यांना जीवन गौरव पुरस्कार पं. सत्यशील देशपांडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

**पुणे :** लेखकांना संगीताची संवेदना आकलन झाल्यास गद्य वाक्ये देखील लयदार होतात. बंदिशीतल्या शब्दांमधून संवेदना तीव्र, तीक्ष्ण झाल्यास बंदिशीचे सादरीकरण प्रभावी ठरते. गाणाऱ्यांनी देखील भवतालच्या वाङ्मयाचा अभ्यास करावा, असे मत प्रसिद्ध गायक पं. सत्यशील देशपांडे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा १२१ वा वर्धापन दिन समारंभ व पुरस्कार प्रदान सोहळा मंगळवारी बालगंधर्व रंगमंदिरात पार पडला. यावेळी मसाप जीवनगौरव पुरस्काराने प्रतिभा रानडे यांचा तर डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्काराने डॉ. श्रीकृष्ण काकडे यांचा गौरव करण्यात आला. यावेळी अभिनेते हृषिकेश जोशी, माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण, प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर, कार्यवाह सुनील महाजन, सुनेत्रा मंकणी, माधव राजगुरु, प्रसाद मिरासदार, डॉ. नितीन संगमनेरकर उपस्थित होते.

देशपांडे म्हणाले, छंदोबद्ध मुक्तछंदालाही लय असते; परंतु आज मुक्तछंद लिहिणाऱ्या कवींचा छंदाचा अभ्यास नाही हे देखील जाणवते. साहित्यकृतीतून साकारलेल्या शब्दांना वैयक्तिक आणि सामाजिक संदर्भ देखील असतात आणि त्या संदर्भातून अर्थाच्या छटा बदलत राहतात. मनाला झालेल्या जाणीवांमधून उत्कृष्ट साहित्यकृतींची निर्मिती घडत असते. भावनेला शब्द करणे हे साहित्यिकाचे वैशिष्ट्य आहे.

हृषिकेश जोशी म्हणाले, चित्रकार, शिल्पकार आणि ग्रंथकार समकालीन माणसांचे आयुष्य साठवतात. लेखक आपल्या साहित्यकृतीतून वाचकाला संपूर्ण जग फिरवून आणू शकतात.

अविनाश धर्माधिकारी म्हणाले, महाराष्ट्राची भूमी ही संतांचा आणि हिंदवी स्वराज्याचा वारसा सांगणारी आहे. समाजाची चेतना आणि आत्मविश्वास जागृत ठेवण्याचे कार्य संतांनी केले आहे आणि हा वारसा मराठी भाषेच्या संस्कृतीत जाणवतो. उत्तरार्धात गीतकार वैभव जोशी यांनी 'द मनमौजी' हा कविता व गीतांचा कार्यक्रम सादर केला.

डॉ. स्वाती महाळंक यांनी प्रास्ताविक केले. डॉ. श्रीकृष्ण काकडे, राजेंद्र खेर, डॉ. कल्याणी हर्डिकर, योगेश सोमण यांनी मनोगत व्यक्त केले. अंजली कुलकर्णी, डॉ. आशुतोष जावडेकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रसाद मिरासदार यांनी आभार मानले.

### जयंतराव टिळकांनी लिखानाची संधी दिली

जीवनाच्या वाटचालीत मी वेगवेगळ्या विचारधारांच्या संपर्कात आले, पण कुठल्या एका विचारधारेशी बांधून घेतले नाही. आजवरच्या लेखनाने खूप आनंद दिला. चित्रविचित्र घटनांचे साक्षीदार होता आले. हे भाग्य की दुर्भाग्य माहित नाही. लेखनाच्या निमित्ताने आपल्या चौकटीतल्या जीवनापलिकडचे कठोर वास्तव पहायला शिकले. ज्येष्ठ नेते जयंतराव टिळक यांनी मला प्रथम 'केसरी'त लिखानाची संधी दिली. त्यानंतर मी लिहिते झाले. अशी भावना प्रसिद्ध लेखिका प्रतिभा रानडे यांनी व्यक्त केल्या.

# हडपसरमध्ये नशेच्या इंजेक्शनची बेकायदा विक्री

**पुणे :** बॉडी बिल्डिंग आणि नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या प्रतिबंधक औषधांची (इंजेक्शन्स) बेकायदेशीरपणे विक्री करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला पोलिसांनी हडपसर परिसरातून अटक केली.

अभिषेक खंडू भंडगे (वय-२५, रा. हिंगणे मळा, हडपसर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्यावर यापूर्वी हडपसर पोलिस ठाण्यात ११ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. शहरात २४ मे रोजी पहाटेपर्यंत गुन्हे शाखेकडून कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. त्यावेळी आरोपी अभिषेक भंडगे हा हिंगणे मळा येथील आकाश डांग माळी यांच्या खोलीत भाड्याने राहत असल्याचे दिसून आले. त्याने भाड्याच्या घरातूनच नशेसाठी वापरले जाणारे 'मेफेन्टरमाइन सल्फेट' हे प्रतिबंधक इंजेक्शन विनापरवाना विकत असल्याची माहिती युनिट सातचे सहाय्यक निरीक्षक मदन कांबळे आणि खंडणी विरोधी पथक-दोनचे पोलिस निरीक्षक राम राजमाने, पोलिस अंमलदार नितीन मुंढे, कानिफनाथ कारखेले, किरण पड्याळ यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्याठिकाणी छापा टाकला.

पोलिसांची चाहूल लागताच आरोपी अभिषेकने तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी त्याला पाठलाग करून पकडले. त्याच्या खोलीतून प्रतिबंधक इंजेक्शनच्या ८२ बाटल्या मिळून आल्या. या जप्त केलेल्या साठ्याची किंमत २८ हजार रुपये इतकी आहे. या प्रकरणी काळेपडळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पहिल्याच पावसात पुणे तुंबले

### शिवसेनेचा महापालिकेवर हल्लाबोल

**पुणे :** पहिल्याच मुसळधार पावसात शहरातील रस्ते, चौक, नाले आणि ड्रेनेज व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने महानगरपालिकेवर आक्रमक हल्लाबोल आंदोलन केले. शेकडो यावेळी शिवसैनिक महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारावर एकत्र येत जोरदार घोषणाबाजी करत प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला. शिवसेना पुणे शहर प्रमुख प्रमोद भानगिरे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाला शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख अमर घुले, माजी नगरसेविका सोनाली लांडगे, पंकज कोद्रे, श्रीराम चौक ज्येष्ठ नागरिक, शिवसेना पुणे शहरातील महिला आघाडी, युवासेना तसेच सर्व अंगीकृत संघटनांचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंदोलनादरम्यान शिवसैनिकांनी अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला. शहरातील आठ विधानसभा मतदारसंघांमध्ये फिरण्यासाठी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना प्रतीकात्मक होड्या भेट देण्यात आल्या. तसेच प्रवेशद्वारावर रोखण्यात आल्यानंतर काही शिवसैनिकांनी थेट गेटवर चढून आंदोलन तीव्र केले, ज्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी मुळा-मुठा नदीतील वाढत्या जलपर्णीच्या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी शिवसैनिकांनी अंगावर जलपर्णी घेऊन मी पुण्यातली जलपर्णी मला कधी काढणार? अशी घोषणाबाजी केली. नदी स्वच्छतेवर कोट्यवधी खर्च दाखवला जात असताना प्रत्यक्षात परिस्थिती बिकट असल्याचा आरोप करण्यात आला. पावसाळ्यापूर्व कामांतील निष्काळजीपणाविरोधात शिवसेना आणखी तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला. शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी संघर्ष सुरूच ठेवण्याचा निर्धार शिवसैनिकांनी व्यक्त केला.

प्रमोद भानगिरे म्हणाले, हजारो कोटींच्या निविदा काढूनही प्रत्यक्षात कोणतेही काम वेळेत आणि दर्जेदार झालेले नाही. अवघ्या अर्ध्या तासाच्या पावसात संपूर्ण शहर जलमय झाले. सामान्य नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. हा निधी गेला कुठे, याचा जाब आता पुणेकर विचारणार आहेत.

पहिल्याच पावसात शहरातील अनेक भागात गुडघाभर पाणी साचले, वाहतूक विस्कळीत झाली, तर अनेक घरांमध्ये व दुकानांमध्ये पाणी शिरले. यावरून महापालिकेच्या पावसाळ्यापूर्व कामांतील हलगर्जीपणा उघड झाला आहे.

# भुसार बाजारातील शेतीमालाच्या विक्रीवर आता शुल्क

## एक टक्का युजर चार्जेस; बाजार समितीने काढले परिपत्रक

**पुणे :** मार्केटयार्डातील भुसार बाजारात ज्या वस्तूंवर बाजार शुल्क घेतली जात नाही. अशा सर्व प्रकारच्या वस्तूंवर एक टक्का "युजर चार्जेस" (वापर आकार) आकारण्यात येणार आहे. २८ मार्च २०२२ पासून आवक झालेल्या अनियमित शेतीमाल, बिगर शेतीमाल आणि अनुषंगिक मालावर १ टक्का युजर चार्जेस तात्काळ भरण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानंतर दरमहा हे चार्जेस भरावे लागणार आहेत.

मार्केट यार्डातील भुसार विभागात विविध प्रकारच्या सुमारे ५ हजारांपेक्षा जास्त वस्तू येतात. यामध्ये फक्त ६६ वस्तूंवरच शुल्क आकारले जाते. त्यापैकी ३५ वस्तूंवर १ रुपया, ३० वस्तूंवर ७५ पैसे आणि एका वस्तूवर २५ पैसे सेस आकारला जातो. तर उर्वरित वस्तू या नियमन मुक्तीमध्ये येतात. त्यामुळे त्यांच्याकडून बाजार शुल्क आकारले जात नाही. राज्य सरकारने कृषी माल नसलेल्या वस्तूंच्या खरेदी-विक्रीवर युजर चार्जेस घेण्यासाठी कायद्यात बदल करून २०२२ मध्ये परवानगी दिली आहे. याच्या आधारे बाजार समितीने युजर चार्जेस लावण्यास परवानगी देण्याचा प्रस्ताव २०२२ मध्ये पणन संचालकांकडे पाठविला. यावर बाजार समिती, व्यापाऱ्यांची बाजू ऐकून घेण्यात आली. त्यानंतर बाजार समितीने सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे २२ मे रोजी युजर चार्जेस आकारण्याच्या परवानगीचा निर्णय पणन संचालकांनी दिला. त्यानुसार बाजार समितीने युजर चार्जेसबाबत परिपत्रक काढले आहे.

### गुळ भुसारची सेस १० ते १५ कोटींनी वाढणार

भुसार बाजारातून दररोज २०० ते २५० वाहनांमधून १००० ते १५०० टन मालाची साधारणतः आवक होते. यातून वार्षिक ३० कोटींचा सेस जमा होतो. युजर चार्जेस लागू झाल्यानंतर त्यामध्ये वाढ होऊन वर्षाकाठी सुमारे ४० ते ४५ कोटींचा सेस जमा होईल असा अंदाज बाजार समितीतील काही अधिकाऱ्यांनी वर्तविला आहे.

### बाजार समितीच्या उत्पन्नात वाढ होईल

बाजार समितीत खरेदी-विक्री होणाऱ्या बऱ्याच वस्तूंवर नियमन मुक्ती होती. याचा परिणाम उत्पन्नावर होत होता. मात्र, आता युजर चार्जेस आकारण्यास पणन संचालकांनी परवानगी दिली आहे. त्यामुळे बाजार समितीच्या उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे. बाजारात अधिकाधिक चांगल्या सुविधा बाजार समिती देऊ शकेल.

**– डॉ. राजाराम धोंडकर**, सचिव, पुणे बाजार समिती

### शुल्काचा निर्णय वादग्रस्त ठरणाण्याची शक्यता

मार्केटयार्डातील भुसार विभागातील ज्या वस्तूंवर बाजार शुल्क (सेस) आकारला जात नाही. त्या वस्तूंवर अन्य कोणताही शुल्क आकारा जाऊ नये, अशी व्यापाऱ्यांची भूमिका आहे. मात्र आता बाजार समिती प्रशासनाने एक टक्का युजर चार्जेस आकारणार असल्याचे परिपत्रक काढले आहे. त्यामुळे या परिपत्रकावरून व्यापारी आणि बाजार समिती प्रशासन यांच्यात वाद होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## सर्वात मोठा सद्भावना वृद्धाश्रम गुजरात येथे

**मुंबई :** जगातील सर्वात मोठे मोफत सद्भावनावृद्धाश्रम गुजरातमधील विनुभाई बच्छुभाई नगरेचा येथील नवीनपरिसरात झाला आहे. या वृद्धाश्रमात निराधार, आजारी आणि अंथरुणाला खिळलेल्या वृद्धांना आयुष्यभर पूर्णपणे मोफत राहण्याची सोय उपलब्ध करून देण्याचा निर्धार सद्भावना वृद्धाश्रमाने केला आहे नुकतीच मुंबई प्रेस क्लब मध्ये पत्रकारपरिषद आयोजित केली होती त्यात गरजुंना मोफत प्रवेश दिला जाणार असल्याची माहिती आश्रमाचे विश्वस्त नवीन गालायांनी पत्रकार परिषदेत दिली, गुजरात राजकोट येथे' विनुभाई बच्छुभाई नगरेचा परिसर' मध्ये वृद्धाश्रम चालवले जातेया भव्य प्रकल्पाची माहिती संस्थेच्या सदस्यांनी दिली यामध्ये सद्भावना वृद्धाश्रम २० लाख चौरस फूट बांधकामाचे आहे. ७ टॉवर्समधील प्रत्येक टॉवरमध्ये ११ मजले आहेत, जेणेकरून प्रत्येक व्यक्तीला पुरेशी जागा आणि काळजी घेता यावी. तसेच, जैन समाजातील वृद्धांसाठी एक संपूर्ण टॉवर वेगळाबनवण्यात आला आहे, जिथे एक मंदिरही बांधण्यात आलेआहे. ५०० कोटी रुपये खर्च करून, १४०० खोल्यांमध्ये ५००० निराधार, आजारी आणि अंथरुणाला खिळलेल्या वृद्धांची सोय येथे मोफत केली जाईल.

## फॅशन फॅक्टरीचा 'ब्लॅक वीकेंड सेलची घोषणा

**मुंबई :** नवीन कपड्यांच्या खरेदीचा विचार करणाऱ्या ग्राहकांसाठी फॅशन फॅक्टरीने 'ब्लॅक वीकेंड सेल'ची घोषणा केली आहे. या सेलमध्ये ग्राहकांना "Buy 1 Get 2 Free" म्हणजेच एक खरेदी केल्यावर दोन वस्तू मोफत मिळणार आहेत. हा सेल २७ मे ते ३१ मे दरम्यान देशभरातील फॅशन फॅक्टरीच्या स्टोअर्समध्ये आयोजित करण्यात आली आहे. कंपनीच्या माहितीनुसार, या ऑफरमध्ये ऑफिस वेअर, कॅज्युअल वेअर, पार्टी वेअर, डेनिम, शर्ट्स, ट्राउझर्स, टी-शर्ट्स तसेच महिलांच्या एथनिक वेअर अशा जवळपास सर्व प्रकारच्या कपड्यांचा समावेश असेल. यामध्ये ली कूपर, लुई फिलिप, पार्क अव्हेन्यू, पीटर इंग्लंड, किलर आणि ड्युक यांसारख्या नामांकित ब्रँड्सवरील ऑफर्सही उपलब्ध असतील.

## कॅनडात स्थायिक पत्नीचा हिंसाचार दावा न्यायालयाने फेटाळला

**पुणे :** कॅनडामध्ये वास्तव्यास असलेल्या एका पत्नीने पती आणि त्याच्या कुटुंबियांच्या विरोधात येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात दाखल केलेला कौटुंबिक हिंसाचाराचा दावा अधिकार क्षेत्र नसल्याने फेटाळून लावला. पत्नीने दाखल केलेला दावा न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येत नाही, तसेच मालकी हक्काचा पुरावा न्यायालयाचे कार्यक्षेत्रात ठरवू शकत नाही, असे नमूद करत खडकी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एल. व्ही. श्रीखंडे यांनी हा निकाल दिला.

या प्रकरणातील पत्नी रेखा आणि पती सुरेश (नावे बदललेली) याचा मुंबईत लग्न नोंदणी पद्धतीने विवाह झाला होता. त्यानंतर हिंदू विवाह पद्धतीनुसार अलिबाग येथेही विवाह सोहळा पार पडला. पतीचे घर तसेच पत्नीचे माहेर मुंबई येथे असून विवाहानंतर दोघे काही काळ अलिबाग येथे एकत्र वास्तव्यास होते. त्यानंतर दोघेही कॅनडात स्थायिक झाले.

## दुचाकी चालकांकडून टेम्पो चालकाला मारहाण

**पिंपरी :** भुकूम येथे किरकोळ अपघाताच्या कारणावरून दोन दुचाकीस्वारांनी टेम्पो चालकाला स्टीलच्या कड्याने आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. ही घटना रविवारी घडली.

श्लोक रावल आणि मोहित शर्मा (दोघे रा. वनालिका अपार्टमेंट, पिरंगुट, ता. मुळशी) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रोहीत रघुनाथ घारे (वय-१९, रा. पिरंगुट, ता. मुळशी) यांनी बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

केसरी
पुणे, २७ मे २०२६/३

## अण्णा द्रमुकच्या आणखी एका आमदाराचा राजीनामा

**चेन्नई :** तामिळनाडूतील अण्णा द्रमुकच्या आणखी एका आमदाराने मंगळवारी पदाचा राजीनामा दिला. त्यामुळे राजीनामा देणाऱ्या आमदारांची संख्या चारवर पोहोचली आहे.विशेष म्हणजे, अण्णा द्रमुकचे प्रमुख ए.के. पलानीस्वामी यांनी विधानसभा अध्यक्षांची भेट घेऊन राजीनामे स्वीकारु नये, अशी विनंती केली असतानाच काही वेळातच चौथ्या आमदाराने राजीनामा दिला. मरगाथम कुमारवेल (मदुरंतकम), पी. सत्यभामा (धारापुरम) आणि एस. जयकुमार (पेरुंदुरई) यांनी सोमवारी राजीनामा दिला होता. तर काल इसाक्की सुबैया यांनी विधानसभा अध्यक्षांकडे राजीनामा सोपविला. ते देखील मुख्यमंत्री जी. जोसेफ विजय यांच्या नेतृत्वाखालील टीव्हीकेत सामील होण्याची शक्यता आहे.

## बीजेडीचे माजी खासदार भाजपमध्ये

**नवी दिल्ली :** बिजू जनता दलाचे (बीजेडी) माजी राज्यसभा सदस्य देबाशीष सामंतराय यांनी मंगळवारी भाजपमध्ये प्रवेश केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांच्या कामामुळे आपण प्रभावित झालो आहोत, असे त्यांनी यावेळी सांगितले. राजधानी दिल्लीत भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश पार पडला. ओडिशामध्ये भाजपला अधिक मजबूत करण्यासाठी आणि पंतप्रधानांचा 'विकसित भारत' साकार करण्यासाठी आपण काम करू, असे त्यांनी नमूद केले. पक्षप्रवेशानंतर सामंतराय यांनी पक्षाच्या मुख्यालयात भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांची भेट घेतली. या प्रसंगी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे वरिष्ठ नेते धर्मेंद्र प्रधान उपस्थित होते.

# कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नाशिकमध्ये आंदोलन

## महामार्ग रोखला



**नाशिक :** नाशिक जिल्ह्यात महाविकास आघाडीच्या नेतृत्वाखाली मंगळवारी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी सरकारच्या कांदा खरेदी दरांविरोधात आंदोलन केले. तसेच, मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला. राज्यातही ठिकठिकाणी आंदोलन करण्यात आले.

'कांदा उत्पादक शेतकरी क्रांती महामोर्चा'ने चांदवड चौफुली येथे मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोखा केला. त्यामुळे महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या आणि वाहतूक पूर्णपणे कोलमडली होती. यावेळी पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले. काही आंदोलकांनी महामार्गावर अडकलेल्या वाहनांच्या टायरमधील हवा काढण्याचा प्रयत्न केला.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार, शिवसेना (ठाकरे गट) आमदार अंबादास दानवे आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे आंदोलनात सहभागी झाले होते. ते बैलगाडीतून आंदोलनात सहभागी झाले होते. पोलिसांनी त्यांनादेखील ताब्यात घेतले.

केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालयाने रब्बी कांदा खरेदीसाठी किमान हमी खरेदी दर १,५८० रुपये प्रति क्विंटल असा जाहीर केला आहे. यामुळे शेतकरी नाराज आहेत. शेतकऱ्यांना कांद्यासाठी २४ रुपये प्रति किलो असा दर मिळायला हवा. सरकार आमच्या आंदोलनाला घाबरले आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि इतर मंत्री आज (बुधवारी) दिल्लीला जाणार आहेत. त्या ठिकाणी काय निर्णय होतो, ते पाहूयात, असे रोहित पवार म्हणाले.

विशेष म्हणजे, आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना 'मेलोडी' चॉकलेटचे वाटप करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांना 'मेलोडी' चॉकलेट भेट म्हणून दिली होती. त्यानंतर, 'पारले इंडस्ट्रीज'च्या समभागांचे भाव वधारले होते. मोदींनी आता कांदे भेट म्हणून द्यावेत, जेणेकरून कांद्याचे भावही गगनाला भिडतील, असे आंदोलकांनी सांगितले.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी कांद्यासाठी ३००० रुपये किमान आधारभूत किंमत मिळावी, यांसह विविध मागण्या केल्या आहेत.

राज्यात सध्या कांद्याचे दर मोठ्या प्रमाणात घसरले असून शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नसल्याची स्थिती आहे. वाढता वाहतूक खर्च, साठवणूक अडचणी आणि मंदीमुळे शेतकरी संकटात सापडले आहेत.

### पंतप्रधानांचा एकेरी उल्लेख

काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ यांनी आंदोलकांसमोर बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एकेरी उल्लेख करत आक्रमक आणि आक्षेपार्ह भाषा वापरली. त्यावरून, भाजपने सपकाळ यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले.

# लोकसंख्येतील बदलाचे कारण शोधण्यासाठी समिती



**नवी दिल्ली :** देशातील लोकसंख्येतील बदलाचे कारण शोधण्यासाठी केंद्रीय गृहमंत्रालयाने एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या समितीची घोषणा केली. ही समिती अवैध स्थलांतर आणि इतर असामान्य कारणांमुळे संपूर्ण देशात होत असलेल्या लोकसंख्येतील बदलाचे कारण शोधेल, असे शहा यांनी 'एक्स' या समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०२५ रोजी केलेल्या घोषणेनुसार या समितीची स्थापना करण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती प्रकाश प्रभाकर नावलेकर यांच्या अध्यक्षतेखाली ही कामकाज पाहणार आहे. या समितीमध्ये जनगणना आयुक्तांसह निवृत्त आयएएस अधिकारी दुर्गा शंकर मिश्रा, माजी आयपीएस अधिकारी बालाजी श्रीवास्तव आणि डॉ. शमिका रवी यांचा सदस्य समावेश आहे. गृह मंत्रालयाचे संयुक्त सचिव (परदेशी-१) हे या समितीचे सदस्य-सचिव म्हणून काम पाहतील, असे शहा यांनी नमूद केले. लोकसांख्यिकीय बदल हा एक गंभीर मुद्दा आहे; जो केवळ देशाच्या सार्वभौमत्वाशीच नव्हे, तर राष्ट्रीय सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था, सामाजिक रचनेतील सखोल बदल आणि आदिवासी समाजाचे जतन या बाबींशीही जोडलेला आहे. ही समिती बेकायदेशीर स्थलांतर आणि इतर असामान्य कारणांमुळे संपूर्ण देशात होत असलेल्या लोकसंख्येतील बदलाचे सर्वंकष मूल्यांकन करेल. यासोबतच, धार्मिक आणि सामाजिक स्तरावरील लोकसंख्या बदलांच्या कारणांचे विश्लेषण करून उपाययोजना सादर करेल, असेही शहा यांनी म्हटले आहे.

## बांगला देशात परत जाण्यासाठी सीमेवर घुसखोरांचा ओघ

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली भाजप सरकारने घुसखोरांविरुद्ध विशेष मोहीम सुरू केली आहे. त्यामुळे घुसखोरांचे धाबे दणाणले असून बांगला देशात परत जाण्यासाठी सीमेवर घुसखोरांनी गर्दी केली आहे.

ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकार उलथवून पश्चिम बंगालमध्ये भाजप सत्तेत आला आहे. मुख्यमंत्री सुवेंदू यांनी राज्यात घुसखोरांविरुद्ध 'ओळख पटवा, हटवा आणि माघारी पाठवा' हे धोरण हाती घेतले आहे. त्यामुळे बांगलादेशी घुसखोरांचे धाबे दणाणले आहे. उत्तर २४ परगणा आणि मालदा येथे अनेक ठिकाणी बांगलादेशमध्ये परत जाण्यासाठी घुसखोरांनी गर्दी केली आहे. यापैकी अनेक जण पश्चिम बंगालमध्ये वेगवेगळ्या भागात बेकायदा राहत होते. अधिकारी यांनी सीमा सुरक्षा दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत नुकतीच एक बैठक घेतली होती. या बैठकीत सुवेंदू यांनी ज्या व्यक्ती नागरिकत्वाच्या कायद्याच्या चौकटीबाहेर आहेत, त्यांना घुसखोर मानले जाईल आणि पोलीस त्यांना अटक करून बीएसएफच्या स्वाधीन करतील, असे सांगितले होते.




10 YEAR WARRANTY | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | 72198 21111 | Flipkart | amazon.in

*नियम आणि अटी लागू. ऑफर 31 मे 2026 पर्यंत वैध आहे. पल्सर N160 USD सिंगल सीट व्हेरिएंटवर ई-कॉम ऑफर, संबंधित ई-कॉम भागीदाराच्या अटींवर अवलंबून. ई-कॉम ऑफर भागीदारांनुसार बदलू शकतात. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सकडून, प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर जागेत केली आहेत. या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नये आणि नेहमी वाहतूक व सुरक्षिततेचे नियम पाळावे.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Pune • Chinchwad** SHOURYA BAJAJ 7875100041 • **Wakad** Garve BAJAJ 9158339300 • **Wakdewadi** SAI SERVICE BAJAJ 9923208066 • **Satara Road VOHRA** BAJAJ 8055336676 • **Market Yard VOHRA** BAJAJ 8055336676 • **Hadapsar VOHRA** BAJAJ 8055336676 • **Phugewadi** SAI SERVICE BAJAJ 9923208060 • **Kothrud** SAI SERVICE BAJAJ 9923208082 • **Baner** SAI SERVICE BAJAJ 9168626054 • **Pimple Gurav** GARVE BAJAJ 7507999607 • **Hinjewadi** GARVE BAJAJ 9209403756 • **Chakan** SHOURYA BAJAJ 8669999005 • **Talegaon** SHOURYA BAJAJ 9028457481 • **Bhosari** SHOURYA BAJAJ 7875100040 • **Narayangaon** SHOURYA BAJAJ 9119220334 • **Shirur** SHOURYA BAJAJ **9112220336** • **Wagholi** ISHANYA BAJAJ 8055990044 • **Shivajinagar** ISHANYA BAJAJ 7066031551 • **Swargate** ISHANYA BAJAJ 7774062204 •**Baramati** KAMAL BAJAJ 7798885952 • **Phaltan** KAMAL BAJAJ 8956939999• **Indapur** SONAI BAJAJ 7028118353 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031 • **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998.

गजालिश्रेष्ठा । या निबिडतर कांतारजठरी । मदांधाक्षा मित्रा । क्षणभरिही वास्तव्य न करी ।
नखाग्रांनी येथे गुरूतरशिला भेदुनि करि । भ्रमाने आहे रे, गिरिकुहरि हास निद्रित हरि ।।

केसरी

तव स्मरण संतत स्फुरणदायी आम्हां घडो। त्वदीय गुणकीर्तनध्वनि सुरम्य कर्णी पडो।
स्वदेशहितचिंतनाविण दुजी कथा नावडो। तुझ्यासमचि आमुची तनुहि देशकार्यी पडो।।

# युद्धच हवे?

इराणविरुद्धच्या युद्धात नामुष्की झाल्यावर अमेरिकेने एकतर्फी युद्धविराम जाहीर केला. दोन्ही देशात लवकरच शांतता करार होईल, अशी घोषणा डोनाल्ड ट्रम्प यांनी करून टाकली. यानंतर, आपल्या आततायी कृतीने ट्रम्प आगीत तेल ओतणार नाहीत आणि होर्मुझची सामद्रधुनी खुली होऊन तेल संकटाची तीव्रता कमी होईल, अशी अपेक्षा होती; पण त्यांची युद्धखोर मानसिकता आड येते. इराणचे जहाज अमेरिकेने नुकतेच स्फोटाद्वारे उडवले. स्वसंरक्षणाचे कारण यासाठी अमेरिकेने दिले. दक्षिण लेबाननमधील अल क्लैला या ठिकाणी इस्रायलने हवाई हल्ले केले. या दोन्ही देशांना युद्ध थांबावे असे खरोखरच वाटते का? याबद्दल प्रश्न निर्माण होतात. याचे आणखी कारण म्हणजे अब्राहम करार स्वीकारण्याची अमेरिकेने आखाती देशांना घातलेली अट! ज्या देशांचा आताच्या युद्धाशी थेट संबंध नाही, त्यांना शांतता करारासाठी ही अट घालणे, हा ट्रम्प यांचा वेडगळपणा वाटू शकतो, पण ती



**दक्षिण इराणमध्ये अमेरिकेने जहाजावर हल्ला केल्यावर इराणने सुद्धा प्रत्युत्तर दिले. तेथील रिव्होल्युशनरी गार्डने अमेरिकेची ड्रोन पाडल्याचा दावा केला. शांतता करारासाठी ही चिन्हे चांगली नाहीत.**

दीर्घकालीन व्यूहरचना असावी, असे दिसते. समृद्ध युरेनियम इराण अमेरिकेला सोपविणार का?, क्षेपणास्त्र निर्मिती कार्यक्रमावर बंधन घातल्यास ते मान्य करणार का? या आणि आखातात शांतता राहण्याच्या दृष्टीने आवश्यक अटी, हाच अमेरिका – इराण यांच्यातील संभाव्य शांतता कराराचा भाग असू शकतो. यात अब्राहम कराराचा संबंध काय? पण अमेरिकेने शांतता करारामध्ये इतर आखाती देशांनाही ओढून घेतले आहे. आखाताबाहेरील पाकिस्तानचाही त्यात समावेश आहे. इस्रायलशी कोणतेही राजनैतिक संबंध न ठेवण्याची बहुसंख्य इस्लामी देशांची भूमिका आहे. जगाला दाखविण्यासाठी ही भूमिका, पण इस्रायलच्या मागे कायम पाठबळ उभ्या करणाऱ्या अमेरिकेचे 'प्रतिनिधी' म्हणून काम करण्यात त्यांना अडचण नसते!

## तेलावरील वर्चस्व कमी करण्यासाठी...

इस्रायलला असलेला धोका कमी करण्यासाठी ट्रम्प यांच्या पुढाकाराने २०२३ मध्ये, म्हणजे त्यांच्या पहिल्या कार्यकाळात अब्राहम करार आला. संयुक्त अरब अमिरातीसह आखाताबाहेरील काही देशांनी त्यावर स्वाक्षरी केली आहे. सौदी अरेबिया देखील स्वाक्षरी करण्याच्या बेतात होता; पण तेव्हा ते झाले नाही. या करारावर स्वाक्षरी म्हणजे इस्रायलला मान्यता देणे! त्यामुळे इराण–अमेरिका युद्धात मध्यस्थी करणाऱ्या पाकिस्तानची अडचण झाली आहे. पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री ख्वाजा आसिफ यांनी पाकिस्तान अब्राहम करारापासून दूर राहील, असे जाहीर केले आहे. समजा इराण–अमेरिका यांच्यात शांतता करार झालाच, तर पुढच्या काळात इराण अथवा इस्रायल एकमेकांविरुद्ध आक्रमक पावले उचलणार नाहीत हे कशावरून? आताच्या युद्धात इराणने अमेरिकेपेक्षा तिच्या मित्र देशांना अधिक दणका दिला. ज्या – ज्या ठिकाणी आखातात अमेरिकेचे लष्करी तळ आहेत त्या सर्व देशांवर हल्ले करून इराणने युद्धाचे चित्र बदलले. लष्करी तळ असूनही अमेरिका आपले संरक्षण करू शकत नाही, हे अनेकांना कळून चुकले. अशावेळी अब्राहम कराराद्वारे संरक्षणाचे गाजर त्यांना दाखविले जात आहे, असे म्हणता येईल. त्याचवेळी अमेरिकेने आपले लष्करी तळ असलेल्या देशांबरोबर मैत्रीचा कितीही आव आणला तरी पश्चिम आशियाचे तेल वर्चस्व अमेरिकेला कधी ना कधी संपवायचे आहे. मुळात तेलाचे तेथील साठे झपाट्याने कमी होत आहेत. या देशांच्या अर्थव्यवस्थेचा भावी काळातील आधार अमेरिकेची मदत, हाच असू शकतो. आताच्या स्थितीबद्दल बोलायचे तर इराणच्या तेल विक्रीत जेवढे अडथळे आणता येतील तेवढे ते आणून जगाला आपल्याकडून तेल खरेदी करण्यास भाग पाडायचे, हा उद्देश स्पष्ट दिसतो. त्यासाठी व्हेनेझुएलाचा पर्याय अमेरिकेकडून पुढे केला जात आहे. भारताला देखील तसे सुचविण्यात आले आहे. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांची भारतभेट व्यापार करारातील अडथळे दूर करण्याबरोबरच तेल खरेदीबाबतही होती. आमच्या ऊर्जा गरजेनुसार किफायतशीर पर्यायाचे स्वातंत्र्य आम्हाला आहे, असे भारत म्हणत असला तरी अमेरिकेचा दबाव वाढत आहे, हे नाकारण्यात अर्थ नाही. अब्राहम करारात अमेरिकेच्या अपेक्षेनुसार आणखी देश सामील झाल्यास तो इराणसाठीही धोक्याचा इशारा ठरणार आहे. त्यामुळे एका दगडात अनेक पक्षी मारण्याचा उद्योग ट्रम्प करू पाहात आहेत.

# विद्येशिवाय जीवनच व्यर्थ

अलीकडे शिक्षणाचा मूलभूत अर्थ मुळात हरवत चालला आहे. स्वतःच्या गरजेप्रमाणे शिक्षणाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. एकीकडे माहितीलाच विद्या म्हटले जात आहे. मार्कांचा उंचावलेला आलेख म्हणजे विद्या. परीक्षेत अधिकाधिक उत्तराच्या दिशेने माहिती ओकत राहणे म्हणजे विद्या असे मानले जात आहे. अधिकाधिक पैसे मिळून देते ती खरी विद्या असे म्हणण्यापर्यंत विद्येचा दर्जा खालावण्याचा प्रयत्न वर्तमानात केला जात आहे. विद्या म्हणजे केवळ माहिती नाही किंवा पुस्तकाशी संबंधित आशय म्हणून जे ज्ञान मानले जाते ते देखील नाही. विनम्रता, उपकार, उपदेश आणि समाजहिताच्या दृष्टीने विचारांचा संगम म्हणजे विद्या. आपल्याला परीक्षेत किती मार्क मिळाले त्यावर तुमच्या विद्येचा दर्जा, स्थान अवलंबून असत नाही. मानवी जीवनात पैसे मिळवून देते ती काही विद्या नाही. जीवन परिवर्तनाची वाट दाखवते ती विद्या; मात्र मानवी जीवनात उत्थान घडवण्याच्या दृष्टीने विद्या हीच खरी संपत्ती आहे. महात्मा जोतिबा फुले यांनी विद्येचे मोल आपल्या अखंडामध्ये अत्यंत सुस्पष्ट शब्दांत सांगितले आहे. विद्येविना मती गेली असे सांगत विद्येच्या अभावी जीवनात कितीतरी अपयशाचे मार्ग अनुसरावे लागतात. त्यामुळे विद्येचा प्रभाव आणि परिणाम ज्यांना अनुभवास येतो त्यांना विद्येचे मोल सहजतेने लक्षात येते. त्यामुळे मानवी जीवनाच्या उत्थानाचा विचार करता विद्या हीच खरी शक्ती आहे हे लक्षात घ्यायला हवे. विद्या हीच मानवी जीवनासाठीची खरी शोभा आहे. विद्या हाच मानवी जीवनातील दुःखापासून खऱ्या मुक्तीचा मार्ग आहे. विद्येशिवाय जीवनात कशालाही अर्थ नाही. जीवनाचे मोल समजून घ्यायचे असेल, तर प्रत्येकाने विद्येची वाट अनुसरण्याची गरज आहे.

**प्रकाशाचा मार्ग**

आज विद्या प्राप्त असलेली माणसे समाजात अधिकाधिक आदराला पात्र असायला हवीत; मात्र अलीकडच्या काळात विद्या म्हणजे सरस्वतीच्या उपासकांची प्रतिष्ठा हरवताना दिसते. त्याचवेळी लक्ष्मीच्या उपासकांची प्रतिष्ठा उंचावते. विद्या हाच एकेकाळी प्रतिष्ठेचा मार्ग होता. आज तो मार्ग अत्यंत अरुंद होत चालला आहे. हा मार्ग अधिक अरुंद होत जाणे याचा अर्थ आहे मानवी जीवनाचा ऱ्हास होत जाणे आहे. शिक्षण आणि शिक्षण घेणाऱ्या पदवीधारकांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे हे खरेच; पण शिक्षण घेऊन पदवीधर होताना विद्या प्राप्त करणारी माणसे मात्र कमी होत चालली आहे. मुळात विद्येचा मार्ग ही साधना आहे. ती साधना आपण कशी करतो त्याला अधिक मोल आहे.




माणसांच्या जीवनात शिक्षणामुळे परिवर्तनाची वाट सापडत असते. विद्या म्हणजे जीवनातील अंधकारापासून मुक्ती आणि जीवन प्रकाशाचा मार्ग असतो; मात्र आज विद्या म्हणजे शिक्षण घेणारे आणि विद्यापासून दूर असणारी अर्थात अशिक्षित असलेल्या माणसांमध्ये कोणताच फरक दिसत नाही. याचा अर्थ आहे शिक्षण घेऊनही विद्या प्राप्त होतेच असे घडत नाही. कारण शाळा–महाविद्यालये ही तर फक्त माहितीचीच केंद्रे बनली आहेत. तेथे विद्येचा मार्ग नाही. त्यामुळे समाजात लहान माणसांच्या सावल्या अधिक उंच पडू लागल्या आहेत. त्यामुळे शिक्षण आपोआपच अर्थहीन बनत चालले आहे. शिकलेली माणसे अधिक लबाड असल्याचे समाजात अधोरेखित होते. शिकलेली माणसेच अधिक भ्रष्ट, लबाड, भामटी आणि विश्वासघातकी असल्याचे प्रतिबिंबीत होताना दिसते आहे. एका अर्थाने विद्येचा मार्गच अनुसरला जात नसल्याने जीवनात परिवर्तनाची वाट सापडताना दिसत नाही. जी वाट डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना सापडली होती, त्या वाटा अलीकडच्या काळात चालणे फारसे घडत नाही.

मुळात अलीकडे शिक्षणाचा पूर्णतः बाजार झाला आहे. शिक्षणात विद्यार्थी हा ग्राहक झाला आहे आणि शाळा, शिक्षक विक्रेते झाले आहेत. शिक्षणासाठी पैसा मोजला जातो. शिक्षण पैसे देऊन घेतले जात असल्याने तेथे शिक्षणासाठी धडपडणाऱ्या शिक्षकांविषयीची आत्मीयता संपुष्टात आली. शिक्षकांचे कर्मचाऱ्यात रूपांतर झाले आहे. त्यामुळे असलेली बांधिलकी आणि नाते काहीसे सैल होत चालले आहे. अनेकदा शिक्षणासाठी पैसा ओतला जात असल्याने विद्यार्थ्यांच्या मनात अहंकाराचे पोषण होताना दिसते. त्यामुळे शिक्षणातून अहंकार नष्ट होण्याची गरज असताना, अलीकडे अहंकाराचे पोषण आणि भरण होताना दिसत आहे. शिक्षणातून अहंकार संपुष्टात येण्याची गरज असताना, अलीकडे शिकलेली माणसेच अधिक अहंकारी बनलेली आपल्याला दिसत आहेत. समर्थ रामदास स्वामी हे आपल्या दासबोधातील अनेक श्लोकांच्या माध्यमातून नेमके शिक्षण म्हणजे काय, विद्यार्थ्यांचे कर्तव्य कोणते आहे, शिक्षकांची भूमिका काय असायला हवी? या संदर्भाने विवेचन करत आहेत. समर्थ रामदास स्वामी सांगत आहेत की, शिक्षण घेताना विद्यार्थ्यांनी अहंकार न ठेवता, संपूर्ण शिक्षण व्यवहार आणि तेथे कार्यरत असलेल्या माणसांसोबत विनम्रतेने व्यवहार करायला हवा. मुळात विनम्रतेचा विचार असल्याशिवाय ज्ञानाचे ग्रहण होण्याची शक्यता असत नाही. शिक्षणाच्या प्रक्रियेत कार्यरत असलेल्या प्रत्येक माणसाच्या नात्यातील वीण हवी. त्याचबरोबर विद्यार्थी, शिक्षक, समाज यांच्यातील नाते नम्रतेवर आधारित असावे. आई आणि मुलगा यांच्या नात्यात कितीतरी गोडवा असतो. तो गोडवा एकप्रकारे स्नेहबंधच असतो. त्यामुळे तो आपण किती विकसित करतो त्यावर बरेच काही अवलंबून असते.

**प्रश्न विचारणे हरवले**

ज्ञान मिळवण्याच्या दृष्टीने शिक्षणाच्या प्रक्रियेत काही घडायला हवे आहे. त्यामुळे शिक्षणाच्या प्रक्रियेत ज्ञान मिळवण्यासाठी प्रश्न विचारणे घडायला हवे आहे. आज आपल्या शिक्षणात प्रश्न विचारणे हरवले आहे. प्रश्न जसे विचारणे घडत नाही, त्याप्रमाणे प्रश्न पडतील अशी व्यवस्था शिक्षणातून उभी राहताना दिसत नाही. प्रश्नांची देवाणघेवाण ही एक प्रकारे ज्ञानाची वाट असते. प्रश्न पडणारे आणि विचारणारे विद्यार्थी ज्या शिक्षण व्यवस्थेत निर्माण केले जातात, त्या शिक्षण व्यवस्थेतून लोकशाहीला बळ मिळण्यास मदत होत असते. प्रश्न न विचारणारी माणसे आपण घडवली, तर ती पिढी ही केवळ मुकी बिचारी कोणी हाका अशी परिस्थिती निर्माण होण्याचा धोका आहे. त्याचवेळी प्रत्येक विद्यार्थ्याने शिकण्याची तयारी ठेवणे, गुरुजनांचा आदर करणे आवश्यक आहे. शिक्षणातून आदर मिळायला हवा यात शंका नाही; मात्र तो आदर विद्यार्थ्यांनी द्यायला हवा हेही खरे; पण त्याचवेळी विद्यार्थ्यांचा देखील सन्मान राखण्याची गरज आहे. आपल्याला प्राप्त होणारी विद्या ही काही स्वतःपुरती असता कामा नये, कोणत्याही विद्येच्या अंगी उपकाराची भावना असते. मुळात आपल्याकडे जे ज्ञान, विद्या आहे तिचा उपयोग इतरांच्या कामी येते आहे का? याचा शोध घेण्याची गरज आहे. आपणास प्राप्त असलेली विद्या केवळ स्वतःपुरती न ठेवता समाजाच्या उपकारासाठी वापरावी. त्यातून समाजहित साध्य होत असेल, तर ती विद्या आहे, अन्यथा आपल्याकडे असलेल्या विद्येचे स्वरूप हे माहितीचेच आहे असे समजावे.

**दुर्बल घटकांना न्याय**

शिक्षणाने समाजातील अज्ञान, अन्याय आणि विषमता दूर व्हायला हवी. विद्या प्राप्त झाली, तर काय घडते हे आपल्या देशाने खूप जवळून अनुभवले आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या बळावर समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून दिला. त्यांनी निर्मिलेल्या राज्यघटनेमुळे देशातील गरिबांचे, दीन, दलितांचे उत्थान घडले आहे. अनेकांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळाला आहे. अनेकांना समाजात स्थान निर्माण करता आले आहे. विद्या असेल, तर अशा स्वरूपाची वाट चालणे घडायला हवे. विद्या म्हणजे जीवनासाठी योग्य मार्गदर्शन. समाजातील जे–जे विद्येची वाट चालतात, मग त्यात शिक्षक, विद्वान किंवा जाणकार व्यक्तीने आपले ज्ञान इतरांना सांगायला हवे. त्यांनी समाजातील सर्वच समूहाला त्यांना योग्य दिशा देण्याची गरज आहे. ज्याच्याकडे विद्या आहे, त्याने समाजाला प्रबोधन, उदबोधन करण्याची गरज आहे. अर्थात उपदेश म्हणजे केवळ शब्द नव्हे, तर आचरणातून दिलेले मार्गदर्शन असायला हवे आहे. अन्यथा शब्दांद्वारे दिले जाणारे मार्गदर्शन म्हणजे शब्दांचे बुडबुडे ठरण्याची शक्यता आहे. शब्दाला मोल तर तेव्हा येत असते, जेव्हा शब्दांप्रमाणे कृती करणारी माणसे असतात. कारण शिक्षणाचा अंतिम उद्देश समाजहित साधणे हाच आहे. विद्या ही केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी, स्वहितासाठी नव्हे, तर इतरांच्या जीवनात प्रकाश आणण्यासाठी असायला हवी. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी शाळा सुरू करून समाजावर उपकार केले. ज्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता अशा अनेक माणसांच्या दारी शिक्षणाची गंगा त्यांनी नेली.

विद्या प्राप्त असलेली माणसे अधिक विनम्र असतात. त्यांच्या अंगी कोणत्याही प्रकारे अहंकाराचे भरण होत नाही. त्याउलट शिक्षण हे अहंकार मुक्तीचे साधन आहे. त्यामुळे आपण अहंकारी असू तर समजायचे, की आपल्याकडे विद्या नाही, तर केवळ माहिती आहे. अहंकार असेल, तर ती माणसे शिकलेली असली, तरी ते अशिक्षित असेच समजावे यात शंका नाही. अर्थात विद्या तर त्याला प्राप्त करायची असेल, तर विद्यार्थ्यांच्या अंगी विनम्रता असायला हवी. अर्थात जो विनम्र असेल असा विद्यार्थीच खऱ्या अर्थाने विद्वान होतो. ज्ञानाचा गर्व न करता त्याचा उपयोग इतरांना मदत करण्यासाठी करणे हेच शिक्षणाचे सौंदर्य आहे. त्यामुळे विद्या ही समाजाच्या प्रगतीची साधन आहे. विद्या आणि उपदेश हे शिक्षकाचे कार्य आहे, पण उपदेश करणे म्हणजे केवळ माहिती देणे नाही, तर जीवनमूल्ये शिकवणे. उपदेश म्हणजे योग्य मार्ग दाखवणे. शिक्षणाने व्यक्तीला विवेक, नैतिकता आणि जबाबदारीची जाणीव होते. विद्या आणि समाजहित शिक्षणाचा उद्देश केवळ नोकरी किंवा वैयक्तिक यश नसून समाजाच्या उन्नतीत योगदान देणे आहे. विद्या ही समाजातील अंधश्रद्धा, अन्याय आणि विषमता दूर करण्याचे साधन आहे. आजच्या काळात शिक्षणाचे व्यापारीकरण झाले आहे; पण समर्थ रामदास विद्येचे मोल नमूद करत आहेत. विद्या ही समाजहितासाठी असावी. डॉक्टरांनी आपले ज्ञान रुग्णांच्या सेवेसाठी वापरावे. अभियंत्यांनी समाजाच्या गरजा लक्षात घेऊन तंत्रज्ञान विकसित करावे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर जीवनासाठी तयार करावे. समर्थ रामदासांचा हा श्लोक आपल्याला सांगतो, की विद्या ही विनम्रतेने ग्रहण करावी, समाजाच्या उपकारासाठी वापरावी, योग्य मार्गदर्शन करावे आणि समाजहितासाठी अर्पण करावी. यातून स्पष्ट होते, की शिक्षणाचा उद्देश केवळ वैयक्तिक प्रगती नसून समाजाच्या सर्वांगीण विकासात योगदान देणे आहे. त्यामुळे आपल्याला खरोखर शिक्षणाचा विचार करायचा असेल, तर ते शिक्षण समाज व राष्ट्रहिताचा विचार करायला भाग पाडते आहे. समर्थ रामदास म्हणतात की, **विद्या विनंती करावी। विद्या उपकार करावी। विद्या उपदेश करावा। विद्या उपकार करावा।।** हा विचार घेऊन शिक्षणाची वाट गतिमान करण्याची गरज आहे.

शिक्षण घेऊनही आपण राष्ट्रासाठी कोणतीच वाट चालणार नसू, तर त्यातून आपले काही साध्य होण्याची शक्यता नाही आणि असे शिक्षण घेणार असू, तर असे शिक्षण कुचकामी आहे. त्यामुळे जीवनात शिक्षणाची इयत्ता पुढे जात असताना सतत लक्षात घ्यायला हवे, की आपण खरोखर विद्येची वाट चालतो आहोत का? अन्यथा अहंकाराने युक्त, विनम्रता शून्य आणि केवळ अक्षर साक्षरतेचे शिक्षण नसले तरी चालेल. कारण या वाटेचे शिक्षणाने कोणाचेही भले होण्याची शक्यता नाही. त्यामुळे आपणच ठरवायला हवे, की आपल्याला कोणत्या वाटेने प्रवास करायचा आहे.

# सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना नफा

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा समोर आलेला जवळपास १.९८ लाख कोटी रुपयांचा निव्वळ नफा हा निश्चितच ऐतिहासिक टप्पा आहे. सलग चौथ्या वर्षी नफ्यात वाढ होणे, एकूण व्यवसाय २८३ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचणे आणि कर्जवाटपात मोठी वाढ होणे यामुळे भारतीय बँकिंग क्षेत्रात स्थैर्य परतल्याचे चित्र निर्माण झाले आहे. एके काळी 'एनपीए' म्हणजेच बुडीत कर्जांच्या संकटामुळे त्रस्त असलेल्या बँकांनी आज सकल एनपीएचे प्रमाण दोन टक्क्यांच्या खाली आणले आहे.

हे बदल अचानक झालेले नाहीत. गेल्या दशकात सरकारने बँकांचे विलीनीकरण, पुनर्भांडवलीकरण, दिवाळखोरी आणि दिवाळे संहिता (आयबीसी), डिजिटल बँकिंग आणि कर्जवसुली यंत्रणा मजबूत करण्यासारखे अनेक उपाय केले. त्याचा परिणाम आता दिसू लागला आहे.




या वाढत्या नफ्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांबद्दल ठेवीदारांचा विश्वासही वाढल्याचे सरकार सांगत आहे. ठेवींमध्ये मोठी वाढ आणि कर्जवाटपातील वाढ हे अर्थव्यवस्थेतील वाढत्या आर्थिक हालचालींचे संकेत मानले जात आहेत. उद्योग, पायाभूत सुविधा, किरकोळ कर्जे आणि सेवा क्षेत्रातील वाढत्या मागणीमुळे बँकांचे कर्जवाटप वाढले आहे. भारतीय अर्थव्यवस्था वेगाने वाढत असल्याने बँकिंग क्षेत्रालाही फायदा होत आहे. गेल्या दोन–तीन वर्षांमध्ये व्याजदर तुलनेने उच्च राहिल्याने बँकांचे 'नेट इंटरेस्ट मार्जिन' वाढले. म्हणजे ठेवींवर दिल्या जाणाऱ्या व्याज आणि कर्जांवर आकारल्या जाणाऱ्या व्याजातील फरक वाढल्याने बँकांचा नफा वाढला. दुसरीकडे, डिजिटल व्यवहार आणि सेवा शुल्कातूनही मोठी कमाई झाली. त्यामुळे नफ्यातील वाढ पूर्णपणे 'कार्यक्षमता सुधारली' याच कारणाने झाली असे म्हणणे अर्धसत्य ठरेल.

याहून महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सार्वजनिक बँकांच्या बुडीत कर्जांची वास्तविक स्थिती. एनपीएचे प्रमाण कमी झाले असले, तरी त्यामागे मोठ्या प्रमाणावर 'राइट–ऑफ' म्हणजे कर्जे बुडीत खात्यात टाकण्याची प्रक्रिया आहे. सरकार आणि बँका सांगतात, की वसुली सुधारली आहे; पण अनेक मोठ्या उद्योगसमूहांची कर्जे मोठ्या सवलतींसह निकाली काढली गेली. त्यामुळे आकडेवारी स्वच्छ दिसत असली, तरी त्यासाठी किती सार्वजनिक पैसा खर्च झाला, हा प्रश्न कायम आहे. सार्वजनिक बँकांना वाचवण्यासाठी गेल्या दशकात सरकारने लाखो कोटी रुपयांचे पुनर्भांडवलीकरण केले होते. म्हणजेच आजचा नफा हा करदात्यांच्या पैशातून उभ्या केलेल्या स्थैर्यावर आधारलेला आहे.

# परीक्षा पूर्णत: सुरक्षित का नाही?




'पुण्याच्या प्राध्यापिकेला अटक' ही नीट परीक्षा गोंधळासंदर्भातील बातमी अतिशय दु:खद असून शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यनगरीला ही कसली वाळवी लागली? असा प्रश्न पडला. पालक व पाल्य यांच्यासाठी आठवीपासूनच नीटचे वेध लागतात, त्यासाठी विशिष्ट कोचिंग क्लासमध्ये प्रवेश घेण्यासाठी झिम्मड उडते मग दहावी होण्याआधीच नंतरचा क्लास शोधून प्रवेश घेतला जातो आणि मग दोन वर्षे ते विद्यार्थी फक्त अभ्यास करतात, परीक्षा देतात आणि ती नंतर रद्द केली जाते हे भयानक आहेच; पण त्यात पुण्यातील प्राध्यापिका व इतर पुणेकरांचा सहभाग असहनीय आहे. अखिल भारतीय स्तरावर परीक्षा घेण्याचा अट्टाहास कशासाठी? काही हजार जागांसाठी लाखो विद्यार्थी तयारी करतात म्हणजे क्लासेसच्या बिझनेस कोटींपर्यंत जातो, ती परीक्षा संपूर्णपणे सुरक्षित का ठेवता येत नाही? या सर्वांत गुणवंत विद्यार्थ्यांवर अन्याय होतो त्याचे काय? नजीकच्या परीक्षेचा सोक्षमोक्ष लावणे अत्यावश्यक झाले आहे.

**माया भाटकर**, पुणे

## युद्धामुळे महागाई भडकली

आखाती देशांच्या युद्धामुळे देशात प्रत्येक वस्तूचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य कष्टकरी नागरिकांचे जीवन जगणे अवघड झाले आहे. त्यात वाढती बेकारी, महागाई, शिक्षण, इंधन, गॅस, तेल, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, औषधे तसेच त्यावर कळत नकळत वाढती करव्यवस्था लादल्याने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडत आहे. सातत्याने केवायसीची प्रक्रिया मग ती बँकेची असो किंवा गॅसची, आधार कार्डची असो? सर्वजण भल्या मोठ्या रांगेत दिसणारच! अशा प्रकारे सर्वसामान्यांना गुंतवून ठेवल्याने महागाई विरोधात कोणीच बोलायला धजवतच नाही. मग आपल्या देशाने प्रगती केली आहे का? अनेक महत्त्वपूर्ण वस्तूंसाठी आपण

## वाचक लिहितात

सर्वस्वी आखाती देशांवरच अवलंबून आहे. हीच खरी शोकांतिका आहे. याबाबत शासन–प्रशासन गांभीर्याने विचार करीत नाही. लोकप्रतिनिधी मात्र आरोप–प्रत्यारोप यामध्ये गुरफटून पडले आहेत, की आम्ही विकास केलाय! मग विकास कुठे लपला आहे? तो तरी दाखवा.

**अनिल अगावणे**, पुणे

## मुक्ताधिकाराला लगाम

दूरसंचार कंपन्यांच्या मनमानी कारभाराला चाप लावण्यासाठी 'ट्राय'ने नवीन कडक नियमावली तयार केली आहे. ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यात दुर्लक्ष करणाऱ्या मोबाईल कंपन्यांना दर तिमाहीला ५० लाख रुपयांपर्यंत दंड ठोठावण्याची तरतूद असलेली नवीन नियमावली प्रस्तावित करण्यात आली आहे. सुधारित नियमांनुसार आता प्रत्येक कंपनीला तक्रार नोंदविण्याची सोपी सुविधा उपलब्ध करून द्यावी लागेल. तक्रारीची सद्य:स्थिती काय आहे, याची माहिती ग्राहकाला सतत देणे कंपन्यांसाठी बंधनकारक असेल. कंपनीने ग्राहकाची तक्रार चुकीच्या पद्धतीने निकाली काढली किंवा फेटाळली, तर प्रति तक्रार १ हजार रुपयांचा दंड आकारण्याची तरतूद नव्या नियमावलीत करण्यात आली आहे. ग्राहकांना विविध फसव्या योजना आणून लुबाडणाऱ्या मोबाईल कंपन्यांच्या मुक्ताधिकाराला आता ग्राहकच लगाम घालतील. ट्रायने केलेल्या या ग्राहकहिताच्या निर्णयाचे स्वागतच करावे लागेल.

**दत्तप्रसाद शिरोडकर**, मुंबई

'वाचक लिहितात' या सदरातील काही निवडक पत्रे 'केसरी'च्या इंटरनेट आवृत्तीत प्रसिद्ध होतात.
**www.dailykesari.com**

## विरोधकांचे सहकार्यही महत्त्वाचे



रविवार केसरी दि.१७ मे मधील आवाहनामागे काय आहे? हा भागा वरखडे यांचा मोदींच्या काटकसरीच्या आवाहनावरचा सविस्तर लेख वाचला. या आवाहनामागे खरे तर ऊर्जा संकटाचे आणि चलन घसरण यांचे भय आहे हे उघड आहे; पण ते भारतीयांच्या मानसिकतेत एकाएकी बदल करण्याचे आव्हान दिल्यासारखेच आहे. कोविड संकटालाही धीराने सामोरे जाऊन पुन्हा व्यवहारचक्र नियमित, सुरळीत, सर्वसामान्य केले, ज्याला 'न्यू नॉर्मल' म्हटले गेले, ते आताच्या युद्धजन्य स्थितीतही कसे पुढे नेता येईल हे पाहण्याची सर्वसामान्य नागरिकांकडून अपेक्षा केली गेली आहे. सोने खरेदी, परदेश प्रवास वर्षभर टाळणे, पेट्रोल–डिझेल पुरवून वापरणे, त्यासाठी घरून काम करणे इ. सूचना युद्धजन्य परिस्थितीत भारताच्या रुपयाची घसरण थांबवण्यासाठी रास्त आहेत. राजकीय नेत्यांनीही त्याचा अवलंब सातत्याने गांभीर्याने केला तरच नागरिक या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देतील हेही उघड आहे. कोविड संकटकाळात आपण यापेक्षा अधिक कठोर मर्यादा घालून घेण्याचा सफल प्रयत्न केलेला होता. यापूर्वीही काँग्रेसकाळात इंदिरा गांधी, नंतर माजी केंद्रीय अर्थमंत्री यांनीही जरुरीनुसार अशा स्वरूपाच्या सूचना केलेल्या होत्या. त्यामुळे विरोधकांचे कर्तव्य म्हणून विरोध करण्यापेक्षा देशात न्यू नॉर्मल स्थिती कायम राहण्यासाठी जे उपाय सुचवले. अमलात आणण्यासाठी नागरिकांत रूजलेल्या आपल्या आदर्श राजकीय प्रतिमेचा वापर केला गेला पाहिजे.

**श्रीपाद कुलकर्णी**, पुणे

केसरी–मराठा ट्रस्टचे हे पत्र मुद्रक व प्रकाशक डॉ. रोहित दीपक टिळक यांनी केसरी मुद्रणालय, ५६८ नारायण पेठ, न. चिं. केळकर रस्ता, पुणे ४११ ०३० येथे छापून ५६८, नारायण पेठ, पुणे ४११ ०३० आणि कैकाडीमहाराज व्यापारसंकुल, माळीवाडा, अहिल्यानगर (अहिल्यानगर आवृत्ती) व द्वारा टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, डी मार्ट शेजारी, नरसिंहनगर, जुळे सोलापूर, सोलापूर ४१३ ००४ (सोलापूर आवृत्ती) येथे एकाचवेळी प्रकाशित केले. **कार्यकारी संपादक** : **निखिल गजेंद्रगडकर**, **पुणे** : दूरध्वनी २४४५९०५१, २४४५९२५०, २४४५१६७७; **मुंबई** : सरदारगृह, महात्मा फुले मार्केटजवळ, फोन : २२०८२५०३, **पिंपरी** : पी. जे. चेंबर्स, तिसरा मजला, पुणे–मुंबई महामार्ग, पुणे ४११ ०१८. दूरध्वनी : ७४२४२४०; **अहिल्यानगर** : संत कैकाडीमहाराज व्यापार संकुल, गाळा क्र. २०७, माळीवाडा – अहिल्यानगर. दूरध्वनी : ०२४१–२३५६१५०, ०२४१–२३४१९६२. **सोलापूर** : द्वारा टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, डी मार्ट शेजारी, नरसिंहनगर, जुळे सोलापूर, सोलापूर ४१३ ००४. दूरध्वनी : (०२१७) २३०११९९. **E-mail : punekesari1881@gmail.com, kesarivarta@yahoo.co.in. वेबसाईट – www.dailykesari.com/www.paperboy.com**
Printed by - Dr. Rohit Deepak Tilak and Published by - Dr. Rohit Deepak Tilak, On behalf of Kesari-Maharatta Trust and printed at Kesari Mudranalay, 568 Narayan Peth, N. C. Kelkar Road, Pune-411030 and Published at 568 Narayan Peth, N. C. Kelkar Road, Pune-411030.

केसरी ©
हे केसरी–मराठा ट्रस्टचे व्यापारी चिन्ह आहे.

# इंधन बचतीसाठी एसटीची नवी मोहीम

## प्रत्येक आगाराला पाच लीटर डिझेल बचतीचे लक्ष्य

**मुंबई, (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वाढत्या इंधन खर्चावर नियंत्रण मिळवण्यासाठी ‘इंधन बचत... म्हणजेच इंधन निर्मिती’ ही व्यापक संकल्पना राज्यभर प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी केली. मंत्रालयात पार पडलेल्या एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते.



एसटी महामंडळाला सध्या दररोज सरासरी १०.८७ लाख लीटर डिझेलची आवश्यकता भासत असून, वाढत्या इंधन खर्चाच्या पार्श्वभूमीवर बचत ही काळाची गरज असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. प्रत्येक आगाराने दररोज किमान पाच लीटर डिझेल बचतीचे उद्दिष्ट निश्चित केल्यास राज्यभरातून दररोज किमान एक हजार लीटर डिझेलची बचत होऊ शकते. सध्याच्या दरानुसार यामुळे दररोज सुमारे एक लाखांची बचत शक्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. लहान बचतीतून मोठी आर्थिक शिस्त निर्माण होते आणि हीच बचत भविष्यात एसटीसाठी मोठी ताकद ठरू शकते, असे सरनाईक यांनी नमूद केले.

या मोहिमेअंतर्गत सर्व विभाग नियंत्रक आणि आगार व्यवस्थापकांना आगारनिहाय डिझेल बचतीची उद्दिष्टे निश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक आगाराने बसच्या इंधन वापराचे नियमित विश्लेषण करून बचतीसाठी आवश्यक उपाययोजना राबवायच्या आहेत. डिझेल बचतीमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या चालकांचा विशेष सत्कार करण्यात येणार असून, त्यांना प्रोत्साहनपर भत्ताही दिला जाणार आहे.

तसेच, निश्चित उद्दिष्टांपेक्षा अधिक डिझेल बचत करणाऱ्या आगारांना दरमहा विशेष पुरस्कार आणि आर्थिक प्रोत्साहन दिले जाणार आहे. यामुळे आगारांमध्ये सकारात्मक स्पर्धा निर्माण होऊन बचतीची चळवळ अधिक प्रभावी होईल, असा विश्वासही सरनाईक यांनी व्यक्त केला.

### तांत्रिक बाबींवर लक्ष केंद्रित

वेग नियंत्रण, योग्य गिअरचा वापर, अनावश्यक इंजिन सुरू ठेवणे टाळणे आणि ब्रेकिंग पद्धतीत सुधारणा यांसारख्या बाबींवर विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. याशिवाय, बसची दैनंदिन तांत्रिक तपासणी, वेळेवर दुरुस्ती, इंजिन कार्यक्षमतेची नियमित पाहणी, टायर प्रेशर, इंजिन ट्यूनिंग, ऑईल गळती आणि ब्रेक प्रणाली यांसारख्या तांत्रिक बाबींवर अधिक लक्ष केंद्रित करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. कार्यशाळा स्तरावर अधिक जबाबदारीने काम केल्यास इंधनाचा अपव्यय मोठ्या प्रमाणात रोखता येईल, असेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

# विहीर खोदताना पाच मजुरांचा मृत्यू

**पन्ना :** मध्य प्रदेशातील पन्ना जिल्ह्यातील एका गावात मंगळवारी विहीर खोदत असताना माती कोसळून पाच मजुरांचा मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली.



ही घटना अजयगड तालुक्यातील बिहरपूरवा गावात दुपारी १२ च्या सुमारास घडली, अशी माहिती पोलिस अधीक्षक निवेदिता नायडू यांनी दिली.

मनरेगा योजनेअंतर्गत सार्वजनिक विहिरीचे काम सुरु होते. या ठिकाणी एकूण सात मजूर काम करत होते. सातपैकी दोन मजूर पाणी पिण्यासाठी वर आले. त्यावेळी मातीचा ढिगारा अचानक कोसळला. यामध्ये पाच मजूर गाडले गेले.

आशिष यादव, राजकुमार यादव, रामपाल यादव, चुन्नू यादव आणि चुनवाद पाल अशी मृत मजुरांची नावे आहेत. पाचही मजुरांचे मृतदेह ढिगाऱ्याबाहेर काढण्यात आले असून उत्तरीय वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत, असेही ते म्हणाले.

या घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी उषा परमार यांनी घटनास्थळी भेट देऊन बचाव कार्याचा आढावा घेतला. जिल्हाधिकाऱ्यांनी पीडित कुटुंबींची भेट घेऊन त्यांना प्रशासनाकडून शक्य ती सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले.

# भाजपने पाच-पाच लाख देऊन नगरसेवक पळवले

### वडेट्टीवार यांचा आरोप

**मुंबई, (प्रतिनिधी) :** विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील काँग्रेसचे २३ नगरसेवक सध्या ‘नॉट रिचेबल’ असून त्यांना प्रत्येकी ५ लाखांची रक्कम देऊन भाजपने पळवून नेल्याचा आरोप काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी मंगळवारी नागपूर येथे बोलताना केला. या सर्व विकल्या गेलेल्या लोकप्रतिनिधींवर पक्षादेश जारी करून त्यांना अपात्र करण्याची कायदेशीर प्रक्रिया काँग्रेस पक्ष तातडीने सुरू करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. या निवडणुकीत महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत आणि जिल्हा परिषदेचे सदस्य मतदान करणार आहेत. विधान परिषदेच्या वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली मतदारसंघातील काँग्रेसचे २३ नगरसेवक संपर्कात नाहीत. हे नगरसेवक भाजपच्या एका आमदारासोबत असल्याचे समजते. या पार्श्वभूमीवर वडेट्टीवार यांनी काल भाजपवर जोरदार टीका केली. काँग्रेसच्या नगरसेवकांना ५ लाख देण्यात आले असून काँग्रेस जितके देईल त्याच्या डबल देऊ असे आमिष भाजपकडून दाखवले जात आहे. याबद्दलची सर्व माहिती आणि पुरावे आहेत. वेळ आल्यावर सगळे पुरावे आपण मांडू, असेही वडेट्टीवार म्हणाले. राज्यात भाजपची सत्ता नसती तर एकाही नगरसेवकाची पक्षांतर करण्याची हिंमत झाली नसती, असेही ते म्हणाले.

# राजकोटमध्ये काँग्रेस उमेदवार हल्ल्यात जखमी

### पंजाबमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी मतदान

**चंडीगढ :** पंजाबमध्ये १०३ स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी मंगळवारी राजकोटमधील घटना वगळता मतदान शांततेत पार पडले. राजकोटमध्ये काँग्रेसच्या एका उमेदवारावर धारदार शस्त्राने वार करण्यात आला. यामध्ये उमेदवार जखमी झाला असून, उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

जगदेव सिंग जग्गा असे जखमी उमेदवाराचे नाव आहे. जग्गा यांना काँग्रेस पक्षाने रायकोटमधील प्रभाग ४ मधून निवडणुकीच्या रिंगणात उतरविले होते. पंजाब काँग्रेसचे अध्यक्ष अमरिंदर सिंग राजा वारिंग यांनी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध केला असून, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या मुद्द्यावरून ‘आप’ सरकारवर टीकास्त्र सोडले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्यात येत आहे. दुपारी १२ पर्यंत ३१.०६ टक्के मतदानाची नोंद झाली होती.

राज्यात मोहाली, भटिंडा, अबोहर, बरनाला, कपूरथला, मोगा, बटाला आणि पठाणकोट या आठ महानगरपालिकांसह ७५ नगर परिषदा आणि २० नगरपंचायतींसाठी (एकूण जागा १,८९६) काल मतदान पार पडले. या निवडणुकीत ७,५५५ उमेदवार रिंगणात उभे आहेत. सत्ताधारी आम आदमी पक्षाने (आप) सर्वाधिक १,८०१ उमेदवार उभे केले आहेत. काँग्रेसचे १,५५०, भाजपचे १,३१६, शिरोमणी अकाली दलाचे १,२५१ आणि बहुजन समाज पक्षाचे ९६ उमेदवार रिंगणात आहेत.



# सावंतवाडी रेल्वे स्थानकाला मधु दंडवते यांचे नाव

### राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

**मुंबई, (प्रतिनिधी) :** कोकण रेल्वेचे शिल्पकार आणि माजी केंद्रीय रेल्वेमंत्री स्व. मधु दंडवते यांचे नाव सावंतवाडी रेल्वे स्थानकास देण्यास मंगळवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. केंद्राच्या मान्यतेनंतर सावंतवाडी रेल्वे स्थानकाचे नाव ‘लोकमान्य मधु दंडवते रेल्वे टर्मिनस’ असे होणार आहे.

कोकण रेल्वे हा देशातील सर्वांत आव्हानात्मक रेल्वे प्रकल्प मानला जातो. पश्चिम घाटातील डोंगररांगा, खोल दऱ्या, नद्या आणि कठीण भौगोलिक परिस्थितीमुळे हा प्रकल्प अनेक वर्षे कागदावर राहिला होता. मात्र, तत्कालीन रेल्वेमंत्री मधु दंडवते यांनी कोकण रेल्वेची गरज केंद्र सरकारसमोर ठामपणे मांडली आणि या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केला.

कोकण रेल्वे प्रकल्प प्रत्यक्षात यावा, यासाठी दंडवते यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे कोकण रेल्वे सुरू झाली, अशी कोकणवासीयांची भावना आहे. त्यामुळे त्यांचे नाव कोकण रेल्वेमार्गावरील महत्त्वाच्या अशा सावंतवाडी रेल्वे स्थानकाला देण्यात यावे, अशी मागणी गेली काही वर्षे केली जात आहे.

# खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**नवी दिल्ली :** भोंदू अशोक खरातला विशेष पीएमएलए न्यायालयाने मंगळवारी ७० कोटींच्या आर्थिक अफरातफर प्रकरणात १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. खरातवर बलात्कार आणि फसवणुकीचेदेखील आरोप आहेत.



गेल्या आठवड्यात खरातला अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) आर्थिक अफरातफर प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) अटक केली होती. त्यानंतर, विशेष न्यायालयाने खरातला दहा दिवसांची ईडी कोठडी मागितली होती. त्याची मुदत काल संपणार होती. त्यामुळे त्याला न्यायालयापुढे हजर करण्यात आले होते.

बलात्कार आणि फसवणुकीच्या आरोपावरुन खरातला १८ मार्च रोजी अटक झाली होती. त्यानंतर, आर्थिक अफरातफरीचा प्रकार समोर आला. नाशिक पोलिसांनी खंडणी, फसवणूक, महिलांना अमली पदार्थांचे सेवन करण्यास भाग पाडून त्यांच्यावर अत्याचार करणे या आरोपांवरुन खरातवर गुन्हा दाखल केला होता. या एफआयआरची दखल घेऊन ६ एप्रिल रोजी ईडीने आर्थिक अफरातफर प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **श्री. ज्ञानेश्वर बाबाजी आल्हाट, श्री. प्रताप गुलाब बधाले, श्री. युवराज लक्ष्मण बधाले, श्री. सचिन गुलाबराव बोराटे, सर्व रा. निघोजे, ता.खेड, जि.पुणे** यांची मिळकत आहे. आमचे अशील सौ. सुप्रिया शंकर गाडे यांना खाली वर्णन केलेली मिळकत विक्री करण्याचे मान्य व कबूल करून सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्याचा भरवसा आमचे अशिलांना दिला आहे. तथापि, सदरचे मिळकतीवर कोणाचाही कसलाही गहाण, दान, करारनामा, गहाणखत, वहिवाट, कोर्ट दावा इ. अधिकार असेल त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसांचे आत खालील पत्त्यावर अस्सल कागदपत्रांनिशी येऊन आमची खात्री पटवून द्यावी. अन्यथा आमचे अशील सदर मिळकतीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील.

**परिशिष्ट :- मिळकतीचे वर्णन :-** गाव मौजे निघोजे, ता.खेड, जि.पुणे येथील गट नं.९४ यांसी क्षेत्र ०१ हे ५३ आर+ पोख ०० हे ०१ आर यांसी आकार ०४ रू. ५० पैसे यापैकी विद्यमान यांच्या मालक ताबेवहिवाटीचे क्षेत्र ०० हे २० आर यांसी आकार ०० रू. ५९ पैसे ही संपूर्ण मिळकत या जाहीर नोटीसचा विषय आहे.

**चाकण, दिनांक : २६/०५/२०२६**

**श्री. विकास सोपान राऊत, अॅडव्होकेट**
ऑफिस नं.४८, सद्गुरु कॉम्प्लेक्स, शिक्रापूर रोड, चाकण, ता.खेड, जि.पुणे, मो : ८३८१०१६२३०

## PUBLIC NOTICE

NOTICE is given that Late Kalpana Arvind Vanikar was the owner of Flat No. 2 (65.05 sq.mtrs/700 sq.ft built up), 2nd Floor, "YUGM SAHWAS APARTMENTS CONDOMINIUM", C.T.S. No. 92, Rasta Peth, Pune. Following her demise on 26/09/2024, her legal heirs Arvind G. Vanikar, Chetan Vanikar and Amit Vanikar succeeded the property. Arvind G. Vanikar released his share to Chetan and Amit Vanikar via Release Deed dated 18/05/2026 (Registered: Sub-Registrar Haveli No. 4, Sr. No. 8432/2026). Thus, Chetan and Amit Vanikar are now the owners. Any person having any claim, right, title, or interest in the said flat by way of sale, mortgage, inheritance, or otherwise must submit written objections with proof to the undersigned within 7 days of this notice, failing which the title will be considered clear and marketable.

**Place : Pune, Date : 27.05.2026**

**Bhagyashri Bhosale (Advocate)**
17, Vijay Housing Society, Ganeshkhind Road, Pune-411016,
Mob: 9545134013, **Email:** adv.bhagyashri30@gmail.com



## शिक्षक नेमणे आहे

उल्हास शिक्षण संस्था, पुणे संचलित न्यू इंग्लिश स्कूल वरवे, ता. भोर, जि. पुणे, माध्यमिक विद्यालय सांगवी-येवली, ता. भोर, जि. पुणे माध्यमिक विद्यालय मांगडेवाडी, ता. हवेली, जि. पुणे व अपूर्वा प्राथमिक विद्यालय, मांगडेवाडी, ता. हवेली, जि. पुणे येथे स्वयं अर्थसहाय्य तत्त्वावर व विना अनुदानित तत्त्वावर शै. वर्ष २०२६-२७ साठी शिक्षक नेमणे आहे. १. B.Sc. B.Ed.-01 पदे (गणित+विज्ञान), २. B.Ed. - 02 पदे (हिंदी), ३. D.Ed.-04 पदे. इच्छुक उमेदवारांनी सोमवार दि. ०८/०६/२६ रोजी स. ११:३० वा. माध्यमिक विद्यालय मांगडेवाडी, ता. हवेली, जि. पुणे येथे मूळ कागदपत्रांसह स्वखर्चाने उपस्थित राहावे.



महानिर्मिती

## निविदा सूचना

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे वर्णन | कामाची अंदाजित रक्कम रु. लाखात/बयाणा रक्कम रु. |
| --- | --- | --- | --- |
| ०१ | ३०००६८८९० | को.थ.प्र. विद्युतगृह कोयनानगर येथे ६० HP चे (२ नग) स्बमर्सिबल पंपाचा पुरवठा करून बसवून कार्यान्वित करणे. | २९.२० ३२,१००/- |
| ०२ | ३०००६८९४६ | को.ज.वि.कें. संकुल, पोफळी टप्पा क्र. ३ येथे नव्हनींग ऑईल पंपाचा पुरवठा करून बसवून कार्यान्वित करणे. | ५९.९० ६३,४००/- |

निविदा किंमत ११८०/- प्रत्येकी. निविदा ई-टेंडरींगच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्याची तारीख २७/०५/२०२६. निविदा विक्री कालावधी दि. २७/०५/२०२६ ते १५/०६/२०२६, १८:०० वा. पर्यंत. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ दि. १६/०६/२०२६ रोजी १५.०० वा. पर्यंत. निविदा उघडण्याची तारीख व वेळ शक्यतो दि. १६/०६/२०२६ रोजी १५:०० वा. अधिक माहितीसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in या संकेतस्थळावर भेट द्या.

सही/-
मुख्य अभियंता, (को.ज.वि.कें.सं.पोफळी)



केसरी

## क्रीडा पानासाठी उपसंपादक पाहिजे

दैनिक ‘केसरी’ला क्रीडा पानासाठी उपसंपादक/वार्ताहर पाहिजे. क्रीडाविषयक घडामोडींची सखोल जाण, भाषांतर क्षमता, रात्रपाळीची तयारी, पेजिनेशन कौशल्य आवश्यक. पगाराच्या अपेक्षेसह अर्ज करा.

**संपर्क : पर्सोनेल विभाग, केसरी**
५६८, नारायण पेठ, पुणे-३०.
**दूरध्वनी :** २४४५९२५०/२४४५९०५१
**ई-मेल :** punekesari1881@gmail.com


# कर्नाटकातील काँग्रेस नेत्यांची दिल्लीत बैठक

**नवी दिल्ली :** कर्नाटकातील नेतृत्वबदलावर चर्चा कायम असताना काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी मंगळवारी मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांच्यासह राज्यातील नेत्यांसोबत राज्यसभा आणि विधान परिषदेच्या आगामी निवडणुकांवर चर्चा केली.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी दोन्ही निवडणुकांसाठी उमेदवार निश्चित करण्यासाठी बैठक बोलावली होती. मात्र, कर्नाटकातील प्रदीर्घ काळापासून सुरू असलेला नेतृत्वसंघर्ष आणि त्यावर काही तोडगा निघेल का, हा चर्चेचा मुख्य मुद्दा राहिला.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशील **श्री. उन्मेष सतीश घाटे** हे ‘‘कपिल अभिजात सहकारी गृहरचना संस्था मर्यादित’’ डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे ४११०३८ येथील खालील वर्णनातील निवासी सदनिकेचे विद्यमान धारक आहेत. संबंधित **‘‘कपिल अभिजात सहकारी गृहरचना संस्था मर्यादित’’** यांनी सदर सदनिकेसंदर्भात दिलेले भाग दाखला (शेअर सर्टिफिकेट) क्र.१०७ (शेअर्स क्र.५३१ ते ५३५) हे पुणे शहरातील प्रवासात गहाळ झालेले असून, कसून प्रयत्न करूनही सापडलेला नाही. जर सदर भाग दाखला कोणास सापडला असल्यास त्यांनी तो आजपासून कमाल ७ दिवसांत खालील पत्त्यावर आणून द्यावा. जर वरील मुदतीत कोणीही सदर भाग दाखला/शेअर सर्टिफिकेट आमचेकडे आणून दिले नाही, तर वरील नमूद भाग दाखला/शेअर सर्टिफिकेट आज मितीस अस्तित्त्वात नाहीत, असे गृहीत धरून आमचे अशील संबंधित सोसायटीकडून ‘‘डुप्लिकेट’’ भाग दाखला प्राप्त करणेस पात्र राहतील व वरील मुदतीनंतर आलेल्या दाव्यांची, प्रस्तावांची, हरकतींची, तक्रारींची दखल घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-** पुणे मनपा हद्दीतील मौजे कोथरूड, डहाणूकर कॉलनीमधील सर्व्हे नंबर ३१/२/१ व ३०-A/१/१ यांसी सिटी सर्व्हे नंबर १७६१ वरील ‘‘कपिल अभिजात सहकारी गृहरचना संस्था मर्यादित’’ या इमारत संकुलामधील **इमारत क्र.सी** मधील पाचव्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र.५०३ यांसी क्षेत्रफळ सुमारे ९०० चौ.फूट व टेरेस १९८ चौ.फूट या मिळकतीसंदर्भातील भाग दाखला क्रमांक १०७ (शेअर्स क्र.५३१ ते ५३५), हा सदर नोटिसीचा विषय आहे.

**अमोघ श्रीकांत गोसावी, (अॅडव्होकेट)**
फ्लॅट नं.१०२, कल्पक सोसायटी, लेन नं.५, डहाणूकर कॉलनी,
कोथरूड, पुणे ४११०३८, मोबाइल नं. ९०११०१३६८३

## Public Notice

Public at large is hereby informed that, the property described in schedule hereunder, is originally owned by Mr. Prakash Pathare. The said Flat was purchased from M/s. Magarpatta Township Development and construction Company Ltd. by way of Registered Agreement dated 14/12/2005 at the office of Sub Registrar Haveli No. 3 at Sr. No. 7616/2005, Pune. Thereafter Mr. Prakash Pathare sold the said Flat to Mr. Ratnesh Mudgil & Mr. Rameshwar B. Mugdil by way of Registered Assignment Deed dated 21/11/2014 at the office of Sub Registrar Haveli No. 3 at Sr. No. 10000/2014, Pune. Ratnesh Mudgil died on 21/04/2019 leaving behind their legal heirs, Mother i.e. Mrs. Asha Mudgil, Wife i.e. Deeksha Mugdil and Daughter i.e. Adeera Mugdil. I, Therefore, hereby call the public at large that if there are any other legal heirs except above mentioned and if any person/s has any right, title and interest, in the said property or part of it in whatsoever manner, the same may be communicated to' us along with necessary documentary proof within 7 days from publication of this notice, failing which our clients will presume that the said property is free from all/any encumbrances and no other person has any right, title and interest in the said property in whatsoever manner and if there are any claim/s of any person/s in respect of the said property or part of it the same are waived in favour of our clients and under this bonafide presumption, our client/s will proceed with their proposed transaction, which kindly be noted.

### SCHEDULE


All that piece and parcel of Flat No. 202 on 2nd Floor, in Building no. I, in the Scheme known as IRIS, constructed on land bearing Final Plot No. MPT - 11 in West Magarpatta City out of Survey No. 147, Hissa No. 15C, 15D, 16A, 16B, Survey No. 148A, Hissa No. 1C, ID, 2, 3A, 3B, 4C, 5A, 5B, 6A, 6B/2, 6B/3, 7B, Survey No. 149, Hissa No. 1, Survey No. 288, Hissa No. 1, admeasuring 82.03 Sq. Mtrs. + Terrace admeasuring 8.82 Sq. Mtrs. alongwith One Car Parking on Ground Floor, situated at Village Hadapsar, Tal. Haveli, Dist. Pune (Hereinafter referred as the SAID PROPERTY)

**Pune**
**Date: 26/05/2026**

**Rahul S. Ganu ADVOCATE, B.COM., LL.B.**
Office No, 3 & 4, Ground Floor,
494, Shaniwar Peth, Bajirao Road, Pune 411030.
Ph.: 020 2445 9787; Mob.: +91 8788365457 +91 9657709909;
Email : ganu.rahul@gmail.com


## केसरी शब्दकोडे क्र. १०२

**आडवे शब्द –** १) उमा ३) आजूबाजूस, निकट ७) सुट्टीचा वार ८) मानव ९) सिद्धीस नेणारा, उपकारक १०) कृष्णसखी ११) फक्त, केवळ १२) विषमताच्या विरुद्ध १४) अवधान, चित्त १५) वेळ (हिं) १६) शिक्का १७) श्वसनेंद्रिय १९) उत्सवाचे दिवस २१) खटला (हिं). २२) गाय २३) मंत्रिमंडळ २५) शूर पुरुषाला दिली जाणारी एक उपमा २८) आनंद २९) अपशकुन, खोडा ३१) फाजील, चटोर ३३) विमानांचे स्थानक ३४) होडी.



**उभे शब्द –** १) पर्जन्यकाळ २) धनुष्यबाण ३) ध्वनी ४) माला, हार ५) संतोष ६) आश्रय १०) श्रीरामाची चरित्र गाथा १२) अगदी सारखे, तुल्य १३ नमते न घेण्याचा स्वभाव १४) शपथ १७) अगदी थेट सरळ १८) नोकरांशी केलेला करार २०) बडबड्या, फुशारक्या मारणारा २१) ज्याला बोलता येत नाही असा २४) दात २६) कंटाळवाणी बडबड २७) रक्त (ग्रा.) ३०) एक हजार शेराचे वजन ३२) टिंगल, उपहास.

*सुभाष पानसे*

### शब्दकोडे क्र. १०१ चे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| सा | र्व | ज | नि | क | | वि | | दि | व | टी | | हि | व | ता | प |
| र्व | | ल | ग | | का | का | कु | वा | | प | ग | डी | | ड | र |
| भौ | म | | म | त | | री | | भी | ड | | वा | स | | न | |
| म | | अ | वा | ह | क | | पा | त | | मा | | फि | का | | ना |
| प | वि | | दी | | दा | न | व | | त | न | स | डी | | पें | ग |
| द | रा | रा | | स | | द | | उ | | पा | | स | ही | | दि |
| | ण | | स | रो | ज | | फ | स्त | | न | र | क | | अ | वा |
| खो | | क | | द | | फा | | वा | चे | | ग | र | ती | | ळी |
| ज | म | द | ग्नी | | वा | टे | क | री | | पु | | णे | | पा | |
| | | म | | गो | ता | | ढी | | को | स | ली | | पु | ळ | का |
| ना | द | खो | र | | व | धू | | प | री | ट | | कु | | त | प |
| स्ति | | ल | व | क | र | | अ | र | | ता | ल | ब | द्ध | | रे |
| क | स | | ला | | ण | | ग | वा | र | | मा | डी | | प | |
| | र | थ | | र | | चा | र | | व | र | ण | | प | ड | दी |
| ना | क | | स | ब | ळ | | ब | ना | र | स | | लो | | दो | |
| व | त | न | वा | डी | | ब | त्ती | | व | | र | म | ता | रा | म |

## सुनील तांबे यांचे निधन



**रांजणगाव :** शिरूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती व गणेगाव खालसाचे माजी सरपंच सुनील दत्तात्रय तांबे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. ते ६४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

# आंबेनळी घाटातील अपघातानंतर निकृष्ट बांधकामाचा मुद्दा ऐरणीवर

## दोषींवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**सातारा, (प्रतिनिधी) :** रायगड जिल्ह्यातील आंबेनळी घाटात रविवारी मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात सातारा जिल्ह्यातील आठ तरुणांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण सातारा जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे. या घटनेनंतर पोलादपूर-महाबळेश्वर राज्य मार्गावरील निकृष्ट दर्जाच्या बांधकामाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, संबंधित ठेकेदारावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी 'धगधगती मुंबई'च्या वतीने करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील आसनगाव येथील आठ युवक सहलीसाठी गेले होते. रविवारी रात्री त्यांची मोटार आंबेनळी घाटात दरीत कोसळली. या दुर्घटनेत महेश अनिल पवार (वय २५), आदित्य अशोक साळुंखे (वय २१), रितेश राजेंद्र लोखंडे (वय २५), सुहास जितेंद्र लोखंडे (वय २०), अंश समीर चव्हाण (वय १८), उत्कर्ष आनंद शिंगटे (वय २१), अनिल अभिमन्यू शिंगटे (वय २५) आणि नितीन किसन नायकोंडे (वय ३५) यांचा मृत्यू झाला आहे. यातील एका तरुणाचा अपघाताच्या दिवशीच वाढदिवस असल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच रायगड व सातारा जिल्हा पोलिस प्रशासन, महाबळेश्वर ट्रेकर्स, प्रतापगड बचाव पथक, महाड-पोलादपूर येथील बचाव पथके आणि स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. सोमवारी सकाळपासून बचाव मोहिमेला अधिक वेग देण्यात आला.

दरम्यान, 'धगधगती मुंबई'चे संपादक तथा पत्रकार भीमराव हिंदुराव धुळप यांनी एप्रिल २०२६ मध्येच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना पोलादपूर-महाबळेश्वर राज्य मार्गावरील निकृष्ट दर्जाच्या बांधकामाबाबत लेखी तक्रार दिली होती. या तक्रारीत रस्ते, पूल व नाल्यांच्या कामात निकृष्ट दर्जाचे कॉंक्रिट वापरणे, योग्य प्रकारे क्युरिंग न करणे, नव्याने बांधलेल्या संरचनांमध्ये भेगा पडणे आदी गंभीर बाबी नमूद करण्यात आल्या होत्या. तक्रारीनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कार्यकारी अभियंत्यांना चौकशीचे आदेश देण्यात आले होते. सातारा सार्वजनिक बांधकाम मंडळाचे प्रथम लिपिक हेमंत गोसावी यांनीही संबंधित अधिकाऱ्यांना शासन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.

येत्या पावसाळ्यात या घाट मार्गावरील निकृष्ट बांधकामामुळे मोठा धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती स्थानिक नागरिक आणि वाहनचालक व्यक्त करत आहेत. आंबेनळी घाटातील भीषण दुर्घटनेनंतर संबंधित ठेकेदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी जोरदार मागणी आता पुढे येत आहे. या घटनेमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामकाजावरही गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# नोकरीच्या आमिषाने कोट्यवधींची फसवणूक

## टोळीतील एकाला अटक; बारामती तालुका पोलिसांची कारवाई



**बारामती, (प्रतिनिधी):** शासकीय नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत तरुण-तरुणींसह अनेकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या भामट्यांच्या टोळीवर बारामती तालुका पोलिसांनी मोठी कारवाई करत आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. बनावट नियुक्तिपत्रे देऊन तब्बल १ कोटी ३६ लाख ९० हजार रुपयांचा गंडा घातल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०२३ ते ४ मे २०२५ या कालावधीत तांदुळवाडी (ता.बारामती) येथील महिला हॉस्पिटल तसेच मळद परिसरात आरोपी अनिकेत धनंजय पाठक याने 'गट-क अधिपरिचारिका' पदावर शासकीय नोकरी लावून देतो, असे आमिष दाखवत महिला हॉस्पिटलमधील स्टाफ नर्स व इतरांची ओळख करून घेतली. त्यानंतर अजिक्य पाठक, सिओना साळवे ऊर्फ सिओना अनिकेत पाठक, सुधाकर सोळंकी, सागर गायकवाड आणि सुरज असदकर यांच्या मदतीने फिर्यादी व साक्षीदारांकडून वेळोवेळी ऑनलाईन तसेच रोख स्वरूपात तब्बल १ कोटी ३६ लाख ९० हजार रुपये उकळण्यात आले. विशेष म्हणजे, विश्वास संपादन करण्यासाठी आरोपींनी बनावट नियुक्तिपत्रेही दिली. मात्र प्रत्यक्षात कोणतीही नोकरी मिळाली नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर फसवणुकीचा प्रकार उघड झाला.

या प्रकरणी बारामती तालुका पोलिस स्थानकामध्ये मार्च २०२६ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू असताना पोलिसांना माहिती मिळाली की आरोपी सुरज असदकर हा चिंचवडगाव येथील घरी पत्नीला भेटण्यासाठी येणार आहे. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने आर्थिक फायद्यासाठी संगनमताने गुन्हा केल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपीस ६ दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली. यापूर्वी अजिक्य पाठक (रा.दौंड) आणि सुधाकर सोळंकी (रा. येरवडा) यांना अटक करण्यात आली आहे.


राजश्री — Draw Date: 2?-05-2026

| | |
|---|---|
| 10,000 | 8284 |
| 9,000 | 0286 |
| 600 | 0050 1627 2977 3417 9694 |
| 300 | [illegible] |
| 5th Prize ₹ 150 | [illegible] |


राजश्री — Draw Date: 2?-05-2026

| | |
|---|---|
| 10,000 | 9387 |
| 9,000 | 2828 |
| 600 | 0924 3569 6374 7631 8868 |
| 300 | [illegible] |
| 5th Prize ₹ 150 | [illegible] |

राजश्री — Draw Date: 2?-05-2026

| | |
|---|---|
| 10,000 | 1437 |
| 9,000 | 5697 |
| 600 | 0155 1406 1892 5392 6279 |
| 300 | [illegible] |
| 5th Prize ₹ 150 | [illegible] |


# खंडाळ्यातील धरणात बुडून युवकाचा मृत्यू



**सातारा,(प्रतिनिधी) :** खंडाळा येथील कायरखळ धरणामध्ये पोहायला गेलेल्या युवकाचा बुडून मृत्यू झाला. अतुल दिलीप शेडगे (वय २६, मूळ रा. सातारा, सध्या रा. पारगाव, ता. खंडाळा) असे त्याचे नाव आहे. याबाबतची माहिती अशी की, अतुल हा मित्रांसोबत खंडाळ्यातील कायरखळ धरणावर पोहण्यासाठी गेला होता. यावेळी त्याचे दोन मित्र विराज व विशाल हे दोघे पाण्यात उतरले. त्यांच्या पाठीमागे अतुल पोहत येत असताना त्याला दम लागला. त्याने मित्रांना मदतीसाठी आवाज देताच जवळच असलेला विराज मदतीला आला; परंतु तोपर्यंत अतुल पाण्यामध्ये बुडू लागला. विराजने त्याला वाचवण्याचा प्रयत्न करताना अतुलने मिठी मारली. दोघेही बुडू लागल्यावर विराज बाहेर आला. यानंतर त्यांनी खंडाळा पोलिस ठाण्याशी संपर्क साधला.

सहायक पोलिस निरीक्षक संतोष मस्के व कर्मचाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन पाहणी केली. तेथे उपस्थित ग्रामस्थांनी मृतदेह शोधण्याचा प्रयत्न केला. मात्र, मृतदेह सापडला नाही. परिणामी, आज भोर येथील बचाव पथकाच्या मदतीने शोधमोहीम राबवण्यात आल्यावर मृतदेह सापडला. यानंतर शवविच्छेदन पूर्ण करून मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. घटनेची नोंद खंडाळा पोलिस ठाण्यात झाली असून, अधिक तपास पोलिस अंमलदार संजय पोळ हे करीत आहेत.

# मंचरमध्ये कांद्याचा लिलाव बंद

## दर घसरल्याने नोंदविला निषेध



**मंचर,(प्रतिनिधी) :** कांद्याच्या बाजारभावात झालेल्या मोठ्या घसरणीमुळे कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून सरकारने या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याच्या निषेधार्थ मंगळवारी मंचर (ता. आंबेगाव) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीतील कांदा लिलाव शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी बंद पाडला. यावेळी सरकारने तातडीने हस्तक्षेप करून कांद्याला किमान दर द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

कांदा लिलाव बंद पाडण्याच्या अगोदर बाजार समितीच्या सभागृहात शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांच्या नेतृत्वाखाली बैठक घेण्यात आली. बैठकीत कांद्याच्या सध्याच्या बाजारस्थितीवर चर्चा करत आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात आली.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या प्रीती प्रवीण थोरात, तालुका राष्ट्रवादीचे अध्यक्ष धोंडीभाऊशेठ भोर, युवक अध्यक्ष विशाल वाबळे, मनोहर इंदोरे, गणेश यादव, संजय बढेकर, माऊली ढोमे, सचिन थोरवे यांच्यासह खेड, आंबेगाव, जुन्नर, शिरूर तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.

कांदा उत्पादकांना किमान २० रुपये प्रतिकिलो दर मिळावा, अशी भूमिका पदाधिकाऱ्यांनी मांडली. बैठकीत सरकारने यापूर्वी जाहीर केलेल्या १२ रुपये ३५ पैसे प्रतिकिलो दरावरही प्रश्न उपस्थित करण्यात आला. हा दर जाहीर करूनही प्रत्यक्ष कांदा खरेदी झाली नसल्याचा आरोप करण्यात आला. तसेच नाशिक जिल्ह्यासाठी १५ रुपये ८० पैसे दराने कांदा खरेदीचा निर्णय सोमवार दि.२५ रोजी रात्री जाहीर करण्यात आला असून तो संपूर्ण राज्यासाठी लागू करावा, अशी मागणी करण्यात आली. कांदा उत्पादन ते बाजारपेठ असा खर्च १५ ते १६ रुपये प्रतिकिलो होत असल्याने सध्याचा दर शेतकऱ्यांना परवडणारा नसल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

> कांदा उत्पादक शेतकरी सातत्याने तोट्यात जात असताना सरकारकडून ठोस निर्णय घेतला जात नाही. जाहीर केलेला दर व्यवहार्य नाही. राज्यातील सर्व शेतकऱ्यांना समान दराने दिलासा मिळाला पाहिजे.
>
> – **धोंडीभाऊशेठ भोर**, तालुका अध्यक्ष, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष.

> कांद्याच्या प्रश्नावर तातडीने निर्णय झाला नाही तर आंदोलनाची तीव्रता वाढवली जाईल. शेतकऱ्यांच्या हितासाठी लोकप्रतिनिधींनी स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी आमची भूमिका आहे.
>
> –**विशाल वाबळे**, युवक अध्यक्ष शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष.





## ज्योतिषविषयक

● **भाग्याच अचूकवेध घेण्यासाठी** हस्तरेषेवरून अचूक भविष्य! विवाह केव्हा? कोठे? भाग्योदय कोणत्या क्षेत्रात? वेळ ठरवून भेटा. पलास गुरुजी, शनिपार, पुणे. ९८२२७८४३५२.

●**सुनेत्रा भविष्य कार्यालय,** ज्योतिषी : नंदकिशोर चंद्रकांत उमराणी, मार्केटयार्ड, पुणे-३७. दूरभाष : ९८२२१९९६८०, ८०८७८३२३२४. भविष्य मार्गदर्शनासाठी भेटा.

## शैक्षणिक

● **टि.म.वि.तर्फे महिलांसाठी डेंटल असिस्टंट सर्टि कोर्स. फी रू.१२,०००/- वेळ स.७-१० कालावधी १ महिना, शनिवार पेठ, नोकरीच्या भरपूर संधी संपर्क : ९६६५७३४६९७**

## जागा मोकळी/विकत घेणे

● **क्लिअर तसेच वादातील (लिटिगेशन)** मिळकती विकत घेणे, सोडवून देणे, जागा शोधणे, लायझनिंगची कामे तसेच महसूलच्या सर्व कामांसाठी संपर्क : ९४२३००५६७३

## जागा भाड्याने देणे

● **कोरेगाव मूळ प्रयाग धाम** फाटा नजीक पुणे सोलापूर रोड लगत २५००० स्क्वेअर फूट गोडाऊन जागा भाड्याने देणे आहे. त्याचप्रमाणे गोडाऊन समोरील पुणे-सोलापूर रोड टच दोनशे फूट फ्रंट असणारी तीन एकर मोकळी जागा भाड्याने देणे आहे. (शो-रूम, वर्कशॉप, कुठल्याही प्रकारची वाहने, पार्किंग, मंगल कार्यालय, बँक्वेट हॉल आणि इतरही व्यवसायासाठी उपयुक्त अशी जागा) संपर्क : ७५८८०३३८८१ ९४२३५७२०९१

## नोकरीविषयक

● **विमाननगरमधील रिअल** इस्टेट एजन्सीकरीता लोकल ड्रायव्हिंगसाठी फुलटाईम कार ड्रायव्हर पाहिजे. जवळपास राहणाऱ्यास प्राधान्य. संपर्क : ९८८१००९२२३

## संकिर्ण

● **वाहन विषयक:** सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे पती अशोक ज्ञानेश्वर सुतार यांचे ६ ऑक्टोबर २०२२ रोजी निधन झाले. त्यांचे नावावर असलेली मारुती सुझुकी कंपनीची सिल्की सिल्वर रंगाची व्हॅगन आर ग्रीन LXI गाडी क्र. MH 14-GS-5098 ही माझ्या नावावर करायची आहे. सदर बाबत कोणाला हरकत असल्यास परिवहन अधिकारी पिंपरी-चिंचवड यांच्याकडे संपर्क साधावा.

**नोटीस देणार- श्रीमती साधना अशोक सुतार**

## निवेदन

''केसरी'' दैनिकांतील जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकुरानुसार छापल्या जातात. या मजकुराच्या सत्यतेबाबतची खातरजमा वाचकांनी स्वतःच्या जबाबदारीवर करावयाची आहे. केसरी-मराठा ट्रस्ट याबाबत कोणतीही आर्थिक व कायदेशीर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जबाबदार राहणार नाही.

–व्यवस्थापक


## के सुरभी लॉटरी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 235 04 248 | 338 46 600 | 367 65 168 | 488 04 158 | 145 04 770 | 278 74 680 |
| 278 77 250 | 249 51 678 | 578 04 149 | 346 34 167 | 168 55 366 | 130 42 390 |
| 235 02 156 | 670 39 135 | 334 06 150 | 790 67 124 | 457 69 126 | 348 54 149 |
| * | 250 76 600 | 348 59 234 | 788 35 159 | 146 12 778 | 700 70 235 |
| 379 91 489 | 188 78 378 | 279 82 138 | 147 20 145 | 456 54 789 | 259 65 267 |
| 458 77 250 | 479 00 244 | 788 36 457 | 147 25 113 | 260 88 378 | 156 27 269 |
| 270 94 789 | 670 31 380 | 230 55 690 | 130 49 199 | 678 18 350 | 146 15 357 |
| 577 97 700 | 699 49 469 | 250 71 489 | 146 17 223 | 588 12 589 | 148 33 689 |
| 137 13 148 | 289 94 680 | * | 234 90 578 | 140 56 123 | 150 63 670 |
| 890 70 127 | 129 21 100 | 445 30 370 | 260 88 134 | 335 15 230 | 357 54 248 |
| 249 58 224 | 588 13 256 | 368 72 480 | 589 25 177 | 578 06 457 | 189 82 156 |
| 399 17 278 | 357 59 577 | 112 42 589 | 889 51 678 | 269 77 179 | 236 11 579 |
| 566 74 248 | 578 04 446 | 678 19 126 | 678 16 150 | 889 50 370 | 138 26 240 |
| 159 51 560 | 278 76 457 | 780 56 367 | 267 51 380 | 180 96 150 | 679 28 468 |
| 788 30 190 | 460 03 229 | 458 77 269 | 140 53 599 | 279 89 469 | 490 33 120 |
| 348 53 148 | 690 52 480 | 455 48 459 | 479 04 220 | 468 83 256 | 269 79 450 |
| 179 79 135 | 469 98 224 | 890 75 348 | 256 37 269 | 180 97 250 | 123 68 459 |
| 180 95 339 | 137 13 148 | 568 95 168 | 690 51 236 | 355 34 167 | 137 18 288 |
| 588 14 770 | 579 14 590 | 670 32 679 | 679 20 479 | 234 93 256 | 368 78 279 |
| 567 89 126 | 330 64 347 | 689 31 678 | 156 24 130 | 127 00 190 | 678 13 238 |
| 557 72 255 | 890 71 128 | | | | |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित
आजच्या लॉटरी शुभांकाचा ''जॅकपॉट''

**आजचा रामबाण**

| | |
|---|---|
| १४६२९१ | ९१ |
| १५७८९३ | ९३ |

एम.के. लक्ष्मी लॉटरीकरिता
ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित

**आजच्या शुभराशी**

| तूळ | वृश्चिक | धनू |
|---|---|---|
| ४ | ५ | ९ |
| १६७ | २६७ | १२६ |
| २५७ | ४५६ | २७० |
| ५९० | ७८० | ४७८ |

**एकच फायनल**

| | | |
|---|---|---|
| १३७ | | ३४४ |
| १४६ | १ | ४८९ |
| २९० | | ५७९ |

**संयुक्त राशी**

| | | |
|---|---|---|
| १६ | ३७ | २८ |
| ६१ | ७३ | ८२ |

**''पहाटेचे स्वप्न''**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२० | ३४६ | ३ | ३१ | ३४ |
| २३८ | ५८० | | ३५ | ३८ |

**सोमवार ते बुधवार**


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२५ | ३५० | ८१ | ८३ | ८ |
| २७९ | ४६८ | ८५ | ८९ | |

ज्योतिष व संख्या शास्त्रावर आधारित शुभांक
८९०-७ के १२८-१

## 'जनक'चे चित्रीकरण अवघ्या १९ दिवसांत

अभिषेक कंवर यांच्या आगामी 'जनक' या मराठी चित्रपटाचे चित्रीकरण नुकतेच पुणे आणि भोरच्या परिसरामध्ये अवघ्या १९ दिवसांच्या विक्रमी वेळेत पूर्ण झाले. 'आरटीबी फिल्म्स' या बॅनरखाली निर्मित 'जनक' चित्रपटाच्या माध्यमातून अभिषेक कंवर हे निर्माता आणि दिग्दर्शक अशा दोन्ही भूमिकांतून मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करत आहेत. त्रिलोक सिंग राजपूत यांनी या चित्रपटात सहनिर्माते म्हणून काम पाहिले आहे. या चित्रपटात सायली संजीव, अविनाश नारकर, अनुष्का मनीष पिंपुटकर आणि सुरेश विश्वकर्मा यांच्या भूमिका आहेत. पटकथा ओंकार भस्मे, अभिषेक कंवर आणि राकेश नामदेव शिर्के यांनी लिहिली आहे. नियोजन आणि संपूर्ण पथकाच्या मेहनतीमुळे केवळ १९ दिवसांत संपूर्ण चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण करण्याचा विक्रम टीमने केला.

**बुधवार दि. २७ मे २०२६**
।।श्री।।
१-४




## सिग्निफाय फिलिप्स स्मार्ट प्रकाश केंद्रांची संख्या ३४५ वर

**पुणे :** जागतिक प्रकाशयोजना क्षेत्रातील आघाडीची कंपनी सिग्निफायने भारतभर आपल्या फिलिप्स स्मार्ट प्रकाश केंद्र जाळ्याचा विस्तार करत देशातील उपस्थिती ३४५ दुकानांपर्यंत वाढवली आहे. स्मार्ट आणि जोडलेल्या घरगुती सुविधांकडे ग्राहकांचा वाढता कल लक्षात घेऊन कंपनीने हा विस्तार हाती घेतला आहे. मे महिन्यात कंपनीकडून तब्बल १५ नवीन स्मार्ट प्रकाश केंद्रे सुरू करण्यात येत असून, त्यामध्ये नोएडा, दिल्ली, सोनीपत, बेंगळुरू, हैदराबाद, चेन्नई, रायपूर, बरेली, सोलन, विजयवाडा आणि मध्यमग्रामसह विविध शहरांचा समावेश आहे. या माध्यमातून सिग्निफायने अनुभवाधारित आणि आकर्षक रचनांवर आधारित प्रकाशयोजना विक्रीला अधिक चालना दिली आहे. कंपनीच्या मते, नवीन स्मार्ट प्रकाश केंद्रांमध्ये ग्राहकांना सजावटी, उपयुक्त आणि स्मार्ट प्रकाशयोजना उपायांचा विस्तृत अनुभव घेता येणार आहे. आधुनिक गृहसजावट, वैयक्तिक पसंती आणि ऊर्जा बचतीवर भर देणाऱ्या ग्राहकांसाठी ही केंद्रे विकसित करण्यात आली आहेत.

## ओबेन इलेक्ट्रिकचा विस्तार, रोअर इव्होला प्रतिसाद



ओबेन इलेक्ट्रिकच्या नव्या रोअर इव्हो मोटरसायकलला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळाला असून लॉंचनंतर अवघ्या १५ दिवसांत २५ हजार बुकिंग झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर कंपनीने आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत महाराष्ट्रात २५ शोरूम सुरू करण्याची योजना आखली आहे. कंपनीने पुण्यातील शिवाजीनगर शोरूममध्ये रोअर इव्होचे महाराष्ट्रासाठी प्रादेशिक सादरीकरण केले. सध्या ओबेन इलेक्ट्रिकची महाराष्ट्रात ११ शोरूम्स कार्यरत असून, त्यापैकी पुण्यात वाकड, शिवाजीनगर, अरण्येश्वर आणि चिंचवड येथे चार शोरूम्स आहेत. नव्या मोटरसायकलीला मिळालेला प्रतिसाद हा भारतातील इलेक्ट्रिक मोटरसायकल क्षेत्रातील सर्वात वेगवान सुरुवातीच्या बुकिंग्सपैकी एक मानला जात आहे. या मोटरसायकलची डिलिव्हरी जून पासून सुरू होणार असून ग्राहकांना अद्याप ऑनलाइन पेमेंट पोर्टलद्वारे ९९,९९९ (एक्स-शोरूम) या प्रारंभिक किमतीचा लाभ घेता येणार आहे. कंपनीच्या विस्ताराबाबत बोलताना मधुमिता अगरवाल म्हणाल्या, महाराष्ट्र प्रीमियम इलेक्ट्रिक मोटरसायकल्ससाठी अत्यंत महत्त्वाची बाजारपेठ म्हणून उदयास आले आहे.

## केआयएलचे निकाल जाहीर

किर्लोस्कर इंडस्ट्रीजने चौथ्या तिमाहीचे आणि आर्थिक वर्षाचे आर्थिक निकाल जाहीर केले. केआयएलचे व्यवस्थापकीय संचालक जॉर्ज वर्गीस म्हणाले, एकत्रित आकडेवारीचा विचार करता, आम्ही हे आर्थिक वर्ष एकूण ७,०१३ कोटी रुपयांच्या उत्पन्नासह म्हणजेच वार्षिक ५ टक्के वाढ आणि ३५४ कोटी रुपयांच्या निव्वळ नफ्यासह, वार्षिक १५ टक्के वाढीने पूर्ण केले.

# होर्मुझ आंतरराष्ट्रीय व्यापारी मार्ग; टोल वसुली खपवून घेणार नाही

## क्वाड देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी इराणला बजावले



**नवी दिल्ली :** होर्मुझची सामुद्रधुनी आणि लाल समुद्र आंतरराष्ट्रीय व्यापाराचा मार्ग आहे. संयुक्त राष्ट्राच्या समुद्र कायद्यानुसार प्रत्येक देशाला या मार्गातून जहाज वाहतुकीचा अधिकार आणि स्वातंत्र्य आहे. व्यापारी जहाजांवरील हल्ले चुकीचे आहेत. तसेच होर्मुझमधून टोल वसुली करण्याचा निर्णय अमान्य आहे, असे क्वाड देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी मंगळवारी स्पष्ट केले.

भारत आणि प्रशांत महासागरातील अमेरिका, भारत, ऑस्ट्रेलिया आणि जपान या देशांच्या संघटनेला क्वाड असे संबोधले जाते. या देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक काल हैदराबाद हाऊसमध्ये झाली. बैठकीनंतर संयुक्त पत्रकार परिषदेत ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्र मंत्री पेनी वाँग, डॉ. जयशंकर, जपानचे तोशीमीत्सु मोटेगी आणि अमेरिकचे मार्क रुबियो यांनी होर्मुझबाबत संयुक्त निवेदन दिले.

भारत आणि प्रशांत महासागरातील चीनचा वाढता लष्करी प्रभाव कमी करण्यासाठी क्वाड देश आता एकवटले असून त्यांनी दुर्मिळ खनिजे आणि ऊर्जा सुरक्षा आणि बंदरांचा विकास करण्यासाठी सहकार्य करण्याचा निर्णय घेतला. चीनची लुडबूड वाढत असल्याने सागरी सुरक्षेबाबत संयुक्त पाहणी करण्याचाही निर्णय घेतला आहे

डॉ. जयशंकर यांच्या अध्यक्षतेखाली परराष्ट्र मंत्र्यांची बैठक झाली. मार्क रुबियो म्हणाले, क्वाडच्या बैठकीत भारत आणि प्रशांत महासागरात पाहणी करण्यासाठी चारही देशांनी निर्णय घेतला आहे. बंदरांवर पायाभूत सुविधांचा विकास करण्यावर पुढाकार घेण्यावर एकमत झाले. सागरी सुरक्षेला प्राधान्य देण्यावर भर देशांनी या वेळी दिला. संयुक्त निवेदनात देशांनी दुर्मिळ आणि भावी तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करण्यावर भर दिला. येत्या काही महिन्यांत पुढील पिढीतील दळणवळणातील आधुनिक कामे मार्गी लावण्यावर भर देतील. त्यामध्ये डिजिटल ओळख श्रेणीवर कार्यशाळा आणि कार्यदल विकास.

### पहलगाम आणि बोंडी किनाऱ्यावरील दहशतवादी हल्ल्याचा निषेध

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे गेल्या वर्षी २२ एप्रिल रोजी आणि ऑस्ट्रेलियातील बोंडी बेटावर गेल्या वर्षी १२ डिसेंबर रोजी दहशतवादी हल्ला झाला होता. त्याचा निषेध क्वाड देशांनी संयुक्त निवेदन काढून केला. आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार दहशतवादाविरोधात लढा आणि कारवाई करण्यावर एकमत असल्याचे सांगितले. दहशतवादाला प्रोत्साहन देणारे देश, त्यांचे हस्तक, म्होरके, आर्थिक मदत करणारे घटक यांच्याविरोधात क्वाड देश कार्य करणार आहेत. मानकआधारित कार्यबल विकासावरील ट्रॅक १.५ याचा समावेश आहे.

### गटबाजी मुळीच नको

#### चीनचा थयथयाट...

क्वाड देशांच्या परिषदेमुळे चीनचा थयथयाट झाला आहे. क्वाड देशांनी जरूर एकमेकांशी सहकार्य वाढवावे; पण गटबाजी करून चीनसारख्या तिसऱ्या देशाविरोधात ती कार्यरत राहता कामा नये, आम्हाला लक्ष्य करू नका, अशी गरळ ओकली आहे. प्रादेशिक शांततेची अधिक गरज आहे. आम्ही कोणत्याही प्रकारच्या विशेष गटांची निर्मिती अथवा गटांमधील संघर्षपूर्ण सामना यांचेही समर्थन करत नाही. कोणत्याही सहकार्यामुळे प्रादेशिक देशांमधील परस्पर विश्वास आणि सहकार्याला बाधा पोहोचता कामा नये, असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या माओ निंग यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# इराणच्या सुरुंग पेरणाऱ्या नौकांवर अमेरिकेकडून क्षेपणास्त्र हल्ले

## बंदर अब्बास आणि होर्मुझजवळच्या क्षेपणास्त्र तळावरही मारा


**वॉशिंग्टन :** समुद्रात सुरुंग पेरणाऱ्या इराणच्या नौकांवर आणि बंदर अब्बास आणि नौदल तळावर व क्षेपणास्त्र ठेवलेल्या ठिकाणांवर अमेरिकेने सोमवारी क्षेपणास्त्र हल्ले केले. स्वसंरक्षणासाठी आणि सैनिकी तुकड्यांना इराणी सैन्याकडून होणाऱ्या हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी क्षेपणास्त्र हल्ले केल्याचा दावा अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने केला आहे. इराणसोबत शांतता करार करण्याबाबत चर्चा सुरू असताना अमेरिकेने हल्ले केल्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे.

अमेरिका आणि इराणमध्ये शांतता करार करण्यासाठी चर्चा वेगाने सुरू असताना अमेरिकेने अचानक इराणच्या नौकांवर हल्ले केल्यामुळे शांतता प्रक्रियेला खिळ बसण्याचा धोका निर्माण झाला आहे. इराणच्या इस्लामिक रेव्हूल्यूशनरी गार्डने सांगितले की, अमेरिकेचे एक ड्रोन पाडले असून लढाऊ विमान आणि इराणच्या हद्दीत आलेल्या एका ड्रोनवर हल्ला केला. पण, प्रति हल्ल्याची घटना केव्हा घडली ? याबाबत सरकारच्या माध्यमांनी माहिती दिलेली नाही. अमेरिकेकडून युद्धबंदीचे उल्लंघन होत असेल तर वैध आणि निश्चित पुन्हा हल्ला करण्याचा अधिकार असल्याचा दावा इरणने केला.

अमेरिकेच्या सेंट्रल कमांडचे प्रवक्ते कॅप्टन टीम हॉकिन्स यांनी सांगितले की, स्वसंरक्षणासाठी आणि इराणच्या सैन्यांकडून अमेरिकेच्या सैन्य तुकड्यांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी दक्षिण इराणमध्ये हल्ले चढवले आहेत. युद्धविराम सुरू असला तरी सेंट्रल कमांडला सैन्य तुकड्यांचे रक्षण करण्याचा अधिकार आहे. ते म्हणाले, इराणच्या दक्षिणेकडील बंदर अब्बास आणि होर्मुझ सामुद्रधुनी जवळच्या नौदल तळावर हल्ले केले आहेत. दरम्यान, इराणी माध्यमांनी सांगितले की, बंदर अब्बास येथील हल्ल्यानंतरचे स्फोटांचे आवाज ऐकल्यानंतर स्थानिक अधिकाऱ्यांनी तपासासाठी तेथे धाव घेतली होती. तेथे किती नुकसान झाले? याचा तपशील प्राप्त झालेला नाही.


### होर्मुझ खुली करण्यासाठी सर्व पर्याय खुले : रुबियो

भारत दौऱ्यावर आलेले अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी सांगितले की, हल्ल्यांनंतर शांतता करार होण्यात कोणतीही अडचण येणार नाही. इराणचे वार्ताकार, परराष्ट्र मंत्री आणि कतारच्या पंतप्रधानांसोबत मंगळवारी चर्चा सुरू होती. चर्चेत प्रगती होईल, असा आशावाद प्रकट करताना ते म्हणाले, मला वाटते बरीच अशी चर्चा पूर्वी झाली आहे. प्राथमिक कागदपत्रे पाहता विशिष्ट अशा भाषेत पुढेही सुरु राहील. त्यासाठी आणखी काही दिवस लागतील. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शांतता करार करण्याची इच्छा प्रकट केली आहे. ते एक तर करार करतील अथवा करणारही नाहीत. हल्ल्याबाबत विचारले असता ते म्हणाले, होर्मुझ खुली करण्याची गरज आहे. ती कोणत्याही पद्धतीने खुली केली जाईल. पण, ती खुली होणे काळाची गरज आहे. होर्मुझ बेकायदा बंद करून ठेवल्यामुळे जागतिक खनिज तेल आणि वायूच्या पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे होर्मुझ बंद ठेवणे स्वीकारता येणार नाही.



### प्रत्युत्तर देण्याचा इराणचा इशारा

अमेरिकेने युद्धविरामाचे उल्लंघन केल्याचा आरोप करत इराणने हल्ल्याची निंदा केली. प्रत्युत्तर दिले जाईल, अशी शपथ घेतली आहे. हल्ल्यांसंदर्भात अनेक थेट इशारे आणि निवेदने जारी केली आहेत. इराणी लष्करी आणि सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, स्वतःचा बचाव करण्याचा कायदेशीर आणि निश्चित अधिकार आहे आणि ते प्रत्युत्तर देण्यास अजिबात संकोच करणार नाहीत. भविष्यात होणाऱ्या कोणत्याही आक्रमणाला प्रदेशाच्या सीमांच्या पलीकडे जाऊन प्रत्युत्तर दिले जाईल.



सौदी अरेबियातील 'अरफात' पर्वत हज यात्रेचा सर्वोच्च टप्पा मानला जातो. मंगळवारी हजारो यात्रेकरू कडक उन्हात पर्वत चढून आले होते.

# आंबेनळी घाट दुर्घटनेतील पाच मित्रांच्या पार्थिवावर एकाचवेळी अंत्यसंस्कार



**सातारा, (प्रतिनिधी):** रात्री दीड वाजता मृतदेह गावी आले आणि आसगाव मधील तो हृदय पिळवटून टाकणारा आक्रोश ऐकून मन सुन्न झाले. साताऱ्याहून कर्दे बीचला फिरण्यासाठी गेलेल्या साताऱ्यातील आठ युवकांचा पोलादपूर जवळच्या आंबेनळी घाटात मोटार पंधराशे फूट खोल दरीत जाऊन मृत्यू झाल्याची घटना घडली. यामधील सर्वांना महाबळेश्वर आणि प्रतापगड ट्रेकर्स यांच्या माध्यमातून त्यांचे दरीतून मृतदेह काढण्यात यश आले. यामधील पाच मृतदेह आसगाव येथील अडीच वाजता पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

दरम्यान मर्दे गावातील दोन युवकांवर आणि खटावमधील एकावर पहाटेच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी संपूर्ण गाव सुन्न झालेले पाहायला मिळाले. या घटनेमुळे अनेकांना आपले अश्रू अनावर झाले.

मृतदेह गावामध्ये दाखल झाल्यानंतर घरातल्यांचा आक्रोश हा हृदय पिळवटून टाकणारा होता. ज्या तरुणांचा मृत्यू झाला त्यांचे गावातील सहकारी मित्र अशी काही घटना घडली आहे हे मान्य असच तयार नव्हते. या घटनेवर विश्वास बसत नव्हता. त्यामुळे त्यांची गाडी गावात येईल या आशेवर ते रस्त्याकडे डोळे लावून पाहिले बसले. होते. मात्र रात्री मृतदेहच गाडीतून आले.

गावच्या आणि एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होताना कधी मागेपुढे न पाहणारी, अडीअडचणी धाऊन येणारी आसगावातील मुले पाचही तरुण जिवलग मित्र होते. त्यांच्या मृत्यूने आसगाव मी शब्द झाले. एकाच वेळी त्यांच्यावर रात्री अंत्यसंस्कार करण्यात आले. मर्दे दोन्ही मुले उच्चशिक्षित होती.

घरचा आधार होती. आजगाव येथील मित्राचा वाढदिवस करून ते गावी परतत असताना त्यांच्या गाडीला अपघात झाला त्यांच्यावर ही रात्री अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी गावातील वातावरण भाऊ झाले होते सर्वत्र शोककळा पसरली होती. खटाव येथील युवक समाजकार्यात सहभागी असायचा त्याचा जिल्हाभर मित्रपरिवार होता घरची परिस्थिती बेताची असतानाही त्याने आपल्या कुटुंबाची जबाबदारी सांभाळली होती त्याच्यावर ही खटाव येथे रात्रीच अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी संपूर्ण गाव सुन्न झालेले पाहायला मिळाले. या घटनेमुळे अनेकांना आपले अश्रू अनावर झाले.

**जाता जाता – गणेश काटकर**




साहेब, हे गाणे ऐकत ऐकत झाडे तोडताना अजिबात कंटाळा येत नाही..

मध्य प्रदेशातील हुंडाबळी प्रकरण

# माजी न्यायाधीश असलेल्या सासूची सीबीआय चौकशी



त्विशा शर्मा

**भोपाळ :** मध्य प्रदेशातील मॉडेल ते अभिनेत्री असा प्रवास करणाऱ्या त्विशा शर्माचा संशयास्पद मृत्यू आणि हुंडाबळी प्रकरणी सीबीआयच्या पथकाने तिची सासू आणि माजी न्यायाधीश गिरीबाला सिंह यांची मंगळवारी चौकशी केली.

दरम्यान, कुटुंबीयांच्या मागणीनुसार त्विशाच्या मृतदेहाची दुसऱ्यांदा पुढील तपासणी नुकतीच केली होती. सीबीआयच्या पथकातील काही महिला सुरक्षा कर्मचाऱ्यांनी सिंह यांच्या कुटुंबातील सदस्यांची कातरा हिल परिसरातील घरात भेट घेतली. यानंतर पथक कुरुक्षेत्र मेस परिसरातील शहाजहाँनाबाद परिसरात राहणाऱ्या त्विशाच्या घरी पोहोचले. १२ मे रोजी त्विशाचा मृतदेह घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत सापडला होता. यानंतर आत्महत्या की हत्या असा संशय बळावला होता. हुंड्याच्या त्रासाला कंटाळून तिने टोकाचे पाऊल उचलले असल्याचे तिच्या कुटुंबातील सदस्यांनी सांगितले होते. या प्रकरणाचा तपास आता सीबीआयने सुरू केला आहे. या प्रकरणी तिचे पती व वकील समर्थ सिंह आणि त्याची आई गिरीबाला सिंह यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. सीबीआयने विशेष गुन्हे तपास पथक आवश्यक कागदपत्रे आणि पुरावे गोळा करण्यासाठी भोपाळला पाठवले आहे. दरम्यान, माजी महिला न्यायाधीश यांच्या सुनेच्या मृत्यूचे आणि प्रकरण हुंडाबळीचे असल्याचा आरोप होत आहे. सीबीआयच्या तपासात काय उघड होते ? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# गुजरातच्या महिलेची अमेरिकेत हत्या



**व्हर्जिनिया :** गुजरातमधील एका महिलेची अमेरिकेतील व्हर्जिनिया येथील सुपरमार्केटमध्ये हत्या झाली आहे. सुपर मार्केटमध्ये दरोडा घालताना गोळीबार झाला असावा. त्यातून ही हत्या झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला.

मेघाबेन पटेल (वय ४५) यांची हत्या झाली आहे. त्या गेल्या दहा वर्षांपासून सुपर मार्केटमध्ये काम करत होत्या. गोळीबाराची आणि त्यांची हत्या झाल्याची घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. या प्रकरणी आता चौकशी सुरू झाली असून विशेष तपास पथक तयार केले असून मारेकऱ्याचा शोध घेत आहेत.

# ओडिशात सेप्टिक टँकमध्ये गुदमरुन सहा जणांचा मृत्यू

**भुवनेश्वर :** ओडिशातील कालाहांडी जिल्ह्यात बांधकाम सुरू असलेल्या सेप्टिक टँकमध्ये गुदमरून सहा जणांचा मृत्यू झाला. कारीकुथा गावात अशाच घटनेत एक जण आजारी पडला आहे. मुख्यमंत्री मोहन माझी यांनी मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी चार लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली.

कालाहंडी जिल्ह्यातील मदनपूर रामपूर परिसरातील घटनेत सहा जणांचा मृत्यू होण्याची घटना अत्यंत दुर्दैवी असल्याचे माझी यांनी सांगून दुःख व्यक्त केले. मुख्यमंत्री मदत निधीतून आर्थिक मदत जाहीर करत असल्याचे ते म्हणाले.

# महिलेसह सात न्याय अधिकाऱ्यांना डांबणाऱ्या १५ जणांना अटक

### एनआयएची कारवाई

**कोलकाता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीपूर्वी विशेष मतदार यादी सुधारणा मोहीम (एसआयआर) राबविली होती. त्यात सहभागी महिला न्याय अधिकाऱ्यासह आठ जणांना मालदा जिल्ह्यातील मोथाबारी येथे जमावाने डांबून ठेवले होते. तसेच रास्तारोखा करून हिंसाचार केला होता. या प्रकरणी 'राष्ट्रीय तपास संस्थेने' (एनआयए) मंगळवारी छापे घालून १५ जणांना अटक केली.

न्याय अधिकाऱ्यांना डांबण्याच्या घटनेची दखल सर्वोच्च न्यायालयाने स्वतः घेतली होती. त्यानंतर भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार तपासाची सूत्रे 'राष्ट्रीय तपास संस्थेने' (एनआयने) घेतली होती. काल मालदा जिल्ह्यात व्यापक झडती मोहीम राबवली. न्याय अधिकाऱ्यांना बेकायदा डांबणे, रास्तारोखा करून हिंसाचार केल्याप्रकरणी एकूण १५ जणांना पकडले आहे एका प्रकरणात १२ जणांचा समावेश आहे. जोशिम एस.के. आणि अस्माउल एस.के. हे प्रमुख आरोपी आहेत. त्यांनी हैबतोला-अमलीतोला मार्ग अडवला होता. महिला न्याय अधिकाऱ्यांना सुमारे आठ तास डांबून ठेवले होते. अन्य तीन आरोपींमध्ये आलमगीर एसके, नुरुल इस्लाम आणि हबीबुर रहमान यांचा समावेश आहे. त्यांनी मोथाबारी विभागातील बागमारा पुलावरचा रस्ता अडविला होता. तसेच बीडीओ कार्यालयात सात न्याय अधिकाऱ्यांना डांबून ठेवले होते. एकाला वाहनाबाहेर पडू दिले नव्हते. १ एप्रिल रोजी मतदान यादीतून नावे वगळल्याचा आरोप करत जमावाने जोरदार निदर्शने केली आणि वाहनाची तोडफोड केली होती.

### झिपलाइन केबलवरुन पडून मुलाचा मृत्यू

**आग्रा :** आग्रा येथील एम्युझमेंट पार्कमध्ये झिपलाइन केबलवरुन पडून एका मुलाचा मृत्यू झाला. ताजगंज परिसरात दुर्घटना घडली. कुणाल अग्रवाल, असे मुलाचे नाव आहे. तो १६ वर्षांचा आहे. रविवारी तो पालकांसोबत खेळाचा आनंद लुटण्यासाठी आला होता. झिपलाइन केबलवरुन घसरुन पडला होता. त्याला सरोजनी नायडू वैद्यकीय महाविद्यालयात हलवले. तेथे त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. तो फिरोजाबादचे बांगडीचे व्यापारी पंकज अग्रवाल यांचा मुलगा आहे.

# गीर अभयारण्यातील पाच सिंहांचा मृत्यू

## दोन छाव्यांचा समावेश, संसर्गजन्य आजाराचा संशय

**अहमदाबाद :** देशातील सिंहांचे मोठे आश्रयस्थान असलेल्या गीर अभयारण्यातील पाच सिंहांचा मृत्यू झाला आहे. त्यात दोन छाव्यांचा समावेश आहे. छाव्यांचा संसर्गजन्य आजारने मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त होत आहे.

तीन सिंहांचा नैसर्गिक मृत्यू वेगवेगळ्या ठिकाणी आणि भांडणातून झाला असल्याचे वन अधिकाऱ्यांनी सांगितले. छाव्यांना बाबेसिया विषाणूचा संसर्ग झाला होता. गीर जंगलात मोठी साथ किंवा रोगाचा उद्रेक झालेला नाही, असे वन मंत्री अर्जुन मोधवाडिया यांनी सांगितले. ते म्हणाले, बाबेसिया विषाणूचा संसर्ग गोचिडमुळे पसरतो त्यामुळे वन्य प्राण्यांचे आरोग्य खालावते. त्यांना खोकला आणि त्यांच्या नाकातून द्रव पाझरते. या विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी वन विभाग आणि डॉक्टरांचे पथक कार्यरत आहे. संसर्ग झालेला सिंहांचा शोध आणि नमुने गोळा केले जात आहेत. तसेच त्यांच्या शरीरावरील गोचिड काढण्याचे काम हाती घेतले आहे.



# निरामय

## उन्हाळ्यातही मलेरियाचा धोका

पूर्वी मलेरिया हा प्रामुख्याने पावसाळ्यात होणारा आजार मानला जात होता; मात्र आता परिस्थिती बदलत आहे. मुंबईसारख्या शहरांमध्ये उन्हाळ्यातही मलेरियाचे रुग्ण वाढताना दिसत आहेत. पावसाळ्याइतके प्रमाण नसले, तरी ही वाढ चिंताजनक असून बदलत्या ट्रेंडकडे निर्देश करते.

**आरोग्यमंत्र**
**डॉ. कुंदन गायकवाड**

पर्यावरणातील बदल, जैविक अनुकूलता आणि झपाट्याने होणारे शहरीकरण ही प्रमुख कारणे आहेत. तापमानातील वाढ हे यामागील महत्त्वाचे कारण आहे. वाढत्या उष्णतेमुळे मलेरियाचे ॲनोफिलीस डास आता गरम हवामानातही टिकून राहू शकतात. पूर्वी उष्ण तापमान त्यांच्या वाढीस मर्यादा घालते, असे मानले जात होते; मात्र आता हे दोन्ही घटक त्या परिस्थितीशी जुळवून घेत आहेत. शहरांमधील 'अर्बन हीट आयलंड' हा देखील एक महत्त्वाचा घटक आहे. मुंबईसारख्या दाट वस्तीच्या शहरांमध्ये काँक्रीटचे प्रमाण जास्त असल्यामुळे उष्णता साठून राहते आणि स्थानिक पातळीवर उष्ण वातावरण तयार होते.

पाण्याच्या साठवण करण्याच्या पद्धतीदेखील महत्त्वाची भूमिका बजावतात. अनेक घरांमध्ये पाणी ड्रम, टाक्या किंवा इतर उघड्या भांड्यांमध्ये साठवले जाते. ही ठिकाणे डासांच्या प्रजननासाठी आदर्श ठरतात. याशिवाय, बांधकामस्थळे, टेरेस आणि मोकळ्या जागांमध्ये साचलेले पाणीही डासांची पैदास वाढवते. परिणामी मलेरियाचा धोका वाढतो. डास नियंत्रणाच्या उपाययोजनांमध्ये असलेली कमतरता हीदेखील एक गंभीर समस्या आहे. पारंपरिकरीत्या डास नियंत्रणावर अधिक भर पावसाळ्यात दिला जातो; मात्र आता मलेरिया वर्षभर आढळत असल्याने केवळ हंगामी उपाय पुरेसे ठरत नाहीत. यासाठी वर्षभर सातत्याने नियंत्रण उपाययोजना राबवणे आवश्यक आहे.

स्थलांतर हा महत्त्वाचा घटक

शहरांमध्ये मलेरिया जास्त प्रमाणात असलेल्या भागांमधून लोक येतात. अशा व्यक्तींमुळे संक्रमण शहरांमध्ये येऊ शकते आणि स्थानिक डासांद्वारे ते पुढे पसरू शकते. त्यामुळे ऑफ-सीझनमध्येही मलेरिया टिकून राहतो. याशिवाय, कीटकनाशकांविरुद्ध डासांमध्ये वाढत असलेली प्रतिकारशक्ती चिंतेचा विषय आहे. काही भागांमध्ये वापरल्या जाणाऱ्या कीटकनाशकांविरुद्ध डासांनी प्रतिकार विकसित केला आहे. स्थलांतरामुळे हे प्रतिरोधक प्रकार शहरांमध्येही येत आहेत. त्यामुळे नियंत्रण अधिक कठीण होते.

**प्रतिबंधात्मक उपाय**

या समस्येवर काही प्रतिबंधात्मक उपाय आवश्यक आहेत. घराजवळ पाणी साठू देऊ नये आणि पाण्याच्या टाक्या व भांडी झाकून ठेवावीत. यामुळे डासांची पैदास कमी होऊ शकते. तसेच, धोरणात्मक पातळीवर वर्षभर सातत्याने डास नियंत्रण कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे. वैयक्तिक पातळीवरही संरक्षण महत्त्वाचे आहे. बाहेर जाताना पूर्ण बाह्यांचे कपडे परिधान करावेत आणि त्वचा उघडी राहणार नाही याची काळजी घ्यावी.



## हंटा व्हायरसची जगाला भीती का?

लजागतिक आरोग्य संघटना आणि दक्षिण आफ्रिकेच्या आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, अटलांटिक महासागरातील एका क्रूझ शिपवर हंटा व्हायरस संसर्गाच्या संशयित प्रादुर्भावामुळे तीन जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये एका वृद्ध विवाहित जोडप्याचा समावेश आहे. किमान इतर तीन जणही आजारी पडले आहेत.

संयुक्त राष्ट्रांच्या आरोग्य संस्थेने दिलेल्या माहितीनुसार, एक रुग्ण दक्षिण आफ्रिकेतील एका रुग्णालयात अतिदक्षता विभागात आहे आणि लक्षणे असलेल्या इतर दोन प्रवाशांना जहाजावरून बाहेर काढण्यासाठी ही संस्था अधिकाऱ्यांसोबत काम करत आहे. हंटा व्हायरस क्वचित आढळतो. उंदीर व खारीच्या मूत्र किंवा विष्ठेच्या संपर्कातून पसरतो. गेल्या वर्षी हॉलिवूड अभिनेता जीन हॅकमन यांची पत्नी बेट्सी अराकावा यांचा न्यू मेक्सिकोमध्ये या संसर्गामुळे मृत्यू झाला तेव्हा हा विषाणू लोकांच्या नजरेत आला होता.

'एमव्ही हॉंडियस' या डच क्रूझ शिपवर हंटा व्हायरसचा प्रादुर्भाव झाला आहे. नेदरलँड्स-स्थित 'ओशनवाइड एक्स्पिडिशन्स'ने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे, की त्यांच्या एमव्ही हॉंडियस या ध्रुवीय मोहीम जहाजावर एका गंभीर वैद्यकीय परिस्थितीवर काम सुरू आहे. हे जहाज सध्या आफ्रिकेच्या पश्चिमेला अटलांटिक महासागरात वसलेल्या केप वर्दे या बेट राष्ट्राजवळ आहे. प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, ही मोहीम सुमारे तीन आठवड्यांपूर्वी अर्जेंटिनामधून अंदाजे दीडशे प्रवाशांना घेऊन निघाली होती. केप वर्देच्या मार्गावर, ते अंटार्क्टिका आणि इतर ठिकाणी थांबले होते.

**जाणून घ्या**
**डॉ. महेश दळे**

डच परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने दोन डच प्रवाशांच्या मृत्यूची पुष्टी केली; परंतु अधिक तपशील दिला नाही. जागतिक आरोग्य संघटनेने 'एक्स' वरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे, की आजारी प्रवाशांपैकी एक दक्षिण आफ्रिकेतील अतिदक्षता विभागात आहे. तो प्रवासी ब्रिटिश नागरिक आहे. केप वर्देच्या अधिकाऱ्यांनी वैद्यकीय उपचारांची गरज असलेल्या प्रवाशांना जहाजातून उतरण्याची परवानगी दिली नाही. डच अधिकारी दोन आजारी प्रवासी आणि एका मृत प्रवाशाचा मृतदेह मायदेशी परत आणण्याची व्यवस्था करण्याचा प्रयत्न करत आहेत.



## ...म्हणून प्रतिजैविकांचा परिणाम शून्य

डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय ॲंटीबायोटिक्स घेत असाल तर काळजी घ्या कारण प्रतिजैविक प्रतिरोधकतेमुळे जगभरात ३० लाखांहून अधिक मुलांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. व्हिएन्ना येथे सादर केलेल्या एका संशोधनातून ही बाब उघड झाली आहे. दक्षिण पूर्व आशिया आणि आफ्रिकेसारख्या देशांमध्ये झपाट्याने वाढणाऱ्या प्रतिजैविकांच्या वापराबद्दल या संशोधनाने चिंता व्यक्त केली आहे.

२०१९ ते २०२१ दरम्यान दक्षिण पूर्व आशिया आणि आफ्रिकेत प्रतिजैविकांचा वापर झपाट्याने वाढल्याचे सदर संशोधनात म्हटले आहे. या काळात दक्षिण पूर्व आशियामध्ये १६० टक्के तर आफ्रिकेत १२६ टक्के वाढ झाली आहे. दुसरीकडे राखीव प्रतिजैविकांचा

**आरोग्यचर्चा**
**डॉ. अजेय गर्जे**

वापर दक्षिण पूर्व आशियामध्ये ४५ टक्के आणि आफ्रिकेत १२५ टक्क्यांनी वाढला आहे. प्रतिजैविकांचा हा वाढता वापर गंभीर चिंतेची बाब आहे. लोक स्वेच्छेने ॲंटिबायोटिक्स घेत आहेत. त्यामुळे ॲंटी-मायक्रोबियल रेझिस्टन्सही झपाट्याने वाढत आहे.


प्रतिजैविक प्रतिकार म्हणजे काय?

कोणत्याही रोगास कारणीभूत असणारे जीवाणू आणि विषाणू स्वतःमध्ये प्रतिजैविकांना प्रतिकार करण्याची क्षमता विकसित करतात. परिणामस्वरूप त्या जिवाणू वा विषाणूने संक्रमित रुग्णावर उपचार करणे अत्यंत कठीण होते. यामुळे जगभरात ३० लाखांहून अधिक मुलांचा मृत्यू झाला असल्याचे ही जागतिक आकडेवारी सांगते. असे असले तरी हा प्रतिकार मोडून काढण्यासाठी औषधांचा विकास संथ गतीने होत आहे. त्यामुळेच दक्षिण पूर्व आशिया आणि आफ्रिकेसारख्या देशांमध्ये परिस्थिती अशीच राहिली तर परिणाम अत्यंत भीषण होऊ शकतात.

सल्ल्याशिवाय ॲंटिबायोटिक्स टाळा

संशोधनात म्हटले आहे की, राखीव प्रतिजैविके उपचारांच्या पहिल्या टप्प्यासाठी नाहीत. ही औषधे फक्त आणीबाणीसाठी ठेवावीत. स्वतः मनाने ॲंटिबायोटिक्स घेतात त्यांनी ही सवय त्वरित सोडली पाहिजे. प्रतिजैविक घेण्याचे काही नियम आहेत. ते पाळले नाहीत तर रुग्णाच्या शरीरातील जिवाणू आणि विषाणू स्वतःमध्ये प्रतिरोधक क्षमता विकसित करतात. अशा परिस्थितीत भविष्यात रुग्णाला असाच आजार झाला तर उपचार करणे कठीण होते.

प्रतिजैविक गोळ्या खाल्ल्याने पोटात दुखणे, उलटी आणि अतिसार यांचा समावेश आहे. त्यामुळे भविष्यात संसर्गावर उपचार करणे कठीण होऊ शकते.




## वडिलांच्या धूम्रपानाचे मुलांवर परिणाम

आधूम्रपान आरोग्यासाठी धोकादायक मानले जाते. याचा परिणाम धूम्रपान करणाऱ्या आणि ज्या व्यक्तीसमोर धूम्रपान केले जाते, त्या दोघांच्या आरोग्यावर होतो; परंतु आता एका नवीन अभ्यासातून असे समोर आले आहे, की वडिलांच्या धूम्रपान करण्याच्या सवयीचा परिणाम केवळ त्यांच्या आरोग्यावरच नाही, तर मुलांच्या आरोग्यावरही होऊ शकतो.



संशोधनानुसार, वडील धूम्रपान करीत असतील, तर त्यांच्या मुलांमध्ये अनेक आजारांचा धोका वाढू शकतो. कॅलिफोर्निया विद्यापीठातील डॉक्टरांनी हे संशोधन केले आहे. हे 'जर्नल ऑफ द एंडोक्राइन सोसायटी'मध्ये प्रकाशित झाले आहे. या अभ्यासातून असे दिसून आले आहे, की वडील धूम्रपान करत असतील तर त्यांच्या मुलांना टाइप २ मधुमेह ते यकृत रोग आणि अनेक प्रकारच्या चयापचय रोगांचा धोका असतो. संशोधनात असे दिसून आले आहे, की धूम्रपान करणाऱ्या पुरुषांच्या शुक्राणूंमध्ये बदल होऊ शकतो. हे बदल साखर चयापचय आणि जन्माला आलेल्या बाळाच्या शरीरात मधुमेहावरील औषधांच्या कार्य करण्याच्या पद्धतीवर परिणाम करू शकतात. त्यामुळे मुलांमध्ये मधुमेहाचा धोका वाढतो.

**व्याधी विचार**
**डॉ. प्रसन्न नेने**

या संशोधनात एक हजार पुरुषांचा समावेश होता. हे लोक धूम्रपान करणारे होते. तेथे असलेल्या मुलांपैकी तीस टक्के मुलांना मधुमेह आणि यकृताशी संबंधित समस्यांची लक्षणे होती. सुरुवातीच्या निष्कर्षांवरून असे दिसून आले आहे, की धूम्रपान मुलांवरही परिणाम करीत आहे. सिगारेट पिणे ही एक अतिशय घातक सवय आहे. ती शरीराच्या जवळजवळ प्रत्येक अवयवावर वाईट परिणाम करते. सिगारेटमध्ये निकोटीन, टार आणि इतर अनेक विषारी रसायने असतात. ही रसायने हळूहळू शरीराला हानी पोहोचवतात. सिगारेटचा सर्वात मोठा परिणाम फुफ्फुसांवर होतो. धूम्रपान केल्यामुळे फुफ्फुसांमध्ये घाण साचते आणि श्वसनमार्गांना सूज येते. त्यामुळे खोकला, दम लागणे आणि श्वास घेण्यास त्रास होतो.

दीर्घकाळ धूम्रपान केल्यास यकृताचा कर्करोग आणि 'क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मनरी डिसीज' सारखे गंभीर आजार होऊ शकतात. सिगारेटचा हृदयावरही मोठ्या प्रमाणात परिणाम होतो. धूम्रपानामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात आणि रक्तदाब वाढतो. त्यामुळे हृदयविकार आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. हृदयाला पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही. त्यामुळे हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता वाढते. सिगारेटमुळे रक्ताभिसरणावर परिणाम होतो. रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होते आणि शरीराच्या विविध भागांना पुरेसा रक्तपुरवठा होत नाही. यामुळे थकवा, अशक्तपणा आणि त्वचेवरही वाईट परिणाम दिसू शकतो. तोंड आणि दातांवरही सिगारेटचा वाईट परिणाम होतो.

## पोटावर झोपणे टाळा

दिवसभर दमछाक झाल्यानंतर घरी आल्यावर बिछान्यात पडून लोळावंसं वाटतं. आपण अक्षरशः आडवे पडतो. कसेही झोपतो. पण यामुळे पाठीच्या कण्याला त्रास होऊन पाठीचं किंवा मानेचं दुखणं उद्भवू शकतं. त्यामुळे आपल्या शारीरिक स्थितीकडे नेहमी लक्ष द्यायला हवं. आपण वेगवेगळ्या स्थितीत झोपतो. याचा परिणाम झोपेवरही होऊ शकतो. मात्र एका ठराविक स्थितीत झोपू नये, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. अनेक जण पोटावर झोपतात. पण असं झोपणं त्रासदायक ठरू शकतं. पोटावर झोपून पुस्तक वाचणं, मोबाईल, लॅपटॉपचा वापर करणं किंवा फक्त झोपणंही पाठ आणि पोटाच्या आरोग्यासाठी घातक आहे.

मध्यंतरी कॉलेजमधल्या मुलांच्या झोपण्याच्या स्थितीचा अभ्यास करण्यात आला. जवळपास १५ टक्के मुलं पोटावर झोपून लॅपटॉप, मोबाईलचा वापर करत असल्याची बाब यातून समोर आली आहे. पोटावर झोपल्यामुळे पाठीच्या कण्याच्या नैसर्गिक बाकात बदल होऊन पाठ आणि मानेची दुखणी उद्भवू शकतात. इतकंच नाही तर सतत पोटावर झोपल्यामुळे शरीरावर अतिरिक्त ताण येऊन बराच त्रास होऊ शकतो. पोटावर झोपून मोबाईल/लॅपटॉपचा वापर करणाऱ्यांना पाठीची दुखणी त्रास देऊ शकतात, असंही एका संशोधनातून समोर आलं आहे. त्यामुळे अशा स्थितीत झोपणं टाळायला हवं.

## महिलांमधील केस गळतीची समस्या

आजकाल महिलांमध्ये, तरुण मुलींमध्ये आणि किशोरवयीन मुलींमध्ये केस गळण्याची समस्या खूप सामान्य झाली आहे. यामागची मुख्य कारणे म्हणजे अपुरी आहारपद्धती आणि अस्वस्थ जीवनशैली. योग्य पोषणाचा अभाव आणि जीवनशैलीतील बदल हे यासाठी मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरतात. सध्या फिमेल पॅटर्न अलोपेशियाचे प्रमाणही वाढत आहे, जे मुख्यतः हार्मोनल असंतुलनाशी संबंधित आहे. एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेण्यासारखी म्हणजे पीसीओडी आणि पीसीओएस सारख्या समस्या देखील वाढत आहेत. गेल्या १० वर्षांत थायरॉईडच्या समस्यांमध्येही वाढ झाली आहे. बहुतेक वेळा महिलांमधील केस गळणे हे पोषणाच्या कमतरतेमुळे किंवा हार्मोनल असंतुलनामुळे होते. चांगली गोष्ट म्हणजे, एकदा नेमके कारण समजले की उपचार करणे सोपे होते. जर केस गळण्याचे कारण पोषणाचा अभाव असेल, तर योग्य आहार आणि जीवनशैली सुधारून ते सुरुवातीच्या टप्प्यातच नियंत्रित करता येते. याशिवाय, वारंवार केस रंगवणे किंवा केमिकल ट्रीटमेंट्समुळे केसांची गुणवत्ता कमी होऊ शकते आणि केस तुटू शकतात, पण ही मुख्य कारणे नाहीत. मुख्य कारणे बहुतेक वेळा हार्मोनल असंतुलन आणि अपुरी पोषण असतात. उपचार फार गुंतागुंतीचा नसतो. साध्या ब्लड टेस्टद्वारे मूळ कारण ओळखता येते. बरेच लोक फक्त थायरॉईड आहे का नाही तेच तपासतात, पण काही वेळा थायरॉईड थोडासा असंतुलित असतो आणि



औषधांची गरज नसते, तरीही केस गळणे होऊ शकते. स्वीकार करणे खूप महत्त्वाचे आहे. एकदा तुम्ही समजून घेतले की तुमच्या जीवनशैलीत किंवा आहारात सुधारणा करणे गरजेचे आहे, तेव्हा तुम्ही बदल सुरू करू शकता. जीवनशैली आणि पोषण सुधारून, तसेच कमतरता दूर करून केस गळणे प्रभावीपणे नियंत्रित करता येते

– **डॉ. त्रिश्ना गुप्ते**
संस्थापक, द कॉस्मो स्क्वेअर क्लिनिक
संस्थापक आणि अकॅडमिक हेड
– आयएससीए इन्स्टिट्यूट, पुणे

**नवसंशोधन**

### भारतीयांचा मेंदू लहान

इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन अँड टेक्नॉलॉजी हैदराबादच्या शास्त्रज्ञांनी भारतीयांच्या मेंदूचा नकाशा तयार केला आहे. हा अशाप्रकारचा पहिलावहिला नकाशा आहे. भारतीयांचा मेंदूचा आकार इतरांच्या तुलनेत लहान असल्याची बाब या संशोधनातून समोर आली आहे. पाश्चिमात्य देश तसेच पूर्वेकडच्या इतर देशांमधल्या लोकांच्या तुलनेत भारतीयांच्या मेंदूचा आकार बराच लहान असतो. या संशोधनामुळे अल्झायमर तसेच मेंदूशी संबंधित इतर विकारांवरील उपचारांना गती मिळू शकते. या प्रस्तावावर काम करणाऱ्या सेंटर फॉर व्हिज्युअल इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे जयंत सिवस्वामी यांच्या मते, मेंदूशी संबंधित आजार शोधण्यासाठी मॉन्ट्रियल न्यूरोलॉजिकल इन्स्टिट्यूट (MNI) टेम्प्लेटचा उपयोग केला जातो.



**दंतारोग्य**

### दात पांढरेशुभ्र होतात का?

दातांचा पांढरेपणा टिकवून ठेवण्यासाठी विविध प्रक्रिया केल्या जातात. दातांचा पिवळेपणा दूर करणाऱ्या प्रक्रियेबाबत बरेच गैरसमज आहेत. या प्रक्रियेनंतर दात पांढरेशुभ्र होतात, असा समज असतो. मात्र या प्रक्रियेचे लाभ व्यक्तीगणिक बदलत जातात. डागांचे प्रकार, दातांवरच्या एनामेलचा थर, दातांची क्षमता यावर बरंच काही अवलंबून असतं. त्यामुळे दात पूर्ण पांढरे होतीलच असं नाही.

केळ्याच्या सालीमध्ये मोठ्या प्रमाणात पोटॅशियम, मॅग्नेशियम असते. या गोष्टींचा उपयोग ब्लिचिंग एजंट म्हणून करण्यात येऊ शकतो. त्यामुळे केळ्याचे साल दातांवर घासू शकता.



**डोळ्यांचे आरोग्य**

### डोळे दुखत असतील तर...

लॅपटॉप आणि कॉम्प्युटरचा वापर केल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो. डोळे दुखू लागतात. मात्र काही उपायांनी आपण हा ताण कमी करू शकतो. सतत स्क्रीनपुढे राहिल्याने डोळे दुखू लागले तर डोळ्यांवर थंड पाण्याचे हबके मारावे. योगामुळेही आराम मिळू शकतो. आहारात डाळी, हिरव्या भाज्या, गाजर यांचा समावेश असावा. स्क्रीन टाईम मर्यादित करा आणि मध्ये ब्रेक घ्या. अश्रू निर्माण करण्यासाठी चांगले ह्युमिडिफायर वापरा.

वाचताना किंवा डिजिटल उपकरणे वापरताना योग्य प्रकाशयोजना सुनिश्चित करा. उन्हाळ्यात योग्य सनग्लासेस वापरा.



**आजीबाईचा बटवा**

### शिळी पोळी आहे गुणकारी

शिळ्या किंवा उरलेल्या पोळ्यांची फोडणीची पोळी केली जाते. मात्र बऱ्याच घरांमध्ये अशा उरलेल्या पोळ्या टाकून दिल्या जातात. अर्थात या शिळ्या पोळ्या अधिक लाभदायी ठरतात. शिळ्या पोळ्यांमध्ये विविध आजार बरे करण्याची क्षमता असते. या पोळ्यांमध्ये ताज्या पोळ्यांच्या तुलनेत प्रथिनांचे प्रमाणही अधिक असते. शिळ्या पोळ्यांमुळे रक्तातली साखरेची पातळी नियंत्रणात राहते. मधुमेहींना सकाळच्या वेळी दुधासोबत शिळी पोळी खाता येईल. शिळ्या पोळीच्या सेवनामुळे रक्तदाबही नियंत्रणात राहतो. त्यामुळे शिळी पोळी टाकून देऊ नये. पचनक्रियेसाठी शिळी पोळी खूप फायदेशीर आहे. गॅस, पोट फुगणे या पोटाशी संबंधित समस्यांवर रामबाण उपाय आहे.



# स्थानिक भाषेतून शिक्षण देण्यास प्राधान्य हवे; सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

**राजस्तान राज्याला विशेषतः राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या पार्श्वभूमीवर मातृभाषा आधारित शिक्षणासंबंधीच्या घटनात्मक आदेशाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी योग्य व सर्वसमावेशक धोरण करण्याचे निर्देश देण्यात येत आहे. राजस्तानी भाषेला शैक्षणिक हेतूसाठी प्रादेशिक भाषा म्हणून मान्यता देण्यासाठी तिचा योग्य दर्जा देण्यासाठी सुरुवातीला शालेय शिक्षणाच्या पायाभूत व पूर्व स्तरावरील टप्प्यावरून टप्या-टप्प्याने उच्च स्तरावर शिक्षणाचे माध्यम म्हणून तिचा स्वीकार करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे ही निर्देश देण्यात आले आहेत.**




तांत्रिक गृहितकावर आधारित संकुचित भूमिका घेऊन मातृभाषेतून शिक्षणासाठी प्रयत्न न करणे म्हणजे शासनाचा निष्काळजीपणा आहे. संविधानाने लहान मुलांना दिलेल्या अनुच्छेद १९(१) अ च्या अधिकारावर नियंत्रण लादण्याचा प्रयत्न करता येणार नाही, असे स्पष्ट करीत राजस्तान सरकारने राजस्थान शिक्षक पात्रता परीक्षा (रीट) मध्ये राजस्तानी या मातृभाषेचा समावेश करावा व या भाषेला मातृभाषेचा दर्जा देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विक्रम नाथ व न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या पीठाने दिनांक १२ मे २०२६ रोजी पद्म मेहता आणि अन्य विरुद्ध राजस्तान राज्य व अन्य (२०२६ ० सी.जे (एस सी)३८८) या दिवाणी अपिलामध्ये राजस्तान उच्च न्यायालयाने दिलेला निकाल रद्द करीत अपिलकर्त्यांचे अपील मान्य करून १५ सप्टेंबर २०२६ च्या आत राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार मातृभाषा आधारित धोरण तयार करण्याचे आदेश राजस्तान सरकारला दिले आहेत व ते केल्याचे प्रतिज्ञापत्र १५ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात दाखल करावे, असेही आदेश दिले आहेत.

अपिलाची सविस्तर माहिती अशी की, अपिलकर्त्यांनी जनहित याचिकेद्वारे राजस्तान शिक्षक पात्रता परीक्षा २०२१ अंतर्गत श्रेणी ३ स्तर १ व स्तर २ या पदांच्या भरतीसाठीच्या परीक्षा अभ्यासक्रमात राजस्तानी भाषेचा समावेश करण्याचे आदेश सरकारला द्यावेत, अशी मागणी केली. तसेच तेथील मुलाना राजस्तानी भाषेत किंवा संबंधित स्थानिक भाषेत शिक्षण देण्याचे निर्देश द्यावेत, अशी ही मागणी केली. उच्च न्यायालयाने ही मागणी फेटाळली कारण न्यायालयाच्या मते जर अपिलकर्त्यांचे अंमलबजावणी योग्य कायदेशीर हक्क निर्माण झाले व राज्य सरकार वैधानिक कर्तव्य पार पाडण्यात अपयशी ठरले असेल तरच अशा याचिकेचा विचार केला जाऊ शकतो. यावर व्यथित होऊन सर्वोच्च न्यायालयात अपिलकर्ते यांनी अपील दाखल केले.

सर्वोच्च न्यायालयात आपली बाजू मांडताना वकिलांनी सांगितले की, राजस्तानी भाषिक लोकसंख्या ही संविधानाच्या अनुच्छेद ३५० अ नुसार भाषिक अल्पसंख्यांक या व्याख्येत स्पष्टपणे येते. राजस्तान राज्यात जिथे हिंदी ही प्रमुख अधिकृत भाषा आहे. तिथे राजस्तानी ही स्वतःची समृद्ध भाषिक ओळख व सांस्कृतिक वारसा असलेली एक वेगळी मातृभाषा असल्याने ती संविधानाच्या अनुच्छेद ३५० अ नुसार अल्पसंख्यांक भाषा ठरते. शिक्षणाचे माध्यम निवडण्याचा अधिकार, विशेषतः मातृभाषेत शिक्षण घेण्याचा हक्क हा संविधानाच्या अनुच्छेद १९ (१) अ मध्ये अंतर्भूत आहे. भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यांमध्ये अर्थपूर्ण पद्धतीने माहिती प्राप्त करण्याचा व समजून घेण्याचा अधिकार समाविष्ट आहे. संविधानाच्या अनुच्छेद २१ अ सोबत वाचल्यास ही एक सुसंगत आणि परस्पर संबंधित घटनात्मक हमी बनते जी राज्यावर सुनिश्चित करण्याची जबाबदारी टाकते. शिक्षण केवळ औपचारिकपणे दिले जाऊ नये तर ते सुबोध आणि प्रभावी असावे ज्यामध्ये मुलाला समजेल अशा भाषेत शिक्षण देणे आवश्यक आहे. राजस्तान राज्याने जिथे शाळेमधील अभ्यासक्रमामध्ये गुजराती, पंजाबी आणि सिंधी यासारख्या भाषांचा समावेश केला आहे. तिथे राजस्तानी भाषेचा समावेश न करता एक प्रकारे द्वेषपूर्ण भेदभाव केला आहे. त्यामुळे संविधानाच्या अनुच्छेद १४ मधील समानतेच्या आदेशाचे उल्लंघन होत आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० या भूमिकेला अधिक बळकटी देते. कारण ते मान्य करते की, लहान मुलांना त्यांच्या मातृभाषेत शिकवल्यास ते क्लिष्ट संकल्पना देखील अधिक सहजपणे आत्मसात करू शकतात आणि त्यानुसार अशी शिफारस करते की, किमान इयत्ता पहिली ते पाचवी आणि सहावी ते आठवी पर्यंत शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी.

प्रतिवादींच्या वतीने वकिलांनी सांगितले की, सध्या जे शिक्षण दिले जाते ते, याच भाषेतून दिले जाते. मात्र, शिक्षक पदावरील भरती केवळ या भाषेतून दिली जात नाही. ज्यांना संविधानाच्या आठव्या अनुसूचिमध्ये औपचारिक रित्या मान्यता देण्यात आली आहे. त्याच भाषेतून भरती केली जाते. राजस्तानी भाषेचा सदर अनुसूची मध्ये समावेश करण्यात आलेला नाही. म्हणून, शिक्षणाचे माध्यम किंवा अनिवार्य विषय म्हणून तिचा स्वीकार करणेबाबत कोणताही धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला नाही. अनुच्छेद ३५० अ वर ठेवलेला भरोसा गैरसमजपूर्ण व अयोग्य आहे. कारण राजस्तान राज्यात भाषिक अल्पसंख्यांक नाहीत. तसेच अनुच्छेद ३५० अ हे केवळ मार्गदर्शक असून ते केवळ मातृ भाषेत शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्याचे बंधन घालते. त्यामुळे अंमलबजावणी योग्य हक्क निर्माण होत नाहीत, तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे केवळ कार्यकारी धोरणात्मक असून, त्याला वैधानिक बळ नाही ते मातृभाषेच्या वापराची शिफारस करत असले, तरी ते अनिवार्य करत नाहीत. ते अभ्यासक्रम तयार करण्याची किंवा भरती अभ्यासक्रमाची रचना करण्यामध्ये राज्याच्या प्रशासकीय विवेक अधिकारावर कोणतेही बंधन घालत नाही. त्यामुळे याचिका फेटाळण्यात यावी, अशी मागणी केली गेली.



ॲड. जी.एम. आळंदीकर
बारामती, मो. ९४२३०२०२५५

खंडपीठाने दोन्ही बाजू ऐकून प्रथमता स्पष्ट केले की, अपिलकर त्यांची मागणी राजस्तान शिक्षक पात्रता परीक्षा २०२१ च्या पहिली ते पाचवी व सहावी ते आठवी या दोन्ही स्तराच्या परीक्षा अभ्यासक्रमात राजस्तानी भाषेचा समावेश करणे, या उद्देशासाठी आहे. मात्र, या परीक्षेचा कालावधी उलटून गेल्यामुळे त्या परीक्षेबाबत आत्ता कोणताही बदल करता येणे अशक्य असून, प्रभावी निर्देश जारी केला जाऊ शकत नाही. मात्र, राजस्तान सरकारने केलेला युक्तीवाद हा केवळ त्यांची निष्क्रियता स्पष्ट करते. शिक्षणातील भाषेचा प्रश्न हा प्रशासकीय सोय किंवा शैक्षणिक पसंतीच्या मर्यादा ओलांडतो. तो थेट सर्वसमावेशकता, अस्मिता व शिक्षण प्रक्रियेत अर्थपूर्ण प्रवेश यांच्या गाभ्यालाच घाव घालतो. शिक्षण हे सक्षमीकरणाचे साधन आहे. भारताचे संविधानाने अनुच्छेद २१,२१ अ,४१,४५,५१ अ (क) व ३५० अ द्वारे शिक्षणाच्या हक्काला आणि सुलभ न्याय व दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करण्याच्या राज्याच्या संबंधित कर्तव्याला स्पष्ट मान्यता दिली आहे. या तरतुदी एकत्र वाचल्यास हे सिद्ध होते की, शिक्षण हे केवळ एक धोरणात्मक उद्दिष्ट नसून, ते घटनात्मक हक्क व सार्वजनिक कर्तव्य आहे. जे वैयक्तिक प्रतिष्ठा व राष्ट्राच्या सामुहिक प्रगती दोन्हीसाठी अविभाज्य आहे. घटनात्मक चौकटीनुसार शिक्षणाचा दर्जा हा त्याच्या माध्यमातून दिला जातो, त्याच्याशी जोडलेला आहे. त्यामुळे शिक्षण हे सुबोध आणि सुलभ असले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने या अगोदर देखील अनेक खटल्यांमध्ये मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा मूलभूत हक्क हा सर्वात महत्त्वाच्या हक्कापैकी एक आहे आणि या शिक्षणाचा हक्क म्हणजे दर्जेदार शिक्षणाचा हक्क होय. शिक्षणाच्या असमाधानकारक गुणवत्तेबद्दल या न्यायालयाने अनेकदा चिंता व्यक्त केली आहे. शिक्षण हक्क कायदा २००९ हा १ एप्रिल २०१० पासून अंमलात आला. या कायद्याच्या उद्देश आणि कारणांमध्ये स्पष्टपणे घोषित केले आहे की, कायद्याचा उद्देश केवळ मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणे साध्य करणे नाही तर, या शिक्षणाचे गुणवत्ता देखील तितकीच महत्त्वाची असेल. सर्व शिक्षण तज्ज्ञांच्या एकमताने असे मत आले आहे की, विद्यार्थ्यांनी आपले शालेय शिक्षण त्यांच्या मातृभाषेतून सुरू करावे. यामागे मोठे कारण आणि न्याय आहे. जेव्हा मुलांची कोमल मने परकीय माध्यमांच्या संपर्कात येतात, तेव्हा शिकण्याची प्रक्रिया अनैसर्गिक बनते. त्यामुळे मुलांवर एक प्रकारचा क्रूर ताण येतो. त्यामुळे ज्यामुळे संपूर्ण व्यवहार यांत्रिक बनतो. शैक्षणिक प्रक्रिया कृत्रिम आणि यातनादायक बनते. मात्र, मूलभूत ज्ञान मातृभाषेतून सहजपणे मिळवता येते. परकीय भाषेच्या प्रवेशामुळे मातृभाषेच्या विकासाला खीळ बसण्याचा धोका असतो. दररोज वाढत जाणाऱ्या गुन्हेगारी स्वरूपाच्या अपव्य यापेक्षा उच्च शिक्षणातील तात्पुरती अनागोंदी मला अधिक पसंत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या सर्व निर्णयांच्या अनुषंगाने असे मत आहे की, संविधानाच्या अनुच्छेद १९ (१) अंतर्गत भाषण आणि अभि व्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्कांमध्ये मुलाला शाळेच्या प्राथमिक स्तरावर त्याच्या आवडीच्या भाषेत शिक्षण घेण्याचा स्वातंत्र्याचा समावेश आहे. राज्य अशा भाषा निवडीवर नियंत्रण करू शकत नाही. केंद्र सरकारने इतके स्पष्ट धोरण मांडले असूनही, राज्याकडून तळागाळात या वचन पद्धतीच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीत मोठी तूट दिसून येत आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीच्या भाषेत किंवा प्रादेशिक भाषेत प्रभावीपणे शिक्षण दिले जाईल. हे सुनिश्चित करण्यासाठी सकारात्मक पावले उचलण्यात फारच कमी प्रगती झाली आहे. प्रशासकीय इच्छाशक्तीचा अभाव हे देखील मोठे कारण आहे. त्यामुळे राजस्तान सरकारने संकुचित भूमिका घेऊन आपल्या निष्क्रितीचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला आहे. राजस्तानी भाषेला शिक्षणाचे माध्यम व भरतीसाठीचा विषय म्हणून मान्यता देण्यासाठी किंवा स्वीकारण्यासाठी कोणताही धोरणात्मक निर्णय घेतला नाही, असा युक्तीवाद म्हणजे निष्काळजी प्रतिसाद आहे. या सर्व बाबींकडे न्यायालय मूक प्रेक्षक होऊ शकत नाही. धोरण निर्मितीच्या क्षेत्रात प्रवेश करणे हे न्यायालयाचे अधिकार क्षेत्र नसले तरी घटनेच्या भाग तीन मध्ये नमूद केलेल्या हमी कार्यकारी निष्क्रियता उदासीनतेमुळे निष्प्रभ ठरू नयेत, हे निश्चित करणे गंभीर घटनात्मक कर्तव्य आहे. केंद्र सरकारने एकदा जर उपाययोजना केल्या असतील तर, त्या दृष्टीने संबंधित राज्य सरकारने पावले उचलणे बंधनकारक आहे. राजस्तान राज्याला विशेषतः राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या पार्श्वभूमीवर मातृभाषा आधारित शिक्षणासंबंधीच्या घटनात्मक आदेशाचे प्रभावी अंमलबजावणीसाठी योग्य व सर्वसमावेशक धोरण करण्याचे निर्देश देण्यात येत आहे. राजस्तानी भाषेला शैक्षणिक हेतूसाठी प्रादेशिक भाषा म्हणून मान्यता देण्यासाठी तिचा योग्य दर्जा देण्यासाठी सुरुवातीला शालेय शिक्षणाच्या पायाभूत व पूर्व स्तरावरील टप्प्यावरून टप्या-टप्प्याने उच्च स्तरावर शिक्षणाचे माध्यम म्हणून तिचा स्वीकार करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे ही निर्देश देण्यात आले आहेत.

शैक्षणिक हक्क कायद्याचे स्पष्टीकरण करणारा व घटनात्मक अधिकारांचे विश्लेषण करणारा देशातील सर्व सरकारांना मार्गदर्शक ठरणारा व प्रादेशिक भाषेचे महत्त्व स्पष्ट करणारा असा हा निकाल आहे.

# लखनऊ-आग्रा महामार्गावर बस उलटली
## सहा जणांचा मृत्यू



**उन्नाव** : लखनऊ-आग्रा महामार्गावर मंगळवारी पहाटे एक वेगवान बस रस्त्याच्या बाजूला असलेल्या कठड्यावर जाऊन धडकली आणि उलटली. यानंतर बसच्या खिडकीतून प्रवासी बाहेर फेकले गेले. या दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला, तर अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले. हा अपघात लखनऊ-आग्रा महामार्गावरील उन्नाव जिल्ह्यातील औरास पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, डबल डेकर बस दिल्लीहून गोरखपूरकडे निघाली होती. पहाटेच्या सुमारास बस वेगात असताना चालकाला अचानक डुलकी लागल्याने त्याचे बसवरील नियंत्रण सुटले आणि ती रस्त्याच्या कठड्यावर जोरात आदळून उलटली. अपघात इतका भीषण होता की, बसच्या काचा फुटून काही प्रवासी खिडक्यांमधून बाहेर फेकले गेले.

या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला असून, मृतांमध्ये एक पोलिस अधिकारी आणि एका कैद्याचा समावेश आहे. मृत पोलीस अधिकाऱ्याचे नाव रामचंद्र राम असून ते बिहारमधील सीवान पोलीस ठाण्यात कार्यरत होते. तर मृत कैद्याचे नाव छत्रपाल सिंह असे आहे. संबंधित कैद्याला बिहार पोलीस गुरुग्राम येथील न्यायालयात सुनावणीसाठी घेऊन गेले होते. सुनावणी पूर्ण करून परतत असताना हा अपघात घडला.

अपघाताच्या वेळी बसमध्ये सुमारे ३० प्रवासी होते. बस कठड्यावर आदळल्यानंतर अनेक प्रवासी रस्त्यावर फेकले गेले, ज्यामुळे त्यांना गंभीर दुखापती झाल्या. एका प्रवाशाचा पाय तुटल्याचीही माहिती समोर आली आहे. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि बचाव पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

# अब्राहम करारात सामील होणे आमच्या मूळ विचारधारेच्या विरोधात
## पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांचे स्पष्टीकरण

**इस्लामाबाद** : पाकिस्तान अब्राहम करारात सहभागी होऊन इस्रायलसोबत संबंध सामान्य करण्याच्या बाजूने नाही. खरे तर अब्राहम करार हा पाकिस्तानच्या मूळ विचारधारेच्या विरोधात आहे, असे स्पष्टीकरण पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी दिले आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत शांतता चर्चेत सहभागी असलेल्या देशांना अब्राहम करारावर स्वाक्षरी करण्याचे आवाहन केल्यानंतर आसिफ यांनी ही टिप्पणी केली. या करारानुसार इस्रायल आणि अरब देशांमध्ये राजनैतिक, आर्थिक आणि सुरक्षा संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

सोमवारी रात्री एका माध्यमाला दिलेल्या मुलाखतीत आसिफ म्हणाले, व्यक्तिशः, मला वाटत नाही की, पाकिस्तानने अशा कोणत्याही करारात सहभागी व्हावे, जो पाकिस्तानच्या मूळ विचारधारेच्या विरोधात आहे. संयुक्त अरब अमिराती आणि बहरीन हे देश आधीच या कराराचे सदस्य आहेत. तसेच सौदी अरेबिया, कतार, पाकिस्तान, तुर्की, इजिप्त आणि जॉर्डन यांनीही यावर स्वाक्षरी करावी अशी ट्रम्प यांची इच्छा आहे.

१९६७ पूर्वीच्या सीमांवर आधारित आणि पूर्व जेरुसलेमला राजधानी असलेले स्वतंत्र पॅलेस्टिनी राज्य स्थापन होईपर्यंत इस्रायलला मान्यता देणार नाही, ही त्यांची भूमिका पूर्वीपासूनच आहे. आमची भूमिका अगदी स्पष्ट असून, आम्ही हे स्वीकारत नाही, असे आसिफ यांनी स्पष्ट केले.

इस्रायलसोबत संबंध सामान्य करण्याच्या कोणत्याही वाटाघाटीला आसिफ यांच्यासह अनेक नेत्यांचा विरोध आहे.

# इस्रायलच्या हवाई हल्ल्यात लेबाननमध्ये १२ जणांचा मृत्यू

**बेरूत** : पूर्व लेबाननमधील एका गावावर इस्रायलने मंगळवारी केलेल्या हवाई हल्ल्यात १२ जण ठार झाले.

सोमवारी रात्री उशिरा लेबाननच्या बेका खोऱ्यात झालेल्या या हल्ल्यापूर्वी, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी लेबाननमधील हिज्बउल्ला या दहशतवादी गटाला लक्ष्य करून अधिक तीव्र हल्ले करण्याचा निर्णय घेतल्याचे म्हटले होते.

इस्रायली लष्कराने या विशिष्ट हल्ल्यावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. पूर्व लेबाननमधील हिज्बउल्लाच्या पायाभूत सुविधांना लक्ष्य करत होते. दक्षिण आणि पूर्व लेबाननच्या मोठ्या भागांना लक्ष्य करून रात्रभर झालेल्या जोरदार हल्ल्यानंतर ढिगाऱ्याखालून १२ मृतदेह बाहेर काढण्यात आल्याचे बचाव कर्मचाऱ्यांनी सांगितले. वॉशिंग्टनमध्ये लेबानन आणि इस्रायलच्या लष्करी प्रतिनिधींमध्ये थेट चर्चा होण्याच्या तीन दिवस आधी हे हल्ले करण्यात आले.

हिज्बउल्ला दक्षिण लेबाननमध्ये आणि उत्तर इस्रायलमधील शहरांमध्ये इस्रायली सैन्यावर हल्ले करत आहे. जोपर्यंत इस्रायल आपले हवाई हल्ले थांबवत नाही आणि देशातून आपले सैन्य मागे घेत नाही, तोपर्यंत लढाई सुरूच राहील, असे त्यांनी म्हटले आहे. हिज्बउल्लाचा विरोध असूनही, इस्रायलसोबतच्या थेट चर्चेमुळे युद्धविराम होईल अशी लेबनीज सरकारला आशा आहे.

## व्हॉट्सॲप कट्टा

### अहंकाराचा अंत

एका विशाल साम्राज्यावर 'आदित्य' नावाचा एक पराक्रमी राजा राज्य करत होता. त्याच्याकडे सर्व काही होते; पण मनाची शांती मात्र नव्हती. एकदा तो एका डोंगरावर राहणाऱ्या एका महर्षींना भेटायला गेला.

राजा म्हणाला, महाराज, तुमचं आयुष्य किती शांत आणि समाधानी आहे! मलाही तुमच्यासारख्याच मानसिक स्थितीत जायचं आहे, जिथे कसलीही चिंता नसेल. मला ते कसं साध्य होईल?

महर्षींनी स्मितहास्य केले आणि म्हणाले, राजन, मी तुम्हाला त्या अवस्थेपर्यंत नक्कीच घेऊन जाईन; पण माझी एक अट आहे. उद्या पहाटे बरोबर चार वाजता तुम्ही एकट्याने माझ्या कुटीवर या.

दुसऱ्या दिवशी पहाटे राजा कुटीपाशी पोहोचला. त्याने दारावर थाप मारली. आतून महर्षींनी विचारले, कोण आहे बाहेर?

राजाने उत्तर दिले, मी राजा आदित्य आलो आहे.

महर्षी शांतपणे म्हणाले, आज नको, उद्या या. राजाला थोडे नवल वाटले, पण तो परत गेला.

तिसऱ्या दिवशी पहाटे राजा पुन्हा गेला. महर्षींनी पुन्हा तोच प्रश्न विचारला, कोण आहे?

राजाला वाटले कदाचित 'राजा' ही पदवी महर्षींना आवडली नसेल. म्हणून त्याने उत्तर दिले, मी आलो आहे.


आतून पुन्हा आवाज आला, आजही वेळ झालेली नाही, उद्या या.

चौथ्या दिवशी राजा पुन्हा गेला. पुन्हा तोच प्रश्न आला, कोण आहे तिथे?

यावेळी राजाने फक्त इतकेच म्हटले, मी आहे.

महर्षींनी पुन्हा त्याला तसेच परत पाठवले.

पाचव्या दिवशी राजा कुटीपाशी गेला. मनात विचार आला की, मी राजा आहे की सामान्य माणूस, हे महत्त्वाचं नाही. कदाचित माझं हे 'मी-पण'च अडथळा ठरत आहे. जेव्हा महर्षींनी आतून विचारले, बाहेर कोण आहे? तेव्हा राजा पूर्णपणे शांत राहिला. त्याच्याकडे सांगण्यासारखे काहीच




उरले नव्हते. तो नि:शब्द होऊन तिथेच उभा राहिला.

काही क्षणांतच महर्षी स्वतः बाहेर आले. त्यांनी राजाला मायेने मिठी मारली आणि म्हणाले, राजन, आज तुम्ही खऱ्या अर्थाने परीक्षेत उत्तीर्ण झालात. पहिल्या तीन दिवसांत तुम्ही तुमच्यासोबत तुमचा 'अहंकार' आणि 'मी-पण' घेऊन येत होतात. जोपर्यंत हा 'मी' जिवंत असतो, तोपर्यंत सत्याचा साक्षात्कार होत नाही. ज्या क्षणी तुम्ही स्वतःला विसरलात, त्याच क्षणी तुम्ही शांतीच्या मार्गावर चालण्यास पात्र झालात.

**तात्पर्य :** आयुष्यात जोपर्यंत आपण 'मी' आणि 'माझे' या अहंकारात अडकलेले असतो, तोपर्यंत आपल्याला खरी शांती मिळत नाही. ज्या दिवशी मानवातील 'मी-पण' संपते, त्याच दिवशी त्याची वाटचाल खऱ्या समाधानाकडे सुरू होते.

स्वतःवर ठेवलेला विश्वास माणसाला आतून मजबूत बनवतो. तोच विश्वास संकटात उभं राहण्याची हिंमत देतो, निर्णय घेण्याची ताकद देतो आणि अपयशानंतर पुन्हा उभं राहण्याची जिद्द निर्माण करतो; पण जेव्हा आपण आपल्या आनंदाची, यशाची किंवा अस्तित्वाची जबाबदारी पूर्णपणे दुसऱ्यांवर ठेवतो, तेव्हा तीच गोष्ट कमजोरी बनते. जगाचं एक वास्तव असंही आहे की, लोक आपल्या शेकडो योग्य गोष्टी विसरतात; पण एक छोटी चूक मात्र कायम लक्षात ठेवतात. म्हणूनच आयुष्य इतरांच्या मतांच्या भीतीत अडकवू नका - स्वतःच्या मनाला जे योग्य वाटतं, जे आनंद देतं, त्या मार्गाने निर्धास्त जगा.





## पंचांग

बुधवार, २७ मे २०२६, अधिक ज्येष्ठ शु. ११, शके १९४८
नक्षत्र : चित्रा, सूर्योदय ६.०३ मि., सूर्यास्त १९.०८ मि.

## भविष्य

मेष : व्यवसायात वादविवाद
वृषभ : चातुर्य दाखवाल
मिथुन : सौख्य मिळेल
कर्क : व्यवहार होतील
सिंह : शिक्षण चांगले होईल
कन्या : प्रवासात अडचणी
तूळ : झोपेचे विकार बळावतील
वृश्चिक : लाभ मिळेल
धनु : वाचन संस्कृतीमुळे लाभ
मकर : भागीदारांचे साहाय्य
कुंभ : कौटुंबिक सुख मिळेल
मीन : प्रवासात खर्च संभवतो

## तपमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| | (अंश सेल्सिअस) | |
| मुंबई | ३५.१ | २८.१ |
| पुणे | ३७.१ | २४.३ |
| कोल्हापूर | ३६.१ | २३.३ |
| नागपूर | ४६.५ | २५.१ |
| सोलापूर | ४०.३ | २४.५ |

## सोने-चांदी

२४ कॅरेट सोने -१,५८,८९० रु.
२२ कॅरेट सोने -१,५७,९९९ रु.
चांदी (किलो) - २,८५,००० रु.

## अंडी / चिकन

| | शेकडा | डझन | प्रतिनग |
|---|---|---|---|
| गावरान | ११२२ | १४२ | १४ |
| इंग्लिश | ५९१ | ८२ | ०७ |
| चिकन | २४० | प्रति किलो | |
| बोनलेस | ३४२ | प्रति किलो | |

## घरफोडी चोरट्यांचा सीसीटीव्हीद्वारे शोध सुरू

**पुणे** : सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी कपाटातील दागिने आणि काही रोकड, असा एकूण ७ लाख २५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना औंधमधील एका सोसायटीत घडली. याप्रकरणी पोलिसांनी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून सीसीटीव्हीद्वारे त्यांचा शोध सुरू आहे.

याबाबत सदनिका मालक असलेल्या ज्येष्ठ महिलेने चतु:शृंगी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ज्येष्ठ महिला औंधमधील सिद्धार्थनगर सोसायटीत राहायला आहेत. १३ मे रोजी त्या काही कामानिमित्त बाहेरगावी गेल्या होत्या. २३ मे रोजी त्या घरी परतल्या. त्यावेळी चोरट्यांनी सदनिकेचे कुलूप तोडल्याचे त्यांच्या लक्षात आले. घरात पाहणी केल्यानंतर त्यांना शयनगृहातील कपाटातून दागिने आणि रोकड चोरीला गेल्याचे दिसून आले. त्यानंतर ज्येष्ठ महिलेने लागलीच पोलिसांकडे धाव घेतली. पोलिसांच्या पथकाने देखील घटनास्थळाची पाहणी केली. सध्या पोलिसांकडून सोसायटीच्या आवारातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले जात आहे.

# आंबट-गोड चेरीचे दर आवाक्याबाहेर

**विमान वाहतुकीच्या दरवाढीमुळे किलोमागे शंभर ते दीडशे रुपयांची वाढ**

पुणे : इंधनाचे दर वाढल्यामुळे विमान वाहतुकीच्या दरातही वाढ झाली आहे. परिणामी हिमाचल प्रदेशातून पुण्यात येणाऱ्या चेरीचे दरही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. वाढलेले दर ग्राहकांना परवडणारे नसल्यामुळे ग्राहकांनी चेरीकडे पाठ फिरविली आहे.

आंबट-गोड चवीने तसेच लाल चिटूक रंगाने ग्राहकांचे आकर्षण ठरलेल्या चेरीच्या दरात यंदा मोठी वाढ झाली आहे. हंगामाच्या सुरुवातीलाच चेरी सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेल्याचे चित्र आहे. हिमाचल प्रदेशातील उत्पादन घट, पर्यटकांकडून वाढलेली मागणी आणि विमान इंधनाच्या दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढल्याने चेरीच्या भावात किलोमागे तब्बल १०० ते १५० रुपयांची वाढ झाली आहे. परिणामी, मागील वर्षी ३०० ते



३५० रुपयांना मिळणारी चेरी यंदा घाऊक बाजारातच ४०० ते ४५० रुपये किलो आहे. किरकोळ बाजारातील किलोचा दर ६०० रुपयांच्या पुढे गेला आहे.

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुलटेकडी मार्केट यार्डात सध्या काश्मीर येथून दररोज सुमारे दीड हजार बॉक्स चेरीची आवक होत आहे. दरवर्षी मे महिन्याच्या सुरुवातीला हिमाचल प्रदेशातील चेरी बाजारात दाखल होते, त्यानंतर काश्मीरच्या चेरीचा हंगाम सुरू होतो. मात्र, यंदा बदलत्या आणि लहरी हवामानाचा फटका हिमाचलमधील चेरी उत्पादनाला बसला आहे. त्यामुळे उत्पादनात घट झाली असून उपलब्ध मालालाही स्थानिक बाजारपेठेत मोठी मागणी निर्माण झाली आहे.

पर्यटकांकडून चेरीला मोठी मागणी वाढली आहे. त्यामुळे स्थानिक बाजारातच चांगला दर मिळत असल्याने शेतकरी आणि व्यापाऱ्यांचा माल बाहेरील बाजारपेठेत पाठविण्यापेक्षा स्थानिक विक्रीकडे अधिक कल आहे. परिणामी, हिमाचल प्रदेशातून पुण्याकडे होणारी चेरीची आवक जवळपास ठप्प झाली आहे. दरम्यान, सध्या पुण्यात उपलब्ध असलेली बहुतांश चेरी काश्मीरमधून येत आहे. काश्मीरहून विमानमार्गे माल पाठविला जात असल्याने विमान इंधनाच्या वाढलेल्या दराचा थेट परिणाम वाहतूक खर्चावर झाला आहे. त्यामुळे, काश्मीरची चेरीही महागल्याचे व्यापारी वर्गाकडून सांगण्यात आले.

### आवक वाढली, तरच दर घटतील

यंदा चेरीच्या उत्पादनावर हवामानाचा मोठा परिणाम झाला आहे. हिमाचल प्रदेशातून आवक जवळपास बंदच आहे. बाजार पूर्णपणे काश्मीरच्या चेरीवर अवलंबून आहे. त्यातच विमान वाहतूक खर्च वाढल्याने दरात मोठी वाढ झाली आहे. सध्या ग्राहकांकडून मागणी चांगली असली, तरी वाढलेल्या दरामुळे खरेदीचे प्रमाण कमी झाले आहे. पुढील काही दिवसांत काश्मीरमधील आवक वाढली, तर दरात थोडी घट होऊ शकते.

– **सत्यजित झेंडे**, व्यापारी, मार्केटयार्ड.



स्मार्ट सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहरात बेशिस्त नागरिकांकडून ओंकारेश्वर मंदिराजवळ महर्षी शिंदे पुलावरील पदपथावर कचरा टाकला जात आहे. त्यामुळे सुजाण नागरिकांना मनस्ताप होत आहे.

# सीईटी देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या चार लाखाने वाढली

## विद्यार्थ्यांचा व्यावसायिक अभ्यासक्रमाकडे अधिक कल

**पुणे** : महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे २०२६- २७ या शैक्षणिक वर्षासाठी घेण्यात आलेल्या सीईटी परीक्षा संपल्या आहेत. राज्यभरातून तब्बल १६ लाख २९ हजार ४८४ विद्यार्थ्यांनी सीईटी परीक्षा दिली आहे. गेल्या वर्षी १२ लाख ४६ हजार १९२ विद्यार्थ्यांनी सीईटी परीक्षा दिली होती. त्यामुळे यंदा सीईटी देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत ३ लाख ८३ हजाराने वाढ झाली आहे. एकट्या पीसीएम सीईटी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ७ लाख ३९ हजार ११७ एवढी आहे. त्यामुळे पारंपरिक अभ्यासक्रम सोडून विद्यार्थ्यांचा कल व्यावसायिक अभ्यासक्रमाकडे अधिक दिसून येत आहे.

सीईटी सेलतर्फे २४ मार्च ते २३ मे दरम्यान २० परीक्षा घेण्यात आल्या. जेईई मेन्स परीक्षेच्या धर्तीवर यंदा प्रथमच राज्य शासनातर्फे दोन सीईटी परीक्षा देण्याच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. विद्यार्थ्यांना एकच परीक्षा देणे बंधनकारक होते. मात्र, परीक्षा दिलेल्या दोन्ही मधील ज्या परीक्षेच्या निकालात अधिक परसेंटाइल असेल तो निकाल प्रवेशासाठी ग्राह्य धरला जाईल, असे स्पष्ट करण्यात आले होते. पीसीएम ग्रुपच्या दुसऱ्या सीईटीसाठी २ लाख ८५ हजार विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेतला. तर पीसीबी ग्रुपचा लाभ ९५ हजार ६३४ विद्यार्थ्यांनी घेतला. दोन्ही पीसीबी मिळून ३ लाख ५९ हजार ८४० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

एमबीए साठी एक लाख ५७ हजार ६३७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तीन वर्ष एलएलबी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ६९ हजार ४७३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. बीएड प्रवेशासाठी ९९५७० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. बीबीए, बीसीए, बीएमएस, बीबीएम अभ्यासक्रमासाठी ६२ हजार ३२१ विद्यार्थ्यांनी सिटी दिली. एमसीए साठी ५३ हजार २५६, नर्सिंग साठी ४३ हजार २८३, एलएलबी पाच वर्ष अभ्यासक्रमासाठी २९ हजार २८८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

२०२३- २४ या शैक्षणिक वर्षात सीईटी देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ९ लाख ३७ हजार ५१३ एवढी होती. २०२४-२५ मध्ये ही संख्या ११ लाख ८०हजार ७८१ एवढी झाली. तर २०२५-२६ मध्ये म्हणजेच मागील वर्षी ही संख्या १२ लाख ४६ लाख १९२ पर्यंत गेले. यावर्षी सीईटी परीक्षा देणारे विद्यार्थी १६ लाख २९ हजार ४८४ एवढे आहेत.

# रायगड विकास प्राधिकरण बरखास्त करण्याची रायगड बचाव समितीची मागणी

## किल्ले रायगडाच्या संवर्धनामध्ये कोट्यवधींचा भ्रष्टाचार

**पुणे** : किल्ले रायगडाच्या संवर्धन आणि विकासाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार सुरू असल्याचा गंभीर आरोप 'रायगड बचाव समिती'ने केला आहे. रायगडाच्या संवर्धनासाठी गेल्या ९ वर्षांत सुमारे ६०३ कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊनही, गडावरील प्रत्यक्ष कामांची स्थिती अत्यंत दयनीय आणि निकृष्ट दर्जाची असल्याचा आरोप करत, 'रायगड विकास प्राधिकरण' त्वरित बरखास्त करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात शिवरायांच्या सेनेतील पायदळ प्रमुख सरनोबत पिलाजी गोळे यांचे वंशज लौकिक गोळे आणि वकिल अर्चना मारणे यांनी पत्रकार परिषद घेऊन प्रशासनाचा तीव्र निषेध केला. पत्रकार परिषदेत बोलताना लौकिक गोळे यांनी आरोप केला की गडावर सध्या ज्या नवीन पायऱ्या आणि संरक्षण भिंती बांधल्या जात आहेत, त्यांच्या सांध्यांमध्ये प्रामुख्याने चुन्याचा वापर करणे मजबुतीसाठी अनिवार्य होते. मात्र, ठेकेदारांनी तिथे केवळ मातीचा वापर केला आहे. यामुळे हे संपूर्ण बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून, हलकासा धक्का लागला तरीही नव्याने बांधलेल्या पायऱ्या आणि भिंती कोसळत आहेत.

जनतेच्या पैशातून रायगडाचे संवर्धन केले जात असताना, अशा अत्यंत पवित्र आणि ऐतिहासिक ठिकाणीही केवळ स्वत:चे खिसे भरण्यासाठी भ्रष्टाचार सुरू आहे, हा समस्त शिवभक्तांचा आणि महाराष्ट्राचा मोठा अपमान असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



### रायगड 'युनेस्को'च्या जागतिक वारसा यादीत, मात्र गडावर स्वच्छतागृहच नाही

गडासाठी निधी येऊन तब्बल ९ वर्षे झाली, मात्र प्राधिकरण गडावर येणाऱ्या पर्यटकांसाठी एक टॉयलेट-बाथरूम देखील नीट बांधू शकले नाही. जे प्राधिकरण ९ वर्षांत एक साधी प्राथमिक सुविधा देऊ शकत नाही, ते ऐतिहासिक गडाचे जतन कसे करणार? असा संतप्त सवाल लौकिक गोळे यांनी उपस्थित केला.

### एकाच कामासाठी दोन वेळा निधी का?

गडावर पर्यटकांसाठी तीन वर्षांपूर्वी लाखो रुपये खर्चून बांधलेली स्वच्छतागृहे अद्यापही कुलूपबंद असून ती वापरलीच गेलेली नाहीत. आता ती मोडकळीस आल्याचे कारण दाखवून पुन्हा त्याच कामासाठी नवीन निधी लाटण्याचा प्रकार सुरू आहे. तसेच सुमारे १४ ते १५ लाख रुपये खर्च करून उभारलेले पाणी शुद्धीकरण यंत्र अवघ्या एक महिन्यात बंद पडले असून सध्या ते भंगार अवस्थेत आहे.

### रायगड बचाव समितीच्या प्रमुख मागण्या

१. किल्ले रायगड विकास प्राधिकरण त्वरित बरखास्त करण्यात यावे.
२. संबंधित भ्रष्ट प्रशासकीय अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करून त्यांना निलंबित करावे.
३. निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या आणि चुन्याऐवजी माती वापरणाऱ्या ठेकेदारांना कायमस्वरुपी काळ्या यादीत टाकून त्यांच्याकडून व्याजासह नुकसानभरपाई वसूल करावी.
४. संपूर्ण प्रकरणाची विशेष तपास पथका मार्फत चौकशी करण्यात यावी आणि सर्व कामांचे 'थर्ड पार्टी ऑडिट' करण्यात यावे.
५. रायगड खोऱ्यातील २१ गावांमधील ऐतिहासिक वस्तूंचे जतन करावे, तसेच वाघबीळ परिसरातील अश्मयुगीन अवशेषांचे संरक्षण करून सुरक्षित मार्ग उभारावा.

## धावत्या बसमधून महिलेचे मंगळसूत्र लंपास

**पुणे** : गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी एका प्रवासी महिलेच्या गळ्याला हिसका मारून एक लाख २० हजार रूपये किमतीचे मंगळसूत्र चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी विश्रांतवाडी पोलिसांनी अनोळखी चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल केला. याबाबत महिलेच्या पतीने विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे विश्रांतवाडीतील धानोरी परिसरात राहायला आहेत. सोमवारी त्यांच्या लग्नाचा वाढदिवस होता. त्यानिमित्त तक्रारदार आणि त्यांची पत्नी दगडूशेठ हलवाई गणपतीच्या दर्शनासाठी विश्रांतवाडी भागातून पीएमपी बसने प्रवास करीत होते.

## राष्ट्रवादीचे प्रवक्ते विकास लवांडे यांना जामीन मंजूर

### वारकरी संप्रदाय अवमान प्रकरण

**पुणे** : भविष्यात अशा प्रकारचा गुन्हा पुन्हा करणार नाही, तसेच



कायमस्वरूपी वास्तव्यासंदर्भातील पत्ता न्यायालयात सादर करावा, अशा अटीं व शर्तीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास सदाशिव लवांडे यांना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अलिशा बागल यांनी ३० हजारांच्या जातमुचलक्यावर मंगळवारी जामीन मंजूर केला.

वारकरी संप्रदायातील संत-महंत, महाराज, कीर्तनकार आणि धार्मिक व्यक्तींविषयी समाज माध्यमात आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी राष्ट्रवादीचे प्रवक्ते विकास सदाशिव लवांडे (वय-५१, रा. शिंदेवाडी, हवेली) यांना २१ मे रोजी वाघोली पोलिसांनी अटक केली होती. या प्रकरणात लवांडे यांना न्यायालयीन कोठडी झाल्यानंतर त्यांनी वकील मिलिंद पवार यांच्यामार्फत जामीन मिळविण्यासाठी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात अर्ज केला. लवांडे हे तक्रारदार व साक्षीदारांवर दबाव टाकू शकतात, तसेच आषाढी एकादशीनिमित्त वारी सोहळ्यात या वक्तव्याची पुनरावृत्ती झाल्यास कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी कारणे देत पोलिसांनी लवांडे यांच्या जामीन अर्जास विरोध केला होता. ही कारवाई सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या स्पष्ट निर्देशांचे उल्लंघन करणारी व कायद्याच्या प्रक्रियेविरुद्ध बेकायदेशीर असल्याचा ठोस युक्तिवाद बचाव पक्षातर्फे करण्यात आला. जिल्हा न्यायालयात चुकीची व दिशाभूल करणारी माहिती सादर करून लवांडे यांचा अंतरिम अटकपूर्व जामीन रद्द करून घेण्यात आल्याचा गंभीर मुद्दाही न्यायालयासमोर मांडण्यात आला.

## सीडबीचा ३७ वा स्थापना दिन साजरा

मुंबई : देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज मुंबई येथे Small Industries Development Bank of India (SIDBI) च्या ३७ व्या स्थापना दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात विशेष सहभाग नोंदवला. यावेळी बोलताना सीतारमण यांनी लघू आणि मध्यम उद्योगांसाठी सिड्बीने केलेल्या कामाचा गौरव केला. यावेळी बोलताना सीतरमण यांनी MSME क्षेत्र भारताच्या विकासात, रोजगार निर्मितीत आणि निर्यात वाढविण्यात खूप महत्त्वाची भूमिका बजावत आहे असे म्हटले. याशिवाय त्यांनी पश्चिम आशियातील युद्धामुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रांसाठी सरकारने आखलेल्या उपाययोजनांबद्दलही माहिती दिली. त्यामध्ये ECLGS 5.0 योजनेचा समावेश असून सध्याच्या कठीण काळात लघू आणि मध्यम उद्योगांना या योजनेचा मोठा फायदा होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, SIDBI साठी सरकारने दिलेल्या ₹५००० कोटी भांडवल सहाय्याबद्दलही त्यांनी यावेळी आवर्जून उल्लेख केला. सीतारमण यांनी SIDBI ची मार्केट-मेकर म्हणून भूमिका यावेळी अधोरेखीत केली. या कार्यक्रमात MSME क्षेत्र मजबूत करण्यासाठी, शेवटच्या घटकांपर्यंत कर्ज पुरवठा आणि ग्रामीण उद्योगांचे आधुनिकीकरण करण्यासाठी काही नवीन उपक्रम आणि पोर्टल्स सुरू करण्यात आले. या कार्यक्रमात 'SIDBI RRB Co-Lending Portal' सुरू करण्यात आले. या पोर्टलद्वारे SIDBI आणि प्रादेशिक ग्रामीण बँका (RRBs) यांच्यात भागीदारी होऊन ग्रामीण आणि कमी सेवा मिळालेल्या भागात कर्जपुरवठा सुधारेल. तसेच 'SIDBI MachFin Mart' हा डिजिटल प्लॅटफॉर्म सुरू करण्यात आला. MSME उद्योगांना यंत्रसामुग्री खरेदीसाठी एक व्यवस्थित बाजारपेठ उपलब्ध करुन देणे तसेच कर्ज प्रक्रियाही सुलभ करणे हा या प्लॅटफॉर्मचा उद्देश आहे.

# नाटकाचे थेट चित्रीकरण केल्यास अभिनयाची जादू हरवेल

## नसरुद्दीन शहा यांचे प्रतिपादन

**पुणे** : नाटकाचे थेट चित्रीकरण करून दाखवल्यास त्यात जिवंत अभिनयाची जादू आणि प्रेक्षकांसोबतचे थेट संभाषण हरवून जाते. नाटकावरून स्वतंत्र चित्रपट बनवणे वेगळे, पण सादरीकरणादरम्यान कॅमेऱ्याद्वारे ते टिपणे तितकेसे प्रभावी ठरत नाही. त्यामुळे नाटकाचा सिनेमा हा तितकासा प्रभावी होत नाही, असे मत ज्येष्ठ अभिनेते नसरुद्दीन शहा यांनी सोमवारी व्यक्त केले.

पुण्यात आयोजित एका विशेष पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ अभिनेते परेश रावल उपस्थित होते. शहा म्हणाले, नाटकाची मूळ ताकद ही रंगमंचावर अनुभवायला मिळते. नाटकाचा जेव्हा सिनेमा होतो तेव्हा तो तितका प्रभावी होत नाही. मी 'संगीत देवबाभळी' हे मराठी नाटक पाहिले. ते मला इतके आवडले की माझी ते पुन्हा पाहण्याची तीव्र इच्छा आहे. मी पूर्वी शकुंतलाबाईंच्या मुख्य भूमिका असलेला 'तमाशा' आणि 'लावणी'चा प्रयोगही दोन-तीन वेळा आवर्जून पाहिला आहे. माझ्या आयुष्यात मी पाहिलेले सर्वोत्तम नाट्यप्रयोग हे प्रामुख्याने मराठी भाषेतील आणि पुण्यात झालेले आहेत. त्यामुळे मराठी रंगभूमीच्या भविष्याची काळजी करण्याची मुळीच गरज नाही. पुण्यातून नेहमीच अत्यंत उत्साही, ऊर्जावान आणि नवे कलाकार उदयास येत असतात. पुण्यातून नाही तर मग कुठून नवे कलाकार मिळणार? असेही शहा म्हणाले.

मी ५० वर्षांपूर्वी जेव्हा ड्रामा स्कूलमध्ये प्रवेश केला होता, तेव्हापासून 'नाटक आता संपत चालले आहे' असे ऐकत आलो आहे. पण रंगभूमी आजही तितकीच जिवंत आहे आणि आनंदात सुरू आहे. पूर्वी जेव्हा टीव्ही मालिका सुरू झाल्या, तेव्हाही अशीच भीती व्यक्त केली जात होती; परंतु ज्येष्ठ दिग्दर्शक सत्यदेव दुबे नेहमी सांगायचे की, या



मालिका इतक्या सुमार दर्जाच्या आहेत की कंटाळून प्रेक्षक पळत पुन्हा नाटक पाहायला येतील. आणि नेमके तसेच घडले. अगदी नुकतेच आम्ही आयपीएलच्या फायनलच्या दिवशीही नाटकाचा प्रयोग केला आणि तो 'हाउसफुल्ल' होता, असेही त्यांनी नमूद केले.

माझ्याकडे येणाऱ्या तरुण पिढीला मी पहिला सल्ला देतो की, 'हिंदी चित्रपटांचे व्यसन आधी सोडा! अभिनय शिकण्याचे मूळ नियम सर्व माध्यमांसाठी सारखेच असतात. पालकांनाही मला सांगायचे आहे की, अभिनय करणे म्हणजे शिक्षणापासून पळ काढणे नव्हे. आपल्याला सुशिक्षित नटांची नितांत गरज आहे. अनेक वर्षे अशिक्षितांनी या क्षेत्रावर वर्चस्व गाजवले आहे, पण आता काळ बदलला आहे., असेही शहा यांनी नमूद केले.

### रंगभूमी कधीही संपणार नाही : परेश रावल

नाटक किंवा रंगभूमी कधीही संपणार नाही. तंत्रज्ञानाचा कितीही विकास झाला तरी नाटकाचे स्थान अढळ राहील. उलट आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि ओटीटीच्या युगात रंगभूमीचे भविष्य अधिक उज्ज्वल होईल, कारण प्रेक्षकांना त्यांच्या डोळ्यांसमोर जिवंत अभिनय पाहण्याची अनुभूती केवळ नाटकच देऊ शकते. असे स्पष्ट मत अभिनेते परेश रावल यांनी व्यक्त केले.

### नाटक कधीच नष्ट होणार नाही

नाटकाचे भविष्य अत्यंत उज्ज्वल आहे. एआय जितके जास्त पसरेल, तितके नाटकाचे महत्त्व वाढेल. कारण प्रेक्षकांनाही जाणीव होईल की रंगमंचावर जे काही घडत आहे, ते त्यांच्या डोळ्यांसमोर थेट घडत आहे. हे एआयसारखे कोणतेही 'पॅकेज्ड फूड' नाही. नाटकाच्या थेट सादरीकरणात आनंद असतो. त्यामुळे नाटक कधीही नष्ट होणार नाही. मी नुकतेच 'असेन मी नसेन मी' हे मराठी नाटक पाहिले. मराठी रंगभूमीची ताकद अफाट आहे. येथे एकाच वेळी ५२ वेगवेगळे नाट्यप्रयोग सुरू असतात, ही थक्क करणारी बाब आहे. मराठी प्रेक्षक खरोखरच नशीबवान आहेत, असेही परेश रावल यांनी सांगितले.




# कर्नाटक आणि गावरान हापूसची आवक वाढली

**पुणे :** कोकणातील हापूसचा हंगाम जवळपास संपला आहे. त्यामुळे बाजारात कर्नाटक आणि गावरान हापूसची आवक वाढली आहे. आवक चांगली असल्यामुळे दरही ग्राहकांच्या आवाक्यात आहेत. त्यामुळे आता ग्राहकांना आंब्याची चव चाखता येणार आहे.



यंदा हवामान बदलाचा फटका कोकण, कर्नाटक आणि गावरान आंब्याला बसला आहे. परिणामी उत्पादनात लक्षणीय घट झाली आहे. यंदा कोकणातील हापूसची आवक नेहमीच्या तुलनेत ५० ते ६० टक्केच झाली. हंगामत उच्चांकी १२ ते १३ हजार पेट्यांची आवक झाली. मागील वर्षी ही आवक २० हजार पेटी होती. आता कोकणातील हंगाम जवळपास संपला आहे. तुरळक प्रमाणात आवक होत आहे. अशी माहिती व्यापारी युवराज काची यांनी दिली.

कर्नाटक हापूसचा हंगाम बहरला आहे. रोज १५ ते १८ हजार पेट्या, ७ ते ८ हजार क्रेटस आणि सुमारे २० हजार बॉक्सची आवक होत आहे. मात्र, आवकच्या तुलनेत स्थानिक बाजारपेठेमध्ये कर्नाटक हापूसला मागणी कमी आहे. दरवर्षी गुजरात, राजस्तान आणि मध्य प्रदेश येथे येथील घाऊक बाजारातून माल जात असतो. मात्र, यंदा तेथूनही मागणी नाही. त्यामुळे आठवडाभरात आंब्याच्या भावात १५ ते २० टक्कनी घट झाली आहे. ३ ते ५ डझनाच्या कच्च्या मालाच्या पेटीला ४०० ते ६०० रुपये भाव मिळत आहे. महागाईमुळे ग्राहकांनी आंबा खरेदीकडे पाठ फिरविल्याची माहिती कर्नाटक हापूसचे व्यापारी रोहन उरसळ यांनी दिली.

गोड, रसाळ गावरान आंब्याचा सुगंध मार्केट यार्डातील फळबाजारात दरवळू लागला आहे. २० मे पासून गावरान हापूसचा हंगाम सुरू झाला आहे. हवामानातील बदलामुळे यंदा नेहमीच्या तुलनेत ३० टक्केच फळधारणा झाली आहे. दरवर्षी या काळात बाजारात २५० ते ३०० डाग तयार मालाचे बाजारात येत असतात. यंदा मात्र ५० ते ६० डागच आवक होत आहे. बेलावडे, उरावडे, मांडवी, खेचरे या भागातून ही आवक होत आहे. डझनास दर्जानुसार २०० ते ४०० रुपये भाव मिळत असल्याची माहिती गावरान हापूसचे व्यापारी यशवंत कोंडे यांनी दिली.

# महापालिकेच्या सभांवर आचारसंहितेची नजर

## निवडणूक आयोगाकडून मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याचे आदेश

**पुणे :** पुणे विधानपरिषद द्विवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून, महानगरपालिकेतील सभांच्या कामकाजावरही आता आचारसंहितेची कडक नजर राहणार आहे. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयातील आचारसंहिता कक्षाने महापालिकेच्या नगर सचिवांना पत्र पाठवून आवश्यक निर्देश दिले आहेत.



तहसीलदार तथा नोडल अधिकारी (आचारसंहिता कक्ष) यांनी दिलेल्या पत्रानुसार, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे महापालिकेच्या सभांमध्ये होणारे निर्णय, घोषणा, ठराव आणि कामकाज करताना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. पत्रात भारत निवडणूक आयोगाच्या २३ मार्च २०२० रोजीच्या आदेशाचा संदर्भ देण्यात आला असून, त्यातील मुद्दा क्रमांक ४ चे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, स्थानिक प्राधिकरण मतदारसंघातून विधान परिषद निवडणूक जाहीर झाल्यानंतर लागू झालेल्या आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

महापालिकेच्या सभांमध्ये नव्या विकासकामांच्या घोषणा, आर्थिक मंजुरी किंवा निवडणुकीवर परिणाम करणारे निर्णय टाळण्याबाबत प्रशासन सतर्क झाले असून, आगामी काळात सभांच्या कामकाजावर निवडणूक विभागाची विशेष नजर राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# जनगणना नोंदणीच्या कामाला नकार देणाऱ्या शिक्षकाविरुद्ध गुन्हा

**पुणे :** मतदार जनगणना नोंदणीच्या कामाला नकार देणाऱ्या जिल्हा परिषदेच्या एका शिक्षकाविरुद्ध भारती विद्यापीठ पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत ग्राम महसूल अधिकारी अमोल बारहाते (वय ३२) यांनी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. गुन्हा दाखल झालेला व्यक्ती हा एका जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहे.

यादी पडताळणीचे काम त्यांच्याकडे सोपविण्यात आले होते. त्यांची मतदान केंद्रीय स्तरीय अधिकारी (बुथ लेव्हल ऑफिसर) म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, त्यांनी हे काम करण्यास नकार दिला. त्यामुळे शासकीय आदेशाचे पालन न केल्या प्रकरणी त्यांच्याविरुद्ध ग्राम महसूल अधिकाऱ्यांकडून तक्रार देण्यात आली. त्यानुसार, शिक्षकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबतचा पुढील तपास सहाय्यक पोलिस फौजदार भोसले करत आहेत.

**प्रशिक्षणात हजर न राहणाऱ्यांवर गुन्हे**

मागील पंधरा दिवसांपूर्वी जनगणना प्रशिक्षण कार्यक्रमास अनुपस्थिती लावणाऱ्या हडपसर परिसरातील फुरसुंगी भागात असलेल्या एका शाळेतील सात शिक्षकांसह काही कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# सफाई कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीवरील नियंत्रणासाठी विशेष मोबाइल ॲप

**पुणे:** महापालिकेतील कंत्राटी तसेच कायमस्वरूपी सफाई कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीवर नियंत्रण आणण्यासाठी प्रशासनाने आता तंत्रज्ञानाचा आधार घेतला आहे. अनेक कर्मचारी कामावर हजर राहत नसल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर एचएमएस संस्थेकडून विशेष मोबाइल विकसित करण्यात आले असून, त्याद्वारे कर्मचाऱ्यांची फेस रेकग्निशन प्रणालीद्वारे उपस्थिती नोंदवली जाणार आहे.

महापालिकेकडून सर्व सफाई कर्मचाऱ्यांचे नोंदणीकरण पूर्ण करण्यात आले असून, सुमारे दहा हजार कर्मचाऱ्यांचा डेटा प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. या ॲपच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांची केवळ हजेरीच नव्हे, तर प्रत्यक्ष काम झाले की नाही यावरही लक्ष ठेवण्यात येणार आहे.

प्रशासनाकडून 'जिओ फेस एरिया' प्रणालीचा वापर करण्यात येणार असून, संबंधित कर्मचारी नियुक्त परिसरात प्रत्यक्ष उपस्थित राहून काम करत आहेत का, याची पडताळणी केली जाणार आहे. त्यामुळे केवळ हजेरी लावून अनुपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अंकुश बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून या प्रणालीची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून, शहरातील स्वच्छता व्यवस्थेत पारदर्शकता आणि शिस्त आणण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. नव्या डिजिटल व्यवस्थेमुळे कामाचे प्रत्यक्ष निरीक्षण शक्य होणार असल्याने नागरिकांनाही त्याचा फायदा होणार असल्याचे सांगितले जात आहे.

### सहायक आयुक्तांवर जबाबदारी

महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्तांना त्यांच्या भागात स्वच्छते विषयक कामे करुन घेण्याची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. सकाळी ७ ते ९.३० या वेळेत त्यांना त्यांच्या हद्दीत फिरावे लागणार आहे.

स्वच्छता करुन घेण्याची त्यांची जबाबदारी राहणार आहे. त्यामुळे आता सहायक आयुक्तांना काम दाखवा अथवा कारवाईला सामोरे जा असा एकप्रकारे इशाराच देण्यात आला आहे. क्षेत्रीय कार्यालयानुसार महापालिका आयुक्त कामाचा आढावा घेणार आहेत. त्यामुळे सहायक आयुक्तांनी त्यांच्या कामाचा अहवाल सादर करावा लागणार आहे.

# व्यावसायिकाच्या चेहऱ्यावर स्प्रे मारून २५ लाखांची रोकड लुटली

**पुणे :** एका व्यावसायिकाच्या चेहऱ्यावर स्प्रे मारून चोरट्यांनी त्यांच्याकडील २५ लाख रुपयांची रोकड असलेली पिशवी हिसकावून चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना धनकवडी भागातील टपाल कार्यालयाजवळ भरदिवसा घडली. याप्रकरणी सहकारनगर पोलिसांकडून चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, त्यांचा शोध सुरू आहे.

याबाबत एका ४६ वर्षीय व्यावसायिकाने सहकारनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे व्यावसायिक असून ते धनकवडी भागात राहायला आहेत. सोमवारी सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास ते धनकवडीतील टपाल कार्यालय परिसरातून निघाले होते. त्यावेळी दुचाकीवरुन आलेल्या दोन चोरट्यांनी त्यांना भरररस्त्यात अडविले. चेहऱ्यावर स्प्रे मारून त्यांच्याकडील २५ लाख ९० हजार रुपये असलेली पिशवी हिसकावून नेली. त्यानंतर व्यावसायिकाने आरडाओरड केला असता चोरटे क्षणात पसार झाले.

घाबरलेल्या व्यावसायिकाने पोलिसांकडे धाव घेतली. दाखल गुन्ह्यात पोलिसांकडून फरारी चोरट्यांचा माग काढण्यात येत आहे. पोलिसांकडून धनकवडी टपाल कार्यालय परिसरातील सर्व सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले जात आहे.

# आयुर्वेद ही अचूक रोगनिदानाची शास्त्रशुद्ध विचारपद्धती

**पुणे :** आयुर्वेदातील रोगनिदान ही केवळ लक्षणांवर आधारित प्रक्रिया नाही. तर शरीर, मन आणि प्रकृतीचा सखोल अभ्यास करणारी शास्त्रशुद्ध विचारपद्धती आहे. दोष, धातू आणि मल या मूलतत्त्वांच्या आधारे कोणत्याही रोगाचे अचूक निदान करता येते. रोगाचे निदान, त्याचे समूळ नष्ट करण्याची क्षमता आयुर्वेदामध्ये असून, आयुर्वेदाला अधिक प्रभावी करण्यासाठी संशोधन व तंत्रज्ञानाची जोड द्यायला हवी, असे प्रतिपादन प्रख्यात आयुर्वेदतज्ज्ञ, संशोधक आणि भारतीय ज्ञानपरंपरेचे अभ्यासक डॉ. हरिश पाटणकर यांनी केले.

लंडन येथील आयुर्वेद प्रोफेशनल्स असोसिएशनच्या वतीने 'एपीए आयुर्फेस्ट २०२६', या आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. पाटणकर यांचे 'भारतीय आयुर्वेदाची मूलभूत तत्वे' यावर बीजभाषण झाले. या परिषदेत जगभरातील सुमारे दोनशेहून अधिक नामवंत आयुर्वेदतज्ज्ञ, संशोधक आणि व्यावसायिकांची उपस्थिती होती. डॉ. विजय मूर्ती, लोथार पिर्क, डॉ. करेन ओ'ब्रायन-कोप, डॉ. मनीष पंडित, डॉ. सुनिल कुमार, डॉ. रुपी औजला, डॉ. विनायक अबॉट, डॉ. कांचन शर्मा, डॉ. ख्रिस्तोफर एथरिज, डॉ. स्नेहल पाटणकर यांसारखे आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. पाटणकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

डॉ. पाटणकर यांनी आपल्या भाषणात आयुर्वेदातील दोष, धातू आणि मल या मूलभूत तत्त्वांच्या आधारे रोगनिदान करण्याच्या व्यापक विचारपद्धतीचे विवेचन केले. आयुर्वेद ही केवळ उपचारपद्धती नसून शरीर, मन आणि प्रकृतीचा एकत्रित विचार करणारे संपूर्ण जीवनशास्त्र असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# ज्येष्ठांसाठी 'ग्रँडपॅरेंट केअर' सामाजिक आरोग्य उपक्रम सुरू

## व्हेन्सर हॉस्पिटलचा पुढाकार

**पुणे :** वृद्धत्व हे आता केवळ आकडेवारी नसून पुणे, राज्य आणि देशासमोरील एक मोठे सामाजिक आणि आरोग्यविषयक आव्हान बनले आहे. या पार्श्वभूमीवर, पाच डॉक्टरांनी स्थापन केलेल्या व चालवलेल्या 'व्हेन्सर हॉस्पिटल'ने ज्येष्ठ नागरिकांसाठी ग्रँडपॅरेंट केअर हा विशेष सामाजिक आरोग्य उपक्रम सुरू केला आहे.

या उपक्रमांतर्गत प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, दृष्टी काळजी, आपत्कालीन मदत, मानसिक आधार आणि सामाजिक संवाद या सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

नेत्ररोग तज्ज्ञ आणि रुग्णालयाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शरुन शितोळे यांनी सांगितले की, सध्या ज्येष्ठ नागरिकांची आरोग्यसेवा तुकड्या-तुकड्यांत विभागलेली असल्यामुळे त्यांना वेगवेगळ्या गरजांसाठी वेगवेगळ्या डॉक्टरांकडे जावे लागते, ज्याने गोंधळ, तणाव आणि उपचारांमध्ये विलंब होतो. हे टाळण्यासाठी ग्रँडपॅरेंट केअर हा उपक्रम तीन मुख्य भागांवर आधारित तयार करण्यात आला आहे.

डॉ. भूषण शितोळे आणि डॉ. समीर पाटील यांनी स्पष्ट केले की, शारीरिक हालचाली मंदावणे, दृष्टी कमजोर होणे किंवा वैद्यकीय आधार नसण्याच्या भावनेमुळे ज्येष्ठ नागरिक मुख्य प्रवाहातून दूर जातात. मात्र, नियमित आरोग्य तपासणी, डॉक्टरांशी संपर्क आणि सामाजिक आधारामुळे ते अधिक सक्रिय व मानसिकदृष्ट्या मजबूत राहू शकतात. म्हणूनच, ग्रँडपॅरेंट केअर ही केवळ एक नवीन आरोग्यसेवा नसून पुण्यातील ज्येष्ठांच्या आरोग्य आणि सन्मानपूर्ण जीवनासाठी सुरू करण्यात आलेली सामाजिक आरोग्य मोहीम आहे.

# शब्दप्रेमामुळे मराठी रंगभूमीचे शरीर आणि रंगभाषेकडे दुर्लक्ष

## वामन केंद्रे यांचे प्रतिपादन

**पुणे :** मराठी रंगभूमीने शब्दविरहित रंगभाषेकडे पुरेसे लक्ष दिले नाही. नट - नाटककारही शरीरभाषेपेक्षा शब्दांमध्ये रमले. त्यामुळे अपवाद वगळता, मराठी रंगभूमीवर शब्दविरहित रंगभाषेने मांडलेला समृद्ध आशय मर्यादित राहिला, असे मत ज्येष्ठ रंगकर्मी वामन केंद्रे यांनी व्यक्त केले.



'मॅडम मेनका कोरिओग्राफी मूव्हमेंट', या उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. रंगभाषा आणि शारीर भाषेतूनही रसिकांना गुंतवून ठेवणारा संपन्न नाट्यानुभव शक्य आहे, हे पारंपरिक कलाप्रकारांनी सिद्ध केले आहे. त्या परंपरेचे पुनर्जागरण महत्त्वाचे आहे, असेही केंद्रे यांनी नमूद केले.

ज्येष्ठ कथक नृत्यांगना, नृत्यगुरू विदुषी शमा भाटे, नादरूप संस्था आणि महाराष्ट्र कल्चरल सेंटर यांच्या वतीने ज्योत्स्ना भोळे सभागृह, हिराबाग, टिळक रस्ता येथे या उपक्रमाची सुरुवात केंद्रे यांच्या विशेष सादरीकरणातून झाली.

केंद्रे म्हणाले, नजरेला दिसणारे, ऐकता येणारे आणि भावाभिव्यक्तीला आवाहन करणारे सादरीकरण, म्हणजे नाटक, असा अर्थ अभिप्रेत आहे. पण आपले रंगकर्मी अद्याप नाट्यशास्त्राला भिडलेले नाहीत. शब्दप्रधान रंगभूमी, असाच अर्थ गृहित धरून नाटके होत राहिली आहेत.

दृष्य नाटक हे शब्दांशिवाय किंवा अगदी मोजक्या शब्दांनिशी अस्वस्थ करणारा आशय पोहोचवते. शरीरभाषेचा आणि रंगभाषेचा कल्पक वापर उत्तम आशयनिर्मिती करू शकतो, मात्र या शक्यता पुरेशा आजमावल्या गेल्या नाहीत, हे वास्तव आहे.

मौनही बोलके ठरू शकते, शरीरभाषा संवाद साधू शकते, अनेकदा शरीरभाषा नेपथ्यविशेष निर्माण करू शकते. आधुनिक काळात कोलाज, मोंटाज यांचाही वापर होतो, असेही केंद्रे यांनी सांगितले. अमीरा पाटणकर यांनी स्वागत केले. शमा भाटे यांनी वामन केंद्रे यांचा सत्कार केला.

# गरजूंना साहित्याचे वाटप

**सरला राठोड वेलफेअर फाउंडेशनचा उपक्रम**

**पुणे:** सरला राठोड वेलफेअर फाउंडेशन वतीने ससून हॉस्पिटलमधील अनाथ आणि गरजू रुग्णांना व्हीलचेअर, वॉकर, डल्ट डायपर्स आणि इतर आवश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून रुग्णांच्या चेहऱ्यावर हसू आणण्याचा एक प्रामाणिक व कौतुकास्पद प्रयत्न संस्थेने केला आहे. सामाजिक कार्यात मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व हितचिंतकांचे आणि सहकार्य करणाऱ्यांचे संस्थेच्या वतीने आभार मानण्यात आले.

या कार्यक्रमासाठी सरला राठोड वेलफेअर फाउंडेशनच्या संस्थापिका रेणुका राठोड, सोनाली कुलकर्णी, संग्राम धोंगडे यांच्यासह संस्थेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. तसेच, ससून जनरल हॉस्पिटलच्या जनरल सर्जरी विभागाच्या विभागप्रमुख डॉ. लता भोईर, सोशल वर्क विभागाचे डॉ. मिलिंद बनसोडे, प्रथमेश गायकवाड आणि ससून हॉस्पिटलमधील परिचारिका यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

# पत्नी उच्चशिक्षित असली तरी तिला आधाराची गरज

## न्यायालयाचा निष्कर्ष : पतीला पोटगी देण्याचा आदेश

**पुणे :** पत्नी उच्चशिक्षित असली, तरी तिला आधाराची गरज आहे, असा निष्कर्ष नोंदवून तिला दरमहा १० हजार रुपये अंतरिम पोटगी देण्याचा आदेश कौटुंबिक न्यायालयाने पतीला दिला. पत्नी व्यवस्थापनाची पदव्युत्तर पदवीधारक (एमबीए) आहे. मग तिने स्वतः कमवावे, माझ्याकडे पोटगी का मागते हा पतीचा युक्तिवादही न्यायालयाने खोडून काढला.

या प्रकरणात पती सनदी लेखापाल असून, पत्नी गृहिणी आहे. मतभेदांतून होणाऱ्या भांडणांना वैतागून पत्नीने क्रूरतेच्या कारणास्तव घटस्फोट मिळण्यासाठी कौटुंबिक न्यायालयात दावा दाखल केला. त्यावर, पत्नीने हिंदू विवाह कायद्याच्या कलम २४ अंतर्गत अंतरिम पोटगीसाठी न्यायालयात अर्ज केला. तिच्या वतीने वकील तेजस पवार यांनी बाजू मांडली. पतीने पत्नीला घराबाहेर काढले असून, उच्चशिक्षित असली, तरी तिच्याकडे उदरनिर्वाहाचा कोणताही स्रोत नाही. पती सनदी लेखापाल असून, चांगले उत्पन्न मिळवत आहे. त्याची शेअर बाजारात मोठी गुंतवणूक असून, जमिनीची मालमत्ताही आहे. सासरच्या घरी असलेल्या जीवनमानाप्रमाणे जगण्यासाठी पत्नीला अंतरिम पोटगीची आवश्यकता आहे, असा युक्तिवाद वकील पवार यांनी केला. त्याला पतीच्या वकिलांनी विरोध केला.

पत्नी क्रूर वागत असून, त्यामुळे पती कामावर लक्ष केंद्रित करू शकत नाही. पतीवर आई-वडील आणि आजीच्या पालनपोषणाची जबाबदारी आहे. पगारातून सुमारे ३४ हजार रुपये गृहकर्जाचे हप्ते भरावे लागतात. पत्नी उच्चशिक्षित असून, ती निष्क्रिय बसून पोटगी मागू शकत नाही. लग्नापूर्वी ती बँकेत काम करीत होती. त्यामुळे तिला कामाचा अनुभव आहे. त्यामुळे ती स्वतः कमवू शकते, असा युक्तिवाद करून तिचा अंतरिम पोटगीचा अर्ज फेटाळण्याची विनंती पतीच्या वकिलांनी केली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालय आणि दिल्ली उच्च न्यायालयाच्या निवाड्यांचा आधार घेऊन पत्नीला अंतरिम पोटगी देण्याचा आदेश पतीला दिला.

या प्रकरणात पत्नीच्या वतीने वकील तेजस पवार यांनी मुंबई उच्च न्यायालय आणि दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेल्या निवाड्यांचे दाखले सादर केले. पत्नी नोकरी करीत नसली, तरी तिच्याकडे शैक्षणिक पात्रता असणे हे अंतरिम पोटगी नाकारण्याचे कारण ठरू शकत नाही, असा निवाडा मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला होता. तर, 'पत्नीला पोटगी देणे हे पतीचे कर्तव्य आहे,'असे मत दिल्ली उच्च न्यायालयाने एका खटल्यात मांडले होते.

# एमआयटी डब्ल्यूपीयूमध्ये स्टार्टअपसाठी ई-मोबिलिटी सेंटर

**पुणे :** इलेक्ट्रिक मोबिलिटीच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीमधील सेंटर फॉर एक्सलेन्स इलेक्ट्रिक व्हेकल्सच्या माध्यमातून इलेक्ट्रिक वाहने आणि संबंधीत तंत्रज्ञानाच्या क्षेत्राला परिपूर्ण करण्यासाठी संशोधन, विकास, कौशल्य विकास यावर भर दिला जात आहे. टीबीआय सेंटर मध्ये ३ यशस्वी स्टार्टअप, ४५ वेगवेगळ्या स्टार्टअपवर काम सुरू आहे. ज्यांना यशस्वीरित्या स्वतःचे स्टार्टअप सुरू करावयाचे आहे, त्यांच्यासाठी हे सेंटर सर्व मदत करेल. माईर्स एमआयटीचे संस्थापक व सेंटर फॉर एक्सलेन्स इलेक्ट्रीक व्हेइकल्सचे संचालक प्रा. प्रकाश जोशी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी एमआयटी टीबीआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद गोरे, ईॲण्डटीसीच्या विभाग प्रमुख प्रा.डॉ. पारुल जाधव व सहयोगी प्राध्यापक डॉ. साकेत येवलेकर उपस्थित होते.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी विभागाच्या माध्यमातून या केंद्रात कार्य केले जात आहे. शैक्षणिक ज्ञान आणि वेगाने विकसित होणारा इलेक्ट्रिक वाहन उद्योग यातील दरी भरुन काढणे हा उपक्रमाचा उद्देश आहे.

डॉ. पारुल जाधव म्हणाल्या, या केंद्राच्या माध्यमातून प्रकल्प विकास, सहयोगी संशोधन, करिअर काउन्सिलिंग, विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे प्रशिक्षण, उद्योगांशी सल्लामसलत, स्टार्टअप सहाय्य आणि ईव्ही क्षेत्रात संशोधन आणि विकासावर विशेष कार्य केले जात आहे.

प्रसाद गोरे म्हणाले, या एमआयटी टीबीआय सेंटरच्या माध्यमातून जवळपास ७५ स्टार्टअपसला पाठबळ देण्यात आले आहे.

डॉ. साकेत येवलेकर म्हणाले, उद्योग क्षेत्रातील वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी जागतिक दर्जाची पायाभूत सुविधा आणि व्यावहारिक प्रशिक्षण उपलब्ध करून देणे, विशेष कार्यक्रमांद्वारे विद्यार्थी व उद्योग व्यावसायिकांना इलेक्ट्रिक मोबिलिटीमधील नाविन्यपूर्ण अध्ययावत ज्ञान व कौशल्ये प्रदान केली जात आहेत.

Registered No. PCW/002/2024-2026-S.P.College Post-RNI No. 1755/1957

केसरी क्रीडा

आयपीएल २०२६

पुणे, २७ मे २०२६/१२

# सिंधू, सात्विक-चिराग यांचा पहिल्या फेरीत विजय

**सिंगापूर :** स्टार भारतीय बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधूने मंगळवारी सिंगापूर ओपनमधील महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत पाचव्या मानांकित इंडोनेशियाच्या पुत्री कुसुमा वरदानीचा २१-१७, २१-१८ असा सरळ गेममध्ये पराभव केला.

सिंधूचा पुढील सामना माजी विश्वविजेती जपानच्या रिको गुंजीशी होईल. आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्या सात्विक-साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या पुरुष दुहेरीच्या जोडीनेही पहिल्या फेरीत जागतिक क्रमवारीत २५ व्या क्रमांकावर असलेल्या मलेशियाच्या चेन झी यी आणि प्रेस्ली स्मिथ या जोडीचा २६-२८, २१-१५, २१-१३ असा पराभव करून पुढील फेरीत प्रवेश केला.

**सिंगापूर ओपन बॅडमिंटन स्पर्धा**

जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असलेली भारतीय जोडी पुढच्या फेरीत चायनीज तैपेईची जोडी ली झे-हुई आणि यांग पो-सुआन विरुद्ध चीनची जोडी लिऊ यांग आणि हुआंग डी यांच्यातील सामन्याच्या विजेत्याशी सामना करेल.



आशियाई चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत पोहोचलेला उदयोन्मुख भारतीय बॅडमिंटनपटू आयुष शेट्टी, पुरुष एकेरीच्या ६५ मिनिटांच्या सामन्यात विश्व चॅम्पियनशिप कांस्यपदक विजेता व्हिक्टर एक्सेलसेनकडून २१-११, १४-२१, १२-२१ असा पराभव झाल्याने स्पर्धेतून बाहेर पडला. तरुण उन्नती हुडा देखील महिला एकेरीच्या सामन्यात माजी विश्व ज्युनियर चॅम्पियन आणि आठवी मानांकित तोमोका मियाझाकीकडून १४-२१, १०-२१ ने पराभूत होऊन स्पर्धेतून बाहेर पडली.

गेल्या वर्षी जागतिक चॅम्पियनशिप आणि सुदिरमन कपमध्ये इंडोनेशियाच्या खेळाडूकडून दोनदा पराभूत झालेल्या सिंधूसाठी हा विजय आत्मविश्वास वाढवणारा आहे. मंगळवारी, जागतिक क्रमवारीत ११ व्या क्रमांकावर असलेल्या सिंधूने ४-० अशी आघाडी घेत चांगली सुरुवात केली, पण वरदानीने पुनरागमन करत ७-७ अशी बरोबरी साधली आणि नंतर १५-११ अशी आघाडी घेतली. मात्र, सिंधूने जोरदार पुनरागमन करत शेवटच्या सातपैकी सहा गुण जिंकून पहिला गेम जिंकला. दुसरा गेम अटीतटीचा झाला. सिंधूने १३-११ अशी आघाडी घेतली, पण वरदानीने पुन्हा एकदा बरोबरी साधली. मात्र, सिंधूने सामन्याच्या शेवटच्या क्षणांमध्ये आपला संयम राखला आणि सामना जिंकला.

लक्ष्य सेन, एच. एस. प्रणॉय आणि मालविका बन्सोड बुधवारी आपल्या मोहिमेला सुरुवात करतील.






# सबालेन्काची विजयी सुरुवात; मेदवेदेवचा पराभव

**पॅरिस :** जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेली टेनिसपटू आर्यना सबालेन्काने फ्रेंच ओपनमध्ये पहिल्या फेरीत शानदार विजय मिळवला आहे, तर दुसरीकडे पुरुष एकेरीमध्ये रशियन स्टार डॅनियल मेदवेदेवला पराभवाचा मोठा धक्का बसला.



सबालेन्काने स्पेनच्या जेसिका बौझास मानेरोला ६-४, ६-२ असा पराभव करत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. सामन्यादरम्यान, तिने नेटजवळ आक्रमक खेळ केला आणि अनेक उत्कृष्ट व्हॉली पॉइंट्स जिंकले.

रोलँड गॅरोसमध्ये सलग तिसऱ्या दिवशी तपमान ३२ अंश सेल्सिअसपर्यंत होते. उष्ण हवामानामुळे मातीचे मैदान नेहमीपेक्षा लवकर सुकत असल्याने खेळ अधिक वेगवान होत आहे. यामुळे नेटजवळ आक्रमक डावपेचांना वाव मिळत आहे.

सामन्यानंतर बोलताना सबालेन्का म्हणाली, सध्या खेळातील सर्वात मजेशीर गोष्ट म्हणजे नेटजवळ पॉइंट्स जिंकता येणे. मी माझ्या खेळाच्या या क्षेत्रात खूप सुधारणा केली आहे. पुरुष एकेरीमध्ये, ऑस्ट्रेलियाच्या डम वॉल्टनने पाच-सेटच्या सामन्यात मेदवेदेवला ६-२, १-६, ६-१, १-६, ६-४ असे पराभूत करून स्पर्धेतील सर्वात मोठा धक्कादायक निकाल नोंदवला.

# बंगळूरूचे गुजरातसमोर २५५ धावांचे विशाल आव्हान

**धर्मशाळा :** इंडियन प्रीमियर लीगच्या बाद फेरीतील पहिल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळूरूने गुजरात टायटन्ससमोर अंतिम सामन्यात धडक मारण्यासाठी २५५ धावांचे विशाल आव्हान उभे केले आहे. बंगळूरूकडून कर्णधार रजत पाटीदारने ३३ चेंडूत ५ चौकार आणि ९ षटकारांच्या मदतीने ९३ धावांची नाबाद वादळी खेळी केली. त्याला कृणाल पांड्या (४३) आणि देवदत्त पडिक्कल (३०)यांनी चांगली साथ दिली.



धर्मशाळेतील मैदानावर रंगलेल्या यासामन्यात गुजरातने नाणेफेक जिंकत बंगळूरूला प्रथम फलंदाजीस आमंत्रित केले. बंगळूरूने २० षटकांत २५४ धावा केल्या आणि गुजरात समोर २५५ धवांचे ऐतिहासिक लक्ष्य ठेवले आहे. आयपीएल बाद फेरीच्या इतिहासातील ही सर्वोच्च धावसंख्या आहे.

बंगळूरूच्या डावाची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. व्यंकटेश अय्यरने काही चांगले फटके मारले पण त्याला मोठी खेळी करता आली नाही. त्याने तीन चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने सात चेंडूत १९ धावा केल्या. दुसऱ्या षटकात कागिसो रबाडाने त्याला बाद केले. व्यंकटेशने विराट कोहलीसोबत २१ धावांची भागीदारी केली. यानंतर कोहलीने देवदत्त पडिक्कलकडून फलंदाजीची सूत्रे हाती घेतली. त्या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ७२ धावांची भागीदारी केली. नवव्या षटकात जेसन होल्डरने कोहली आणि पडिक्कल यांना बाद केले. कोहलीने २५ चेंडूंमध्ये पाच चौकार आणि एका षटकारासह ४३ धावा जोडल्या. पडिक्कलने १९ चेंडूंमध्ये पाच चौकारांसह ३० धावा केल्या. यानंतर कर्णधार रजत पाटीदारने कृणाल पांड्याच्या साथीने डावाची सूत्रे आपल्या हातात घेत दोघांनी मिळून चौथ्या विकेटसाठी ९५ धावांची भागीदारी केली आणि बंगळूरूला मजबूत स्थितीत आणले.

# वावरिंकाचा पहिल्याच फेरीत पराभव

## भावनिक होत दिला फ्रेंच ओपनला निरोप



**पॅरिस :** स्विस दिग्गज टेनिसपटू स्टॅन वावरिंकाला पहिल्याच फेरीत पराभवाचा धक्का बसला आहे. या पराभावामुळे भावनिक होत त्याने फ्रेंच ओपनला निरोप दिला.

वावरिंका २०१५ च्या फ्रेंच ओपनचा विजेता आणि २०१७ चा उपविजेता होता. ४१ वर्षीय वावरिंकाने या हंगामाच्या अखेरीस निवृत्तीची घोषणा याआधीच केली आहे. नेदरलँड्सच्या जेस्पर डी जॉन्गने वावरिंकाचा ६-३, ३-६, ६-३, ६-४ असा पराभव केला. विजयानंतर, डी जॉन्गने प्रेक्षकांना वावरिंकासाठी टाळ्या वाजवण्याचे आवाहन केले.


पराभवानंतर भावूक झालेल्या वावरिंका म्हणाला, तुम्हा सर्वांचा निरोप घेणे खूप कठीण आहे. रोलँड गॅरोस हे ते ठिकाण आहे, जिथे मी टेनिसपटू म्हणून माझी कारकिर्द सुरू केली. विम्बल्डन आणि यूएस ओपन खेळण्याची संधी अजूनही असली तरी, टेनिसला निरोप देणे सोपे नसेल, असे वावरिंकाने कबूल केले. गेली २० वर्षे मी या भावना अनुभवल्या आहेत. हा प्रवास कधीच संपू नये असे मला वाटले. मी या खेळाला माझे सर्वस्व दिले आहे, असे त्याने नमूद केले.

# पहिल्या फेरीत जोकोविचचा संघर्षपूर्ण विजय

## सामन्यावेळी प्रेक्षकांची शेरेबाजी

**पॅरिस :** वयाच्या ३९व्या वर्षीही नोव्हाक जोकोविच याने २२ वर्षीय जिओव्हानी एम्पेत्शी पेरीकार्ड याचा पराभव करत फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत विजयी सलामी दिली. या सामन्यात जोकोविचला प्रेक्षकांच्या शेरेबाजीचा सामना करावा लागला. विक्रमी ८२ व्या ग्रँडस्लॅम स्पर्धेत खेळताना जोकोविचला पहिल्या फेरीत संघर्ष करावा लागला, पण पहिला सेट गमावल्यानंतर त्याने खेळ उंचावून बाजी मारली.

जोकोविचने २२ वर्षीय स्थानिक खेळाडू जिओव्हानी एम्पेत्शी पेरीकार्ड याचा ५-७, ७-५, ६-१, ६-४ असा पराभव केला. जवळपास तीन तास चाललेल्या या लढतीनंतर जोकोविचने फ्रेंच स्पर्धेत यजमान देशाच्या खेळाडूविरुद्ध खेळणे एक आव्हान असते असे सांगितले. 'फ्रान्सचा खेळाडू खेळत असताना प्रेक्षक या सामन्यात पूर्ण गुंतून जातात आणि प्रतिस्पर्धी खेळाडूवर दडपण निर्माण करतात. अशा प्रतिकूल परिस्थितीतही विजय मिळवला याचा आनंद आहे,' असे जोकोविच म्हणाला.



रात्री उशीरा झालेल्या सामन्यात मोठ्या रॅलीज अनेकदा बघायला मिळाल्या. पहिला सेट गमाविल्यानंतर आणि १ तास ४५ मिनिटांच्या झुंजीनंतर जोकोविचला ६ फूट ७ इंच उंचीच्या जिओव्हानी पेरीकार्ड याची स्व्हिस भेदण्याची संधी मिळाली. यामुळे तो सेटची बरोबरी करू शकला.

दरम्यान, महिला एकेरीत चार वेळच्या विजेत्या इगा श्वीऑटेक हिने विजयी सुरुवात करताना ऑस्ट्रेलियाच्या इमर्सन जोन्स हिचा ६-१, ६-२ असा फडशा पाडला. जॅस्मिन पाओलिनी हिने डायना यस्टेम्स्का हिचा ७-५, ६-३ असा, तर एलिना रायबाकिना हिने व्हेरोनिका इयावेच हिचा ६-२, ६-१ असा पराभव करत आगेकूच केली.

# तिरंदाज श्यामलाल मीना यांचे निधन



**नवी दिल्ली :** भारताचे माजी तिरंदाज श्यामलाल मीना यांचे दीर्घ आजाराने निधन झाले आहे. ते ६१ वर्षांचे होते. रविवारी रात्री रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

मीना यांनी १९८८ च्या सेऊल ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले होते. भारतीय तिरंदाजी संघटनेने (आर्चरी असोसिएशन ऑफ इंडिया) माजी तिरंदाजाचा एक फोटो पोस्ट करत, त्यावर लिहिले आहे, १९८८ च्या सेऊल ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणारे ऑलिम्पियन आणि अर्जुन पुरस्कार विजेते दिवंगत श्यामलाल मीना यांना श्रद्धांजली. भारतीय तिरंदाजीमधील त्यांचे योगदान आणि वारसा नेहमीच आदराने स्मरणात राहील. केवडिया गावात जन्मलेले मीना, लिंबा राम आणि रजत हळदर यांच्यासह भारतीय पुरुष रिकर्व्ह संघाचा भाग होते. ज्या संघाने कोलकाता येथे झालेल्या १९८७ च्या आशियाई तिरंदाजी चॅम्पियनशिपमध्ये कांस्य पदक जिंकले होते.

# ड्रेसिंग रूममध्ये वैभवसारखा मुलगा कधीच पाहिला नाही : शनाका

**मुल्लानपूर :** वैभव सूर्यवंशीच्या शांत स्वभावाने आणि संयमाने मी प्रभावित झालो आहे. ड्रेसिंग रूममध्ये मी यापूर्वी त्याच्यासारखा मुलगा कधीच पाहिला नाही, असे मत श्रीलंकेचा कर्णधार दसुन शनाका याने मंगळवारी व्यक्त केले.

राजस्तान रॉयल्स विरूद्ध सनरायझर्स हैदराबाद यांच्या आयपीएलचा बादफेरीतील दुसरा सामना आज (बुधवारी) महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, मुल्लानपूर, न्यू चंदीगड येथे रंगणार आहे. त्या आधी झालेल्या पत्रकार परिषदेत शनाका बोलत होता.



राजस्तान रॉयल्स संघातील वैभव सूर्यवंशीचा सहकारी शनाका म्हणाला, वैभवच्या लोकप्रियतेत खूप मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. या १५ वर्षीय खेळाडूने षटकार मारण्याच्या आपल्या अनोख्या क्षमतेने क्रिकेट जगताला चकित केले आहे. त्याचा शांत स्वभाव अद्वितीय आहे. तो एक व्यावसायिक खेळाडू आहे. अपयशी होणे किंवा धावा करणे एवढेच महत्त्वाचे नाही, तर तो सरावादरम्यान काय करतो आणि ड्रेसिंग रूममध्ये कसा वागतो हे अधिक महत्त्वाचे आहे. मी यापूर्वी ड्रेसिंग रूममध्ये एखाद्या मुलाला असे वागताना कधीही पाहिले नाही, असे त्याने नमूद केले.

कर्णधार रियान पराग आणि रवींद्र जडेजा दोघेही दुखापत ग्रस्त आहेत; परंतु ते आजच्या सामन्यासाठी उपलब्ध असतील. त्यांना किरकोळ दुखापती झाल्या आहेत, पण ते नक्की बरे होतील. आशा शनाका याने यावेळी व्यक्त केली.

# दिग्गजांकडून होणारी टीका योग्यच : गुकेश

**ओस्लो :** बुद्धिबळ जगज्जेतेपद मिळवल्यापासून गेल्या दीड वर्षांत मला सातत्यपूर्ण कामगिरी करता आलेली नाही. त्यामुळे दिग्गजांकडून होणारी टीका योग्यच आहे; पण मी याचे दडपण घेत नाही किंवा त्याने विचलितही होत नाही, असे मत भारताचा ग्रँडमास्टर दोम्माराजू गुकेशने व्यक्त केले. नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या पूर्वसंध्येला झालेल्या पत्रकार परिषदेत तो बोलत होता.

गुकेशने २०२४ मध्ये चीनच्या डिंग लिरेनला पराभूत करत बुद्धिबळाच्या इतिहासातील सर्वांत युवा जगज्जेता ठरण्याचा मान मिळवला होता. मात्र, त्यानंतर त्याला जगज्जेतेपदाला साजेशी कामगिरी करता आलेली नाही.

या वर्षी तो टाटा स्टील स्पर्धेत दहाव्या, प्राग आंतरराष्ट्रीय चेस फेस्टिव्हलमध्ये नवव्या, तर सुपरबेट स्पर्धेत सहाव्या स्थानी राहिला. त्याला मॅग्नस कार्लसन, गॅरी कास्पारोव आणि नातोली कार्पोव्ह यांसारख्या माजी जगज्जेत्यांच्या टीकेला सामोरे जावे लागले आहे. मात्र, त्यांनी आपल्यावर केलेली टीका योग्य असल्याचे गुकेशने नमूद केले.



### भारतात खेळण्याचा आनंद वेगळाच

जगज्जेतेपदाची लढत यंदा भारतात झाली तर त्याचा आनंदच वेगळा असेल. या लढतीत गुकेशसमोर जावोखिर सिंदारोवचे आव्हान असेल.'लढत कुठेही झाली तरी मी सज्ज असेन. पण लढत भारतात झाली, तर माझ्यासाठी ते अधिक खास असेल. मात्र, त्याच वेळी मायदेशात खेळताना मला दडपणाचाही सामना करावा लागेल. किताब जिंकण्यापेक्षा तो टिकवणे अधिक अवघड असते,' असे गुकेश म्हणाला.